**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 281 नाग/2011**

श्री डॉ. विष्णु राजाराम वैरागडे
08, न.प. कॉम्लेक्स, देसाईगंज
ता. देसाईगंज जि. गडचिरोली ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी
पोलीस अधिक्षक कार्यालय गडचिरोली
ता. जि. गडचिरोली
2) जन माहिती अधिकारी
पोलीस स्टेशन देसाईगंज
ता. देसाईगंज जि. गडचिरोली ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 1.6.2011 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 1.1.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 4.5.2011 रोजी नोटीस काढून दि. 1.6.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हे स्वतः हजर होते. त्यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 13.9.2010 रोजी जन माहिती अधिकारी पोलीस स्टेशन देसाईगंज यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन बोगस वैद्यकीय व्यावसायीकावर केलेल्या कार्यवाही बाबत 1 ते 3 मुद्यांवर माहिती मागितलेली होती. तसेच अर्जाच्या अनुषंगाने त्यांना दि. 10.10.2010 च्या पत्राने माहिती अधिकारी तथा पोलीस उपधिक्षक मुख्यालय गडचिरोली यांनी 1 ते 3 मुद्यांवर माहिती अपीलकर्ता यांना पाठविलेली आहे. तथापी सदरच्या माहिती मध्ये मुद्यां क्र. 2 च्या संदर्भात शासन निर्णयात नमुद कार्यपध्दती प्रमाणे पुढील कार्यवाही करीता नगर परीषद स्तरावरील समितीकडे अहवाल पाठविलेला आहे. त्यांच्याकडून अभिप्राय प्राप्त होणे असल्याने गुन्हा प्रलंबित आहे. त्यांच्याकडून अहवाल प्राप्त होताच पुढील कार्यवाही करण्यात येईल असे जन माहिती अधिकारी यांनी त्यांना कळविले. अपीलकर्ता यांचे याबाबत म्हणणे असे आहे की प्रस्तूत प्रकरणात समितीचा अहवाल प्राप्त होण्या आधीच गुन्हा दाखल झालेला आहे. तसेच अपीलकर्त्यास समितीच्या अहवालाची प्रत त्यांना पाहिजे आहे तथापी ती प्रत देखील अद्याप मिळालेली नाही असे त्यांनी सुनावणीत आयोगापुढे सांगितले.

3. आजच्या सुनावणीस पोलीस अधिक्षक कार्यालय गडचिरोली यांच्या वतीने श्री के. पी. नाईक पोलीस निरीक्षक जिल्हा विशेष शाखा हे उपस्थित होते.

4. त्यांनी सुनावणीत असे नमुद केले की अपीलकर्त्याच्या दि. 13.9.2010 च्या माहिती अर्जाला अनुसरुन अपीलकर्त्यास माहिती अधिकारी तथा पोलीस उपअधिक्षक मुख्यालय गडचिरोली यांनी दि. 10.10.2010 च्या पत्राने 1 ते 3 मुद्यांची माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. सदरची माहिती अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याचे त्यांनी आयोगापुढे सुनावणीत मान्य केले. मात्र त्यांना अद्यापपर्यंत समितीच्या अहवालाची प्रत प्राप्त झालेली नाही आणि गुन्हयाची सद्यस्थितीची माहिती उपलब्ध होणे

आवश्यक आहे असे अपीलकर्ता यांचे म्हणणे आहे. म्हणून प्रस्तूत प्रकरणात असे दिसून येते की अपीलकर्त्यास समितीचा अहवाल प्राप्त झाला असल्यास त्याची प्रत उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल. आणि गुन्हयाच्या संदर्भात सद्यस्थितीची माहिती देखील अपीलकर्त्यास उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

2) जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास वर नमुद केलेल्या समितीचा अहवाल प्राप्त झाल्यास त्याची प्रत विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी. तसेच गुन्हयाच्या संदर्भात सद्यस्थितीची माहिती देखील अपीलकर्त्यास विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी. सदरची कार्यवाही जन माहिती अधिकारी यांनी हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत करावी.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1838-1839

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 280 नाग/2011**

श्री गोपालकृष्ण शोभाराम मेंढे
C/o. केशव व–हाडे रा.बर्डी आरमोरी
ता. आरमोरी जि. गडचिरोली ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहा. धर्मदाय आयुक्त
गडचिरोली
ता. जि. गडचिरोली
2) श्री हरीरामजी वरखेडे
जन माहिती अधिकारी तथा अध्यक्ष
राणी दुर्गावती आदिवासी विकास संस्था जागीसाखरा
जि. गडचिरोली ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 1.6.2011 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 21.1.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 4.5.2011 रोजी नोटीस काढून दि. 1.6.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता गैरहजर आहेत. मात्र उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हे गैरहजर असल्यामुळे त्यांचे प्रस्तूत प्रकरणी कोणतेही म्हणणे एकून घेता आलेले नाही.

3. आजच्या सुनावणीस अध्यक्ष राणी दुर्गावती आदिवासी विकास संस्था जागीसाखरा जि. गडचिरोली श्री हरीरामजी वरखेडे हे उपस्थित होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहा. धर्मदाय आयुक्त गडचिरोली यांच्या वतीने श्री नंदनवार प्रभारी अधिक्षक हे उपस्थित होते.

4. जन माहिती अधिकारी तथा अध्यक्ष यांनी आजच्या सुनावणीस आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 15.10.2010 चा माहितीचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे प्राप्त झाला नाही. मात्र अपीलकर्त्याने सहा. धर्मदाय आयुक्त न्यास नोंदणी कार्यालय गडचिरोली यांचेकडे दाखल केलेल्या प्रथम अपीलाच्या सुनावणीची नोटीस त्यांना प्राप्त झाल म्हणून ते प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे सुनावणीस हजर झाले. त्यावेळी त्यांना अपीलकर्त्याने त्यांच्या संस्थेचे सन 2006–2007, 2007–2008 आणि 2008–2009 चे अंकेक्षणाच्या प्रती मागितल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. त्यामुळे अपीलकर्त्याचा माहितीचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे प्राप्त झाला नसल्यामुळे अपीलकर्त्यास कोणतीही माहिती देण्यात आलेली नाही असे जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीत नमुद केले.

5. प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या वतीने उपस्थित असलेले श्री नंदनवार यांनी आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचे प्रथम अपील सहा. धर्मदाय आयुक्त यांचेकडे दाखल केले होते आणि प्रथम अपीलाची सुनावणी घेण्यात आली प्रथम अपीलाचा निर्णय दि. 15.12.2010 रोजी देण्यात आला. आणि त्यामध्ये असे नमुद केले की अपीलकर्त्याने माहितीच्या अधिकारा खालील मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन द्यावी.

6. याबाबत जन माहिती अधिकारी तथा अध्यक्ष यांनी आयोगा पुढे असे सांगितले की प्रथम अपीलाचा निर्णय त्यांना दि. 6.11.2010 रोजी प्राप्त झाला. परंतू अपीलकर्ता हे त्यांच्या संस्थेचे सभासद नाहीत तसेच सदर संस्थेला शासनाकडून कोणतेही अनुदान मिळत नाही म्हणून माहितीचा कायदा संस्थेला लागू होत नाही म्हणून अपीलकर्त्यास दि. 1.2.2010 च्या पत्राने तसे लेखी कळविल्याचे जन माहिती अधिकारी तथा अध्यक्ष यांनी आयोगा पुढे सांगितले.

7. जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहा. धर्मदाय आयुक्त गडचिरोली यांनी दि. 15.12.2010 रोजी प्रथम अपीलाचा सविस्तरपणे निर्णय देवून अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन देण्याचे आदेश दिलेले आहेत. सदरचा प्रथम अपीलाचा निर्णय हा योग्य दिसून येतो म्हणून सदरच्या प्रथम अपीलाच्या निर्णयात हस्तक्षेप करण्याची आवश्यकता दिसून येत नाही. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यात येत आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी तथा अध्यक्ष यांनी प्रथम अपीलाच्या निर्णयानुसार अपीलकर्ता यांना त्यांनी मागितलेली माहिती विनामुल्य व्यक्तीशः किंवा रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन द्यावी.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1841-1842

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 282 नाग/2011**

श्री सुखदेव तुलसीराम लांजेवर
रा. बरबसपुरा पो. बटाना
ता. जि. गोंदिया ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री गोगुलवार
प्रथम अपीलीय अधिकारी तथा खंड विकास अधिकारी
पंचायत समिती गोंदिया
ता. जि. गोंदिया
2) श्री संजय बनकर
जन माहिती अधिकारी कक्ष अधिकारी
पंचायत विभाग पंचायत समिती गोंदिया
ता. जि. गोंदिया ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 1.6.2011 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 15.2.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 4.5.2011 रोजी नोटीस काढून दि. 1.6.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता गैरहजर आहेत. मात्र उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हे गैरहजर असल्यामुळे त्यांचे प्रस्तूत प्रकरणी कोणतेही म्हणणे एकून घेता आलेले नाही. मात्र आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी पंचायत समिती गोंदिया श्री संजय बनकर उपस्थित होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा खंड विकास अधिकारी पंचायत समिती गोंदिया श्री गोगुलवार हे उपस्थित होते.

3. जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 10.12.2010 चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने बरबसपूरा या ग्रामपंचायतच्या संदर्भात सामान्य फंड, बीआरजीपी फंड, 12 वा वित्त आयोग, एमआरइजीएस योजनेचे कॅश बुक व पास बुकच्या सत्यप्रती तसेच इंदिरा आवास योजना अंतर्गत लाभार्थ्यांच्या निवडीबाबत शासन निर्णयाची प्रत आणि बरबसपूरा येथील शौचालय लाभार्थ्यांची यादी इत्यादीबाबतची 1 ते 6 मुद्यांवर माहिती मागितलेली होती. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ग्रामपंचायत बरबसपूरा यांचेशी संबंधीत असल्यामुळे तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्याचा माहितीचा अर्ज दि. 24.12.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा ग्राम सेवक ग्रामपंचायत बरबसपूरा यांचेकडे माहिती देण्यासाठी पाठविला. त्याचप्रमाणे अपीलकर्त्याने मागितलेल्या माहिती पैकी इंदिरा आवास योजनेच्या संदर्भातील मागितलेल्या शासन निर्णयाची प्रत पंचायत समिती गोंदिया कार्यालयाशी संबंधीत असल्यामुळे त्याची प्रत उपलब्ध करुन देण्यास संबंधीत स्थापत्य अभियांत्रीकी सहाय्यक यांना देखील कळविले.

4. त्यानंतर जन माहिती अधिकारी तथा ग्राम सेवक यांनी अपीलकर्त्याने मागितलेली माहिती संकलीत केली आणि अपीलकर्त्याने माहितीच्या अर्जात माहिती व्यक्तीशः घेणार असे नमुद केले

2



असल्यामुळे अपीलकर्त्यास ग्राम सेवक यांनी दि. 23.1.2010 च्या पत्राने आपण मागितलेली माहिती तयार असून माहिती घेवून जावी असे नमुद करुन अपीलकर्त्यास कळविले. मात्र अपीलकर्ता ग्राम

सेवक यांचेकडे माहिती घेण्यासाठी गेले नाही. त्यानंतर अपीलकर्त्याने प्रथम अपील संवर्ग विकास अधिकारी पंचायत समिती गोंदिया यांचेकडे दाखल केले. संवर्ग विकास अधिकारी यांनी प्रथम अपीलाची सुनावणी घेतली आणि प्रथम अपीलाचा निर्णय दि. 14.3.2011 रोजी दिला आणि प्रथम अपीलाच्या निर्णयात असे नमुद केले की जन माहिती अधिकारी तथा ग्राम सेवक ग्रामपंचायत बरबसपूरा यांनी अपीलकर्त्यास देण्यासाठी तयार असलेली मुद्या क्र. 1,2,3,4, व 6 ची माहिती 3 दिवसाच्या आत विनामुल्य पुरवावी आणि अपीलकर्त्यास मुद्या क्र.5 ची माहिती म्हणजे इंदिरा आवास योजनेच्या संदर्भात लाभार्थींची निवड करण्याबाबत शासन निर्णयाची प्रत अपीलकर्त्यास प्रथम अपीलाच्या सुनावणीच्या वेळी उपलब्ध करुन दिली असे प्रथम अपीलीय अधिकारी श्री गोगुलवार यांनी आयोगापुढे सांगितले. प्रथम अपीलाच्या निर्णयानंतर जन माहिती अधिकारी तथा ग्राम सेवक बरबसपूरा यांनी अपीलकर्त्यास दि. 21.3.2010 रोजी आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे.

5. जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की जन माहिती अधिकारी तथा ग्राम सेवक बरबसपूरा यांचेकडून अपीलकर्त्यास आवश्यक ती माहिती विनामुल्य उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

( पी. डब्ल्यु. पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**नागपूर**
Ageyord6.1844-1845

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 283 नाग/2011**

श्री राजेशकुमार मयाराम तायवाडे
मु. पो. एकोडी(दांडेगाव)
ता. जि. गोंदिया ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी
जलस्वराज प्रकल्प जिल्हा परिषद गोंदिया
ता. जि. गोंदिया
2) जन माहिती अधिकारी
जलस्वराज प्रकल्प जिल्हा परिषद गोंदिया
ता. जि. गोंदिया ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 1.6.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 15.2.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 4.5.2011 रोजी नोटीस काढून दि. 1.6.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हजर आहेत. मात्र उत्तरवादी गैरहजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हे स्वतः हजर होते. त्यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 15.11.2010 रोजी जन माहिती अधिकारी जलस्वराज प्रकल्प जिल्हा परिषद गोंदिया यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन जलस्वराज प्रकल्प धामणेवाडा आणि गंगाझरी या गावामध्ये जलस्वराज प्रकल्प विषयी मिळालेला निधी व त्याबाबत झालेला खर्च इत्यादीची माहिती मागितलेली होती. तथापी त्यांना विहित मुदतीत माहिती प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील प्रथम अपीलीय अधिकारी जलस्वराज प्रकल्प जिल्हा परिषद गोंदिया यांचेकडे दाखल केले. प्रथम अपीलाच्या निर्णयानंतरही त्यांना अपेक्षित माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा जलस्वराज प्रकल्प जिल्हा परिषद गोंदिया ता. जि. गोंदिया आणि प्रथम अपीलीय अधिकारी जलस्वराज प्रकल्प जिल्हा परिषद गोंदिया ता. जि. गोंदिया हे दोन्ही अधिकारी आयोगाच्या सुनावणीस गैरहजर राहिले. तसेच त्यांनी अपीलकर्त्याच्या माहितीचा अर्जाच्या संदर्भात कोणत्याही प्रकारचा लेखी अहवाल आयोगाकडे दाखल केला नाही. म्हणून यावरुन असे दिसून येते की या दोन्ही अधिका–यांना माहितीच्या अधिकारा खालील अर्जाची कोणतीही दखल घेतलेली नाही. म्हणून जन माहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांचे विरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 20 प्रमाणे का कार्यवाही करु नये याचा लेखी खुलासा आयोगाकडे सादर करणे आवश्यक आहे. तसेच अपीलकर्त्यास आतापर्यंत आवश्यक ती माहिती उपलब्ध झालेली दिसून येत नाही. म्हणून अपीलकर्त्यास त्यांनी मागितलेली माहिती उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यात येत आहे.



2

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 15 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना त्यांनी मागितलेली माहिती संबंधीताकडून प्राप्त करुन घेवून विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.

2) आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी जलस्वराज प्रकल्प गोंदिया हे दोन्ही अधिकारी आयोगाच्या सुनावणीस गैरहजर राहिलेत. म्हणून त्यांचे विरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 20 प्रमाणे का कार्यवाही करु नये याचा लेखी खुलासा हा आदेश मिळाल्यापासून 15 दिवसाचे आत आयोगाकडे सादर करावा अन्यथा त्यांचे विरुध्द योग्य ती कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

3) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1847-1848

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 291 नाग/2011**

श्री ताराचंद सादु मेश्राम
मु. पो. तिमेझरी
ता. गोरेगाव जि. गोंदिया ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री आर. व्ही. आकुलवार
प्रथम अपीलीय अधिकारी तथा तहसिलदार
तहसिल कार्यालय गोरेगाव
ता. गोरेगाव जि. गोंदिया
2) श्री एम. एस. राहांगडाले
जन माहिती अधिकारी तथा धान्य खरेंदी निरीक्षक
तहसिल कार्यालय गोरेगाव
ता. गोरेगाव जि. गोंदिया ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 2.6.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 1.2.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 4.5.2011 रोजी नोटीस काढून दि. 2.6.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता गैरहजर आहेत. मात्र उत्तरवादी हजर आहेत. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हे गैरहजर असल्यामुळे त्यांचे प्रस्तूत प्रकरणी कोणतेही म्हणणे एकून घेता आलेले नाही.

2. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा धान्य खरेंदी निरीक्षक तहसिल कार्यालय गोरेगाव ता. गोरेगाव श्री एम. एस. राहांगडाले हे उपस्थित होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा तहसिलदार तहसिल कार्यालय गोरेगाव श्री आर. व्ही. आकुलवार हे उपस्थित होते.

3. जन माहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगाच्या असे निदर्शनास आणून दिले की अपीलकर्त्याचा दि. 15.11.2010 चा माहितीचा अर्ज जन माहिती अधिकारी यांचेकडे प्राप्त झाला नाही तसेच अपीलकर्ता यांचे प्रथम अपीलाचा अर्ज देखील तहसिलदार यांचेकडे प्राप्त झाला नाही.

4. तथापी प्रस्तूत प्रकरणाची खात्री करण्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी दि. 13.12.2011 रोजी अपीलकर्ता श्री ताराचंद सादु मेश्राम यांची टिमझरी या गावात जावून चौकशी केली त्यावेळी अपीलकर्ता श्री ताराचंद सादु मेश्राम यांना माहितीच्या अधिकारा



खालील अर्जाबाबत विचारणा केली असता त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्या समक्ष आणि गावातील पोलीस पाटील यांच्या समक्ष असे बयाण लिहून दिले की त्यांनी

माहितीच्या अधिकारा खाली कोणतीही माहिती मागितली नाही तसेच प्रथम अपीलाचा अर्ज देखील त्यांनी दाखल केला नाही किंवा राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील केले नाही. त्या बयाणाची प्रत जन माहिती अधिकारी यांनी आज आयोगापुढे सादर केली.

5. जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी तहसिलदार यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की अपीलकर्त्याने माहितीच्या अधिकारा खाली कोणतीही माहिती मागितली नाही किंवा त्यासाठी प्रथम अपील किंवा दाखल केलेले नाही. त्यामुळे माहिती त्यांना उपलब्ध करुन देण्याचा प्रश्न उदभवत नाही सदरचे अपील खारीज करण्यात येत आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1850-1851

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 288 नाग/2011**

श्री सुरेश कवडुजी पद्मशाली
पोलीस स्टेशन मागे, गडचिरोली
ता. जि. गडचिरोली – 442605 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी
जिल्हाधिकारी कार्यालय गडचिरोली
ता. जि. गडचिरोली
2) श्री बडकेलवार
जन माहिती अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी
जिल्हाधिकारी कार्यालय गडचिरोली
ता. जि. गडचिरोली ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 2.6.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 15.2.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 4.5.2011 रोजी नोटीस काढून दि. 2.6.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता गैरहजर आहेत. मात्र उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हे गैरहजर असल्यामुळे त्यांचे प्रस्तूत प्रकरणी कोणतेही म्हणणे एकून घेता आलेले नाही.

3. मात्र आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी जिल्हाधिकारी कार्यालय गडचिरोली श्री बडकेलवार हे उपस्थित होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी हे इ.जी.एस.कमिटीच्या बैठकीच्या पूर्व तयारीकरीता व्यस्त असल्यामुळे ते सुनावणीस उपस्थित राहू शकत नाही असा फॅक्स संदेश आयोगाकडे पाठविलेला आहे.

4. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी श्री बडकेलवार यांनी आयोगापुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 15.11.2010 चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे दि. 25.11.2010 रोजी प्राप्त झाला होता. सदरच्या माहितीच्या अर्जात अपीलकर्त्याने जिल्हाधिकारी कार्यालय गडचिरोली या कार्यालयात कार्यरत असलेल्या कर्मचारी व अधिकारी यांच्या घरभाडे निवासस्थानाबाबत आणि अतिरिक्त घरभाडे बाबत एकुण 1 ते 14 मुद्यांवर माहिती मागितलेली होती. सदरची माहिती अपीलकर्त्याने दि. 6.8.2002 ते दि. 31.आक्टो. 2010 या कालावधीतील



माहिती मागितलेली होती. म्हणून अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही सुमारे 8 वर्षाच्या कालावधीची व सर्व अधिकारी व कर्मचा–याची असल्यामुळे सदरची माहिती विस्तृत व

मोठया प्रमाणात आहे. म्हणून अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही प्रामुख्याने घरभाडे भत्ता व अतिरिक्त घरभाडे भत्ता याबाबत असल्यामुळे सद्यस्थितीत सर्व अधिकारी व कर्मचा–याच्या वेतनपटात सदरची माहिती अंतर्भूत आहे. म्हणून सदरच्या वेतनपटाचे पेजेस हे मोठया स्वरुपाचे असल्याने आणि या माहितीचा कालावधी 8 वर्षाचा असल्यामुळे या माहिती वेतनपटाचा झेरॉक्सचा खर्च सुमारे रु. 12000/– अंदाजीत होईल. म्हणून अपीलकर्त्यास माहितीचे शुल्क रु. 12000/– भरण्याबाबत दि. 29.11. 2010 च्या पत्राने सविस्तरपणे कळविण्यात आले असे जन माहिती अधिकारी यांनी निदर्शनास आणून दिले. सदरचे दि. 19.11.2010 चे पत्र अपीलकर्त्यास प्राप्त झाल्यानंतर अपीलकर्त्याने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि. 6.12.2010 रोजी पत्र देवून त्यासोबत नमुना सादर केला आणि सदरच्या नमुन्या मध्ये माहिती उपलब्ध करुन द्यावी असे त्यांनी कळविले. तथापी माहितीच्या अधिकारा अंतर्गत माहिती ज्या स्वरुपात उपलब्ध आहे त्या स्वरुपात देणे अपेक्षित आहे आणि माहिती संकलीत करुन अपीलकर्त्याने पुरविलेल्या नमुन्यात देणे अपेक्षित नाही म्हणून अपीलकर्त्याने माहितीचे शुल्क भरले नसल्यामुळे माहिती उपलब्ध करुन देता आली नाही असे जन माहिती अधिकारी यांनी सांगितले.

5. त्यानंतर अपीलकर्त्याने प्रथम अपील अपर जिल्हाधिकारी गडचिरोली यांचेकडे दाखल केले. त्या प्रथम अपीलाची सुनावणी दि. 29.11.200 रोजी घेण्यात आली आणि त्या सुनावणीमध्ये जन माहिती अधिकारी आणि अपीलकर्ता यांचे म्हणणे एकून घेण्यात आले आणि प्रथम अपीलाचा निर्णय दि. 8.2.2010 रोजी देण्यात आला. प्रथम अपीलाच्या निर्णयात असे नमुद केले की जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास माहितीचे शुल्क भरुन माहिती घेवून जाण्याबाबत कळविलेले आहे तसेच माहितीचा अधिकार अधिनियम 2005 अन्वये माहिती ज्या स्वरुपात उपलब्ध आहे त्याच स्वरुपात देणे अपेक्षित आहे त्यामुळे अपीलकर्त्याचे प्रथम अपील खारीज करण्यात आलेले आहे असे जन माहिती अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी यांनी आयोगाच्या निदर्शनास आणून दिले.

6. सुनावणीच्या दरम्यान जन माहिती अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी यांनी आयोगाच्या असेही निदर्शनास आणून दिले की अपीलकर्त्याने सादर केलेल्या नमुन्यात माहिती द्यावयाची झाल्यास त्यांच्या कार्यालयात सुमारे 150 कर्मचारी आहेत. हया 150 कर्मचा–याची माहिती संकलीत करण्यास प्रमाणाबाहेर कार्यालयातील मानवी सामुग्रीचा उपयोग करावा लागेल त्यामुळे कार्यालयाचे इतर कामकाजावर त्याचा विपरीत परीणाम होईल म्हणून माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 2 (च) मध्ये माहिती या व्याख्येत मोडणारी माहितीच अपीलकर्त्यास देणे अपेक्षित आहे. आणि ती देखील अपीलकर्त्याने माहितीचे शुल्क भरल्या नंतर द्यावयाची आहे म्हणून अपीलकर्त्याने माहितीचे शुल्क भरल्यास माहिती ज्या स्वरुपात उपलब्ध आहे त्या स्वरुपात ती



अपीलकर्त्यास त्वरीत उपलब्ध करुन देण्यात येईल असे जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले.

7. जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की अपीलकर्त्याने माहितीच्या अधिकारा खाली मागितलेल्या माहितीचे शुल्क भरण्याबाबत सविस्तरपणे जन माहिती अधिकारी यांनी दि. 29.11.2010 च्या पत्राने अपीलकर्त्यास कळविलेले आहे. त्याप्रमाणे अपीलकर्त्याने माहितीचे शुल्क भरुन माहिती प्राप्त करुन घेणे संयुक्तिक होईल. तसेच माहितीच्या अधिकारा मध्ये एक विशिष्ट नमुन्यात माहिती तयार करुन देणे अपेक्षित नाही. कलम 2 (च) अन्वये माहितीच्या व्याख्येत ज्या बाबींचा समावेश होतो त्याचे दस्तऐवज उपलब्ध करुन देणे अपेक्षित आहे. म्हणून जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दि. 29.11.2010 च्या पत्राने माहितीचे शुल्क भरण्याबाबत कळविलेले योग्य दिसून येते. म्हणून खालील प्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे दि. 29.11.2010 च्या पत्राप्रमाणे माहितीचे शुल्क भरुन माहिती प्राप्त करुन घ्यावी. तसेच अपीलकर्त्याने माहितीचे शुल्क भरल्या नंतर जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन द्यावी.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

( पी. डब्ल्यु. पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**नागपूर**
Ageyord6.1853-1855

जा.क्र.————————— दि..................
मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 294 नाग/2011**

श्री दादाजी विठोबा बावनकर
मु. ब्रम्हपुरी
ता. ब्रम्हपुरी जि. चंद्रपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री चव्हाण
प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी
नगर परिषद ब्रम्हपुरी
ता. ब्रम्हपुरी जि. चंद्रपूर
2) श्री मासूरकर
जन माहिती अधिकारी लेखाधिकारी
नगर परिषद ब्रम्हपुरी
ता. ब्रम्हपुरी जि. चंद्रपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 3.6.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 14.2.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 5.11.2011 रोजी नोटीस काढून दि. 3.6.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हे स्वतः हजर होते. त्यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 19.10.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा नगर परिषद ब्रम्हपुरी ता. ब्रम्हपुरी जि. चंद्रपूर यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन ते नगर परिषद येथे पाणी पुरवठा विभागात पंप ऑपरेटर म्हणून कार्यरत होते. म्हणून त्यावेळी दि. 28.3.1994 ते दि. 20.9.1994, दि. 26.3.1994 ते 31.1.1996 या कालावधीत त्यांनी घेतलेल्या पेमेंटच्या रजिस्टरची/मस्टरची सत्यप्रत त्यांनी मागणी केली होती. तथापी त्यांना तत्कालीन जन माहिती अधिकारी सहा. लेखापाल श्री राऊत यांनी असे कळविले की एव्हीडन्सचे कलम 129 मधील तरतुदीनुसार तसेच माहितीचा अधिकार कायदा 2005 च्या कलम 8 (डी) आणि (अे) नुसार उपरोक्त माहिती देणे बंधनकारक नाही त्यामुळे माहिती पुरविणे शक्य नाही असे कळविले. त्यामुळे प्रथम अपील मुख्याधिकारी नगर परिषदेकडे दाखल केले. मात्र प्रथम अपील दाखल केल्यानंतरही त्यांना अपेक्षित माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.



3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा सहा. लेखापाल नगर परिषद ब्रम्हपुरी श्री राऊत हे उपस्थित होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी

नगर परिषद ब्रम्हपुरी श्री चव्हाण हे उपस्थित होते. आणि विद्यमान जन माहिती अधिकारी श्री मासूरकर हे देखील उपस्थित होते.

4. तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 19.10.2010 चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. तथापी अपीलकर्त्याने मागितलेली माहिती एव्हीडन्स ॲक्टचे कलम 129 मधील तरतुदीनुसार माहिती देणे बंधनकारक नाही तसेच माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 8 नुसार माहिती पुरविणे शक्य नाही असे नमुद करुन अपीलकर्त्यास दि. 3.11.2010 च्या पत्राने कळविण्यात आले होते.

5. प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी यांनी आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा प्रथम अपीलाचा अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झालेला नाही. त्यामुळे प्रथम अपीलाचा निर्णय देण्याचा प्रश्न उद्‌भवला नाही. तथापी अपीलकर्त्याने प्रथम अपील पुन्हा जन माहिती अधिकारी तथा सहा. लेखापाल यांच्याकडेच दाखल केलेले दिसते. वास्तविक पाहता अपीलकर्त्याने प्रथम अपील मुख्याधिकारी यांच्याकडे दाखल करणे आवश्यक होते.

6. अपीलकर्ता तसेच जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की अपीलकर्त्याने माहितीच्या अर्जात दि. 28.3.1994 ते दि. 20.9.1994 या कालावधीत ते नगर परिषद येथे पाणी पुरवठा विभागात पंप ऑपरेटर असतांना त्यांना दिलेल्या पेमेंटच्या रजिस्टरची/मस्टरची सत्यप्रत त्यांनी मागितलेली होती. तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दि. 3.11.2010 च्या पत्राने माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 8 नुसार तसेच एव्हीडन्स ॲक्टचे नुसार माहिती पुरविणे शक्य नाही असे कळविलेले आहे. तथापी तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी माहिती पुरविणे शक्य नाही असे जे कळविलेले आहे ते माहितीचा अधिकार कायद्याशी विसंगत आहे. कारण अपीलकर्त्याने दि. 28.3.1994 ते दि. 20.9. 1994 या कालावधीत त्यांना दिलेल्या पेमेंटच्या रजिस्टरची/मस्टरची सत्यप्रत त्यांनी मागितलेली आहे. सदरची माहिती कोणत्याही प्रकारची गोपनिय स्वरुपाची दिसून येत नाही. म्हणून अपीलकर्त्यास विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी दि. 28.3.1994 ते दि. 20.9.1994, दि. 26.3.1994 ते 31.1.1996 या कालावधीत केलेल्या पेमेंटच्या रजिस्टरची/मस्टरची सत्यप्रत पुरविणे संयुक्तीक होईल किंवा वरील कालावधीत केलेल्या पेमेंट नोंदीच्या कॅश बुकच्या प्रती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल.



3

आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 15 दिवसाचे आंत विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना वर नमुद केलेल्या कालावधीच्या पेमेंटच्या रजिस्टरची/मस्टरची सत्यप्रत विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी. किंवा वर नमुद केलेल्या कालावधीतील अपीलकर्त्यास पेमेंट केल्या बाबत कॅश बुकची सत्यप्रत विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1849-1851

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 295 नाग/2011**

श्री नत्थू रामचंद्र तळेकर
मंगळवारी पेठ उमरेड
ता. उमरेड जि. नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री कमलाकर रणधीवे
प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी, (पंचायत)
जिल्हा परिषद नागपूर
ता. जि. नागपूर

2) श्री पी. के. बमनोटे
जन माहिती अधिकारी तथा खंड विकास अधिकारी
पंचायत समिती कुही
ता. कुही जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 3.6.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 17.2.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 5.5.2011 रोजी नोटीस काढून दि. 3.6.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता गैरहजर आहेत. मात्र उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हे गैरहजर असल्यामुळे त्यांचे प्रस्तूत प्रकरणी कोणतेही म्हणणे एकून घेता आलेले नाही. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा खंड विकास अधिकारी पंचायत समिती कुही ता. कुही जि. नागपूर श्री पी. के. बमनोटे हे उपस्थित होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी, (पंचायत) जिल्हा परिषद नागपूर श्री कमलाकर रणधीवे हे उपस्थित होते.

3. जन माहिती अधिकारी तथा खंड विकास अधिकारी पंचायत समिती कुही यांनी आयोगापुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 18.8.2010 चा माहितीचा अर्ज त्यांच्या

2



कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. त्या अर्जात अपीलकर्त्याने स्व. रामचंद्र तळेकर यांचे वडेगाव मांढळ येथील घरावर वारसदारांची नावे आणि कर आकारणी रजिस्टर वर

सदरची नावे समाविष्ट करण्यासंबंधाने माहिती मागितलेली होती. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही सचिव ग्राम पंचायत वडेगाव मांढळ ता. कुही यांचेशी संबंधीत असल्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दि. 14.9.2010 च्या पत्राने असे कळविले की आपण माहितीचा अधिकार अधिनियम 2005 अन्वये मागितलेल्या माहिती संदर्भात आपण ग्राम पंचायत वडेगाव मांढळ येथे ग्राम पंचायतची आकारणी तसेच नाव नोंदणी वर्ष योग्य ती माहिती देवून नाव नोंदणी आकारणी रजिस्टर मध्ये नावाची नोंद करुन आपल्या माहितीच्या अर्जात स्मरणपत्र दिल्याचे नमुद असले तरी आपल्या अर्जाच्या दिनांकाच्या आधी स्मरणपत्र कार्यालयास सादर केलेले नसतांना स्मरणपत्राचा उल्लेख कसा केला असे कळविले आणि सदर फेरफार संबंधी ग्राम पंचायत वडेगाव मांढळशी संपर्क साधून माहिती प्राप्त करुन घ्यावी आणि त्या पत्राची प्रत सचिव ग्राम पंचायत वडेगाव मांढळ यांना देवून संबंधीतास माहिती देवून कार्यवाही करण्याबाबत कळविले.

4. त्याला अनुसरुन सचिव यांनी दि. 25.9.2010 रोजी ग्राम पंचायतच्या कार्यकारी मंडळापुढे मासीक सभेत माहितीच्या अधिकाराच्या अर्जावर निर्णय घेण्यासाठी ठराव क्र. 11 घेण्यात आला. त्या ठरावामध्ये असे नमुद केले की श्री रामचंद्र तळेकर यांच्या घराच्या संदर्भात श्री नत्थू रामचंद्र तळेकर यांचे नाव कर नोंदणी रजिस्टर मध्ये लावावे असे त्यांचे म्हणणे आहे. तथापी ग्राम पंचायत कमिटीचे असे म्हणणे आहे की या विषयावर मागील दोन तीन मिटींगमध्ये चर्चा करण्यात आली की रामचंद्र तळेकर याना दोन मुले आहेत. म्हणून या दोन्ही मुलांनी म्हणजे श्री नत्थू रामचंद्र तळेकर आणि कृष्णा रामचंद्र तळेकर यांनी याबाबत आपसात भांडणे मिटवावी किंवा वारसा संदर्भात कोर्टात जावे व कोर्टाचा निकाल आणावा. त्याशिवाय ग्राम पंचायतने घेतलेल्या फेरफारामध्ये बदल करता येणार नाही असे ग्राम पंचायतने निर्णय घेवून अपीलकर्त्यास दि. 2.10.2010 च्या पत्राने ग्राम पंचायतचा ठराव व त्याबाबतची माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. सदरचे पत्र अपीलकर्त्याने प्राप्त केल्याची पोच सचिव ग्राम पंचायत वडेगाव मांढळ यांनी आयोगापुढे दाखल केली.

5. तसेच प्रस्तूत प्रकरणी अपीलकर्त्याने प्रथम अपील उपमख्य कार्यपालन अधिकारी, यांचेकडे दाखल केले होते. प्रथम अपीलाच्या सुनावणी अपीलकर्ता गैरहजर राहिले. तथापी अपीलकर्त्याच्या मकानाचे फेरफारा संबंधी नियमानुसार कार्यवाही करण्याचे निर्देश ग्राम पंचायतीस खंड विकास अधिकारी यांनी द्यावे असा प्रथम अपीलाचा निर्णय देण्यात आला.





6. खंड विकास अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की अपीलकर्त्याला त्यांच्या वडीलांच्या

मकानाच्या संदर्भात फेरफार घेण्याबाबतचे ग्राम पंचायत वडेगाव मांढळ यांनी घेतलेल्या ठरावाच्या प्रती उपलब्ध करुन दिलेल्या आहेत. त्यानुसार अपीलकर्त्याने फेरफार घेण्या संबंधी योग्य ती कागदपत्रे ग्राम पंचायतकडे दाखल करणे आवश्यक आहे. त्याशिवाय ग्राम पंचायतला त्यांच्या नावाचा फेरफार सदरच्या मकानावर घेता येणार नाही असे दिसून येते. तथापी अपीलकर्त्यास ग्राम पंचायत वडेगाव मांढळ यांनी घेतलेल्या ठरावाच्या प्रतीची माहिती आणि त्या ठरावाच्या प्रती अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिली असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यात येत आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

( पी. डब्ल्यु. पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**नागपूर**
Ageyord6.1853-1855

जा.क्र.————————— दि..................
मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 303 नाग/2011**

श्री भीमराव निळकंठराव मानवटकर
प्लॉट नं. 14, पठान ले–आऊट,
लाखंडे नगर जवळ नागपूर
ता. जि. नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा अप्पर पोलीस अधिक्षक
पोलीस अधिक्षक कार्यालय नागपूर जिल्हा(ग्रामीण) नागपूर
ता. जि. नागपूर

2) श्री के. एच. आदेवार
जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी,
सावनेर
ता. सावनेर जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 4.6.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 21.2.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 5.5.2011 रोजी नोटीस काढून दि. 4.6.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हे स्वतः हजर होते. त्यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 22.9.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, सावनेर यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन
1) पोलीस स्टेशन सावनेर दि. 2.1.2008 ते 22.9.2011पर्यंत 2) ग्रामीण पोलीस अधिक्षक कार्यालय नागपूर दि. 5.3.2008 ते 22.9.2010पर्यंत शेती भुमापन क्र. 34 मौजा हरदोली प.ह.नं. 17 ता. कळमेश्वर तसेच मौजा सोनापार प.ह.नं. 18 ता. कळमेश्वर या जमीनीच्या संदर्भात धोकाधाडी व खोटया सहया केल्या बद्यल दि. 2.1.2008 रोजी तक्रार अर्ज दिला होता. त्या तक्रार अर्जाच्या संदर्भाने त्यांनी माहिती मागितलेली होती. त्यांना अपेक्षित

माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील अप्पर पोलीस अधिक्षक पोलीस अधिक्षक कार्यालय नागपूर जिल्हा(ग्रामीण) नागपूर यांचेकडे दाखल केले हाते. मात्र त्यानंतरही त्यांना अपेक्षित माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी श्री के. एच. आदेवार हे उपस्थित होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा अप्पर पोलीस अधिक्षक पोलीस अधिक्षक कार्यालय नागपूर जिल्हा(ग्रामीण) नागपूर यांच्या वतीने श्री डी.डी.तिडके पोलीस उपअधिक्षक हे उपस्थित होते.

4. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी श्री के. एच. आदेवार यांनी आजच्या सुनावणीस आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 22.9.2010 चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे पोलीस अधिक्षक कार्यालय नागपूर यांचेकडून दि. 30.9.2010 रोजी प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही पोलीस निरीक्षक कळमेश्वर यांचेशी संबंधीत असल्यामुळे त्यांनी दि. 2.10.2010 च्या पत्राने अपीलकर्त्याचा अर्ज पोलीस निरीक्षक कळमेश्वर यांचेकडे पाठविला. पोलीस निरीक्षक कळमेश्वर यांनी त्यांचा अहवाल दि. 19.10.2010 च्या पत्राने दि. 20.10.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी सावनेर यांचेकडे पाठविला. आणि त्यामध्ये असे नमुद केले की अपीलकर्त्याने मागितलेली माहिती मौजा हरदोली व मौजा सोनापार ता. कळमेश्वर येथील वडीलोपार्जीत शेत जमीनीचे कागदपत्रामध्ये खोटया सहया करुन धोकाधाडी केल्या बद्यल नमुद आहे. त्या संबंधाने अर्जदार यांनी माहिती मागितलेली आहे. तथापी सदरचे गाव मौजा हरदोली आणि मौजा सोनापार हे पोलीस स्टेशन सावनेरचे कार्यक्षेत्रात येत असल्याने सदरचा अर्ज पुढील कार्यवाहीस आपल्या कार्यालयास सादर करण्यात येत आहे असे पोलीस निरीक्षक कळमेश्वर यांनी जन माहिती अधिकारी यांना कळविले. त्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी दि. 2.10.2010 च्या पत्राने ठाणेदार पोलीस स्टेशन सावनेर यांचेकडे अपीलकर्त्याने मागितलेल्या माहितीच्या संदर्भात माहिती तयार करुन पाठविण्या बाबतच्या सुचना दिल्या. त्याला अनुसरुन ठाणेदार सावनेर यांचेकडून जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाकडे दि. 29.10.2010 च्या पत्राने अपीलकर्त्याच्या माहितीच्या संदर्भात माहिती पाठविली. त्यामध्ये असे नमुद केले की प्रस्तूत प्रकरण हे शेतीच्या संदर्भातील वादाच्या बाबतीत आहे. त्यामध्ये 6 वर्षाचा कालावधी संपल्यानंतर शेतीचे भाव जास्त झाल्याने व भावाचे हिश्यामधून त्यांना शेती मिळावी म्हणून यातील अर्जदाराने चढूनबढून वरीष्ठांकडे लेखी स्वरुपाचा अर्ज दिल्याचे समजते असे या चौकशी अहवालात नमुद केलेले आहे. म्हणून

प्रस्तूत प्रकरणात हा वाद दिवाणी सवरुपाचा असल्याबाबत दिसून येतो. म्हणून जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दि. 22.11.2010 च्या पत्राने लेखी सुचना देवून माहिती अर्जातील माहिती घेवून जाण्याबाबत कळविले. तथापी अपीलकर्ता त्यांच्या कार्यालयात माहिती घेण्यासाठी हजर झाले नाही.

5. याबाबत अपीलकर्त्याने आयोगा पुढे असे सांगितले की त्यांना कळमेश्वरच्या संदर्भात माहिती पाहिजे होती. ते सदरची माहिती घेण्यास जन माहिती अधिकारी यांचेकडे गेले होते. मात्र त्यानंतर त्यांना दि. 24.12.2010 च्या पत्राने पोलीस स्टेशन कळमेश्वर यांचेकडून कळमेश्वरच्या संदर्भात लेखी सुचना देवून असे कळविले की आपले वडीलोपार्जीत शेतीचे स्वतःचे हिस्सेकरीता गैरअर्जदार भाऊ नामे भाऊ मानवटकर, श्री देवराव मानवटकर, शांतवन मानवटकर चे विरुध्द प्रकरण दिवाणी न्यायालयात दाखल करुन दाद मागावी असे अपीलकर्त्यास पोलीस स्टेशन कळमेश्वर यांनी कळविलेले आहे. तथापी याबाबत अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की खोटया सहया करुन व धोकाधाडी करुन केलेल्या तक्रार अर्जावर कार्यवाही करणे आवश्यक आहे असे अपीलकर्ता यांचे म्हणणे आहे. त्याबाबत जन माहिती अधिकारी यांनी आयोगा पुढे असे सांगितले की प्रस्तूत प्रकरणात अर्जदार व गैर अर्जदार यांचे घेण्यात आलेले स्वाक्षरी व अंगठयाचे ठसे नमुने तपासणी करीता मा. मुख्य शासकीय दस्तऐवज परीक्षक गुन्हे अन्वेशन विभाग नागपूर यांचेकडे दि. 31.12.2010 अन्वये दाखल करण्यात आला असून अहवाल प्राप्त होणे बाकी आहे. तज्ञाचा अहवाल प्राप्त झाल्यावर त्यानुसार पुढील कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल असे जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीत नमुद केले.

6. अपीलकर्ता तसेच जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही न्यायालयातील दिवाणी स्वरुपाची आहे. तथापी खोटया सहया व अंगठे केल्याबद्यल केलेल्या तक्रारीच्या संदर्भात केलेली कार्यवाही ही अपीलकर्त्यास उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी सावनेर यांनी अपीलकर्ता यांना सहया व अंगठे तपासणी बाबतचा तज्ञाचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी पुढील योग्य ती

कार्यवाही करण्यात येईल असे स्पष्टपणे लेखी कळवावे. तसेच सहया व अंगठे तपासणी बाबतचा अहवाल तज्ञाकडून मागविण्यासाठी पुन्हा तज्ञास 8 दिवसाचे आंत स्मरणपत्र देवून लवकरात लवकर तज्ञाचा अहवाल मागवावा आणि त्या स्मरणपत्रात राज्य माहिती आयोगाकडील आजच्या सुनावणीचा संदर्भ नमुद करावा आणि त्याची प्रत अपीलकर्त्यास पाठवावी.

तसेच सहया व अंगठयाचे दस्तऐवज तपासणीसाठी पाठवितांना त्या प्रपत्रात मानवटकरच्या ऐवजी नानवटकर असे टंकलेखनाची चुक झालेली दिसून येते. ती त्वरीत दुरुस्त करण्याची कार्यवाही जन माहिती अधिकारी यांनी करावी.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

( पी. डब्ल्यु. पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**नागपूर**
Ageyord6.1857-1860

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 301 नाग/2011**

श्री दिलीप गजाननराव खेडीकर
नयापुरा राम मंदिर जवळ, प्रेम नगर,
वार्ड क्र. 34 नागपूर
ता. जि. नागपूर –2 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री प्रकाश वराडे
प्रथम अपीलीय अधिकारी तथा समाज कल्याण अधिकारी
महानगर पालिका नागपूर
ता. जि. नागपूर
2) श्रीमती सुलभा करडे
जन माहिती अधिकारी सहाय्यक अधिक्षक
महानगर पालिका नागपूर
ता. जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 4.6.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 18.2.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 5.5.2011 रोजी नोटीस काढून दि. 4.6.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हे स्वतः हजर होते. त्यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 6.8.2010 रोजी जन माहिती अधिकारी महानगर पालिका नागपूर यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन सन 2007–2008 2008–2009 आणि 2009–2010 या कालावधीत घेतलेले आरोग्य शिबीर, वर्क ऑर्डर, काढलेल्या निविदा म.न.पा.द्वारे दिलेले निधी, वाटप केलेले शिलाई मशीन इत्यादीची माहिती मागितलेली होती. जन माहिती अधिकारी यांचेकडून माहिती प्राप्त झाली. मात्र प्राप्त झालेली माहिती ही अपूर्ण असल्यामुळे त्यांनी प्रथम अपील समाज कल्याण अधिकारी महानगर पालिका नागपूर यांचेकडे दाखल केले. मात्र त्यानंतरही त्यांना अपेक्षित माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अधिक्षक महानगर पालिका नागपूर श्रीमती सुलभा करडे हया उपस्थित होत्या. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा प्रभारी समाज कल्याण अधिकारी श्री प्रकाश वराडे हे उपस्थित होते.

4. जन माहिती अधिकारी यांनी आजच्या सुनावणीस आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 6.8.2010 चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे दि. 10.8.2010 रोजी प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही संकलीत करण्यात आली. त्यानुसार दि. 4.9.2010 च्या पत्राने अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन दिली. तथापी आरोग्य विभागाची माहिती अपीलकर्त्यास दि. 30.10.2010 च्या पत्राने दिली. कारण आरोग्य विभागाचे कर्मचारी हे धार्मीक कामाच्या निमित्ताने हज यात्रेला गेले होते. दि. 4.10.2010 च्या पत्राने आणि दि. 30.10.2010 च्या पत्राने जन माहिती अधिकारी यांनी पाठविलेली माहिती अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याचे त्यांनी सुनावणीत मान्य केले. मात्र पाठविलेल्या माहितीच्या संदर्भात त्यांचे समाधान झाले नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील दाखल केले होते. तथापी त्यानंतरही त्यांना समाधानकारक माहिती मिळाली नाही असे त्यांनी आयोगापुढे सांगितले. त्यांनी आयोगा पुढे आणखी असे सांगितले की जन माहिती अधिकारी यांनी त्यांना उपलब्ध करुन दिलेल्या माहिती मध्ये महानगर पालिकेने एकूण 364 शिलाई यंत्र खरेदी केलेले आहे. मात्र प्रत्यक्ष वाटप हे 277 चा झालेला आहे. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी असे नमुद केले की राहिलेले शिलाई यंत्र वाटप करण्याची प्रक्रिया ही सुरु आहे तसेच महिला व बाल कल्याण विभागा मार्फत महिलांसाठी हळदी कुंकवा सारखे जे कार्यक्रम केलेले आहे त्यामध्ये एकुण खर्च रु. 1,39,500/- नमुद केलेला आहे. त्या खर्चाच्या बीलाच्या सत्यप्रती त्यांना उपलब्ध झालेल्या नाही. तसेच महानगर पालिकेने रुग्णांना जी औषधी वाटप केलेली आहे ती औषधी प्रत्यक्ष स्वरुपात कोणत्या रुग्णांला किती वाटप केलेली आहे त्याचे विवरण त्यांना प्राप्त झालेले नाही. त्याचप्रमाणे आरोग्य विभागा मार्फत घेतलेल्या शिबीरांच्या संदर्भात मागितलेल्या निविदेची माहिती व त्यांना दिलेल्या बीलांच्या प्रती त्यांना मिळालेल्या नाहीत असे अपीलकर्त्याने आयोगाच्या निदर्शनास आणून दिले.

6. अपीलकर्ता तसेच जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की अपीलकर्त्यास जन माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. तथापी त्या माहितीच्या संदर्भात वर नमुद केल्याप्रमाणे राहिलेली माहिती अपीलकर्त्यास पुन्हा जन माहिती अधिकारी यांनी विनामुल्य उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना वर नमुद केलेल्या मुद्यांची माहिती विनामुल्य व्यक्तीशः किंवा रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन द्यावी.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

( पी. डब्ल्यु. पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**नागपूर**
Ageyord6.1858-1860

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 302 नाग/2011**

श्री गौतम भिकाजी वासनिक
मु. पो. बुधवारी पेठ वार्ड क्र.3, उमरेड
ता. उमरेड जि. नागपूर –441203 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा जिल्हा आरोग्य अधिकारी,
जिल्हा परिषद नागपूर
ता. जि. नागपूर

2) श्री डॉ. संजय माने
जन माहिती अधिकारी तथा वैद्यकीय अधिकारी,
प्राथमिक आरोग्य केंद्र पाचगाव
ता. उमरेड जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 4.6.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 18.2.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 5.5.2011 रोजी नोटीस काढून दि. 4.6.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 25.10.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा वैद्यकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र पाचगाव ता. उमरेड यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान अंतर्गत राबविण्यात येणा–या सुविधा व कंत्राटी कर्मचारी व इतर कर्मचारी इत्यादीबाबत 1 ते 23 मुद्यांवर माहिती मागितलेली होती. तथापी त्यांना 30 दिवसात कोणतीही माहिती प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद नागपूर यांचेकडे दाखल केले. मात्र प्रथम अपीलाचा

कोणताही निर्णय त्यांना प्राप्त झाला नाही म्हणून म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा वैद्यकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र पाचगाव डॉ. संजय माने हे उपस्थित होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा जिल्हा आरोग्य अधिकारी, यांच्या वतीने श्री योगेश संगेवार हे उपस्थित होते.

4. जन माहिती अधिकारी तथा वैद्यकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र पाचगाव डॉ. संजय माने यांनी आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 25.10.2010 चा माहितीचा अर्ज प्राथमिक आरोग्य केंद्रात प्राप्त झाला आहे. मात्र सदरचा अर्ज कोणत्या तारखेला प्राप्त झाला आहे त्याची नोंद दिसून येत नाही. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा वैद्यकीय अधिकारी, डॉ. संजय माने यांची नेमणूक या आरोग्य केंद्रावर दि. 18.11.2010 रोजी झालेली आहे त्या पूर्वीच सदरचा माहितीचा अर्ज प्राथमिक आरोग्य केंद्रात प्राप्त झाल्याचे दिसून येते. या प्राथमिक आरोग्य केंद्रातील कनिष्ठ लिपीकाचे पद हे रीक्त असल्यामुळे त्याची नोंद झालेली दिसत नाही असे जन माहिती अधिकारी यांनी सांगितले. मात्र अपीलकर्त्याने दि. 6.12.2010 च्या पत्राने माहिती उपलब्ध करुन देण्याबाबत पत्र लिहिले ते पत्र वैद्यकीय अधिकारी यांचेकडे दि. 10.12.2010 रोजी प्राप्त झाले. त्या वेळेला अपीलकर्त्यास दि. 25.10.2010 चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयात शोध घेतला असतातो निदर्शनास आला. त्यानंतर प्राथमिक आरोग्य केंद्रातील कनिष्ठ सहाय्यक श्री साळवे यांचेकडे ज्या प्राथमिक आरोग्य केंद्रातील कनिष्ठ सहाय्यकाचा अतिरिक्त पदभार आहे त्यांच्याकडे तो देण्यात आला आणि अपीलकर्त्याने मागितलेली माहिती काढण्यात आली आणि सदरची माहिती दि. 16.12.2010 रोजी तयार करुन अपीलकर्त्यास पाठविण्यात आली. विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी कनिष्ठ सहाय्यक श्री साळवे यांचेकडे दिली. सदरची माहिती कनिष्ठ सहाय्यक श्री साळवे यांनी तालुका आरोग्य अधिकारी उमरेड यांच्या कार्यालयातील कर्मचा–याला अपीलकर्ता हे उमरेड येथे राहात असल्यामुळे त्यांना देण्यास कळविले. तथापी अपीलकर्त्यास सदरची माहिती उपलब्ध झाली नाही असे अपीलकर्त्याने सुनावणीत नमुद केले. म्हणून सदरची माहिती अपीलकर्त्यास आयोगा समोर सुनावणीच्या वेळी उपलब्ध करुन दिली. मात्र सदरची माहिती विलंबाने उपलब्ध झाल्यामुळे जन माहिती अधिकारी यांचे विरुध्द कार्यवाही करावी असे त्यांनी नमुद केले. अपीलकर्त्याने प्रथम अपील जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद नागपूर यांचेकडे दाखल केले होते. त्या प्रथम अपीलाचा निर्णय त्यांनी दिलेला दिसून येत नाही.

5. अपीलकर्ता तसेच जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की अपीलकर्त्याच्या दि. 25.10.2010 च्या माहिती अर्जाला अनुसरुन विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास 30 दिवसात कोणतीही माहिती उपलब्ध करुन दिली नाही तसेच दि. 16. 12.2010 च्या पत्रान्वये तयार केलेली माहिती देखील अपीलकर्त्यास पोस्टाने पाठविलेली नाही कारण अपीलकर्त्याने पोस्टाने माहिती मागितलेली होती. म्हणून आज आयोगा समोर अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन देण्यात आली. परंतू सदरची माहिती उपलब्ध करुन देण्यास विलंब झाल्याचे दिसून येते. सदरच्या विलंबा बद्यल जन माहिती अधिकारी यांना विचारणा केली असता त्यांनी असे नमूद केले आहे की अपीलकर्त्यास तालुका आरोग्य अधिकारी उमरेड यांच्या कार्यालयातील कर्मचा–या मार्फत माहिती पाठविण्यात आली होती. परंतू अपीलकर्त्यास सदरची माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून यामध्ये असे दिसून येते की जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास माहिती देण्याबाबत खबरदारी घेतलेली नाही. म्हणून विलंबाबद्यल जन माहिती अधिकारी यांनी केलेला खुलासा मान्य करता येत नाही.

6. तसेच प्रथम अपील दि. 27.12.2010 रोजी जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद नागपूर यांचेकडे दाखल झालेले होते. त्यांनी प्रथम अपीलाची सुनावणी दि. 24.1. 2010 रोजी घेतली होती. परंतू प्रथम अपीलाचा निर्णय त्यांनी दिलेला दिसून येत नाही. म्हणून माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (1) अन्वये प्रथम अपीलीय अधिकारी यांच्यावर सोपविलेली जबाबदारी त्यांनी पार पाडलेली नाही. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.
2) विद्यमान जन माहिती अधिकारी तथा वैद्यकीय अधिकारी, पाचगाव यांनी अपीलकर्त्याच्या दि. 25.10.2010 च्या माहिती अर्जाला अनुसरुन 30 दिवसाच्या मुदतीत कोणतीही माहिती उपलब्ध करुन देण्याबाबत खबरदारी घेतलेली नाही. त्यानंतर आयोगापुढे आजच्या सुनावणीच्या वेळी अपीलकर्त्यास विलंबाने माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. तसेच विलंबा बद्यल वर नमुद केल्याप्रमाणे केलेला खुलासा मान्य करता येत नाही. म्हणून म्हणून त्यांचे विरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 20 (1) अन्वये रु. 2000/– ची शास्तीची कार्यवाही करण्यात येत आहे. सदरच्या शास्तीची वसुली ही त्यांचे दरमहाचे वेतनातून वसुल

करावयाची असून लेखाशिर्ष ''0070–इतर प्रशासनिक सेवा, 60, इतर सेवा, 800, इतर जमा रकमा, (18) माहितीचा अधिकार (0070–016'1)'' मध्ये जमा करावी. सदरच्या शास्तीची रक्कम जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद नागपूर यांनी वसूल करावी.

3) प्रथम अपीलीय अधिकारी तथा जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद नागपूर यांनी प्रस्तूत प्रकरणात अपीलकर्त्याचा प्रथम अपीलाचा कोणताही निर्णय निर्गमित केला नाही म्हणून त्यांना याबाबत सक्त ताकीद देण्यात येत असून त्यांनी भविष्यात याची पुनरावृत्ती करु नये अशी समज त्यांना देण्यात येत आहे.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1862-1865

जा.क्र.––––––––– दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 159 नाग/2011**

श्री मुकेश जयदेवप्रसाद शाहू
रा. शॉप नं.8, गायत्री अपार्टमेंट, सोनबाजी नगर
भंडारा रोड नागपूर
ता. जि. नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी
चुंगी विभाग, महानगर पालिका नागपूर
संत्रा मार्केट नागपूर 440018
2) श्री व्ही. ए. बागल
जन माहिती अधिकारी तथा सहा.चुंगी अधिक्षक
चुंगी विभाग, महानगर पालिका नागपूर
संत्रा मार्केट नागपूर 440018 ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 6.6.2011 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 24.1.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 18.3.2011 रोजी नोटीस काढून दि. 3.4.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. मात्र सदरच्या दिवशी सुनावणी न होवू शकल्यामुळे प्रस्तुत सुनावणी आज दि. 6.6.2011 रोजी घेण्यात आली. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हे स्वतः हजर होते. त्यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 7.12.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा सहा.चुंगी अधिक्षक चुंगी विभाग, महानगर पालिका नागपूर यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन 1) ऑरेंज सिटी स्टिल प्लॅट लिमिटेड रनाळा त. कामठ जि.नागपूर 2) राजू स्टिल इंडस्ट्रीज बगडगंज नागपूर 3)जमनादास ॲन्ड कंपनी इतवारी नागपूर 4) संतोष स्टिल एन्टरप्रायझेस बगडगंज नागपूर 5) विनय स्टिल इतवारी नागपूर या पाच कंपन्यांनी दि. 1.4.2004 ते दि. 30.11.2010 पावेतोचा जकात कर भरल्याबाबतचे कागदपत्रे बील व घोषणा पत्राच्या प्रती मागितलेल्या होत्या. त्यांना जन माहिती अधिकारी यांचेकडून दि. 8.12.2010 च्या पत्राने असे कळविले की आपण मागितलेली माहिती ही दि. 1.4.2004 ते दि. 30.11.2010 म्हणजे सुमारे 6 वर्षाच्या कालावधीची असल्यामुळे ती माहिती काढण्यास कालावधी लागू शकेल आणि जशी जशी माहिती

उपलब्ध होईल त्याप्रमाणे आपणास माहिती पाठविण्यात येईल असे त्यांना जन माहिती अधिकारी यांनी कळविले. त्यानंतर दि. 15.12.2010 च्या पत्राने पुन्हा जन माहिती अधिकारी यांनी त्यांना माहितीचे शुल्क रु. 210/— भरण्याबाबत कळविले. सदरचे शुल्क भरणा करुन त्यांना काही माहिती मिळाली. त्याचप्रमाणे दि. 13.1.2011 च्या पत्राने रु. 1000/— आणि दि. 20.1.2011 च्या पत्राने रु. 2163/— माहितीचे शुल्क भरण्याबाबतही कळविले होते. तसेच दि. 19.1.2011 च्या पत्राने रु. 4326/— माहितीचे शुल्क भरण्याबाबत पुन्हा कळवून पुढील माहिती जस जशी संकलीत होईल त्याप्रमाणे कळविण्यात येईल असे देखील जन माहिती अधिकारी यांनी त्यांना कळविल्याचे अपीलकर्त्याने सुनावणीत नमुद केले.

3. त्याचप्रमाणे अपीलकर्त्याने आयोगाच्या असेही निदर्शनास आणून दिले की जन माहिती अधिकारी यांनी माहितीचे शुल्क कळविल्याप्रमाणे त्यांनी काही शुल्क भरणा केलेला आहे आणि काही माहितीचे शुल्क अद्याप भरणा करावयाचे बाकी आहे ते शुल्क भरण्यास तयार आहेत. परंतू जन माहिती अधिकारी यांचेकडून त्यांना माहिती उपलब्ध करुन देण्याबाबत नेहमी त्रास होत असतो आणि त्यांची वागणूक नागरीकांशी सौजन्याचे नसते असे अपीलकर्त्याने आयोगाच्या निदर्शनास आणून दिले.

4. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी श्री बागल तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या वतीने श्री देशमुख हे उपस्थित होते.

5. जन माहिती अधिकारी श्री बागल यांनी आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 7.12.2010 चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने मागितलेल्या माहितीचा कालावधी हा सुमारे 6 वर्षाचा असून माहिती ही व्यापक स्वरुपाची असल्यामुळे माहिती संकलीत करण्यास कालावधी लागू शकेल याबाबतची कल्पना अपीलकर्त्यास दि. 8.12.2010 च्या पत्राने लेखी कळवून दिलेली होती. त्यानंतर अपीलकर्त्याने मागितलेल्या माहितीपैकी जी माहिती त्यांचेकडे संकलीत झाली त्या माहितीचे शुल्क भरण्याबाबत अपीलकर्त्यास दि. 15.12.2010, दि. 13.1.2011, दि. 20.1.2011, तसेच दि. 19.1.2011 च्या पत्राने कळविलेले होते. त्यानंतर अपीलकर्त्याने ज्या माहितीचे शुल्क भरले ती माहिती त्यांना देण्यात आलेली आहे. मात्र आता पुन्हा अपीलकर्त्याने माहितीचे शुल्क रु. 9936/— भरणा केल्यास त्यांना माहिती उपलब्ध करुन देण्याबाबत दि. 10.2.2010 च्या पत्राने कळविलेले आहे. सदरचे शुल्क भरण्याची तयारी अपीलकर्त्याने आयोगापुढे मान्य केले. मात्र जन माहिती अधिकारी यांची माहिती उपलब्ध करुन देतांना सौजन्याची वागणूक नसते म्हणून त्याबाबत त्यांना निर्देश देण्याबाबत त्यांनी आयोगापुढे नमुद केले.

6. अपीलकर्ता तसेच जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की अपीलकर्त्याने माहितीचे शुल्क भरण्याचे आयोगापुढे मान्य केले. मात्र माहितीचे शुल्क भरल्यानंतर त्यांना त्वरीत माहिती उपलब्ध होणे आवश्यक आहे. म्हणून प्रस्तूत प्रकरणात जन माहिती अधिकारी यांना निर्देश देण्यात येत आहे की अपीलकर्त्याने माहितीचे शुल्क भरणा केल्यानंतर त्वरीत माहिती उपलब्ध करुन

द्यावी आणि भविष्यात अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन देतांना कोणत्याही प्रकारचा त्रास होणार नाही याची दक्षता व काळजी घ्यावी अशी समज जन माहिती अधिकारी यांना देण्यात येत आहे. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.
2) अपीलकर्ता यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे आवश्यक ते माहितीचे शुल्क भरणा करावे आणि अपीलकर्त्याने माहितीचे शुल्क भरल्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास त्वरीत माहिती उपलब्ध करुन द्यावी.
3) जन माहिती अधिकारी यांनी भविष्यात माहितीच्या अधिकाराखाली माहिती देतांना नागरीकांशी सौजन्यापूर्वक वागणूक ठेवावी अशी त्यांना समज देण्यात येत आहे.
4) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1867-1869

जा.क्र.————————— दि..................
मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 309 नाग/2011**

श्री मंगेश वामनराव येवले
मु. पो. पालांदूर(चौ.)
ता. लाखनी जि. भंडारा ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्रीमती वसुधा नाईक
प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपसंचालक(संशोधन)
अनुसूचित जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती नागपूर
गिरीपेठ नागपूर
2) श्री आर. आर. गायकवाड
जन माहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी
अनुसूचित जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती नागपूर
गिरीपेठ नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 6.6.2011 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 21.2.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 7.5.2011 रोजी नोटीस काढून दि. 6.6.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 13.12.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी अनुसूचित जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती नागपूर यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन अनुसूचित जमाती मध्ये मोडणा–या गौड, परधान, हलबा, हलबी जमातीची सामाजिक, सांस्कृतिक प्रथा व परंपरा विषयी माहिती मागितलेली होती. मागितलेल्या माहिती मध्ये या जमातीचे मुळ वास्तव्य, ठिकाण कोणते आहे तसेच जमातीची मातृभाषा कोणती आहे बोलीभाषा कोणती आहे इत्यादी 1 ते 20 मुद्यांवर प्रश्नार्थक स्वरुपात माहिती मागितलेली आहे. त्यांना दि. 21.12.2010 च्या पत्राने जन माहिती अधिकारी यांनी असे कळविले की आपण मागितलेल्या माहिती मध्ये मुद्या क्र. 1 ते 20 चे कोणतेही कागदपत्रे त्यांच्या कार्यालयातील अभिलेखात नसल्यामुळे ती माहिती देता येत नाही. म्हणून त्यांनी प्रथम अपील उपसंचालक यांचेकडे दाखल केले. उपसंचालक यांनी दि. 9.2.2011 च्या पत्राने जन माहिती अधिकारी यांच्या दि. 21.12.2010 च्या पत्राने अपीलकर्त्यास दिलेली माहिती योग्य ठरवून प्रथम अपील फेटाळलेले आहे. म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी श्री गायकवाड आणि प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपसंचालक श्रीमती वसुधा नाईक हया उपस्थित होत्या.

4. जन माहिती अधिकारी यांनी आजच्या सुनावणीस आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 13.12.2010 चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने वर नमुद केल्याप्रमाणे 1 ते 20 मुद्यांवर प्रश्नार्थक स्वरुपात माहिती मागितलेली होती.

तसेच अपीलकर्त्याने मागितलेल्या माहितीमध्ये कोणत्याही कागदपत्रांची मागणी केलेली नव्हती तसेच अपीलकर्त्याने मागितलेल्या 1 ते 20 प्रश्नार्थक स्वरुपात माहितीच्या अर्जात त्यांच्या कार्यालयाकडे कोणतही माहिती उपलब्ध नव्हती म्हणून अपीलकर्त्यास दि. 21.12..2010 च्या पत्राने माहिती उपलब्ध नाही असे कळविले. त्यानंतर अपीलकर्त्याने प्रथम अपील उपसंचालक यांचेकडे दाखल केले. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी व जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दि. 21.12..2010 च्या पत्राने कळविलेली माहिती योग्य ठरविलेली आहे.

6. अपीलकर्ता तसेच जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही प्रश्नार्थक स्वरुपाची आहे. तसेच जमातीची मातृभाषा किंवा बोलीभाषा कोणती, देवदेवतांचे मुळ कोणते इत्यादींची माहिती प्रश्नार्थक स्वरुपात दिसते. अशी प्रत्येक जमातीची कोणतीही माहिती जन माहिती अधिकारी यांचेकडे उपलब्ध नाही. मात्र अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र देण्याच्या वेळी सक्षम अधिका—यानी घ्यावयाची दक्षता याबाबतचे आदिवासी विकास विभागाचे दि. 24.4.1985 चे मार्गदर्शनपर सुचना आहे. त्याची प्रत अपीलकर्त्यास आदिवासी संशोधन संस्था पुणे यांचेकडून यापूर्वीच प्राप्त झालेली आहे. त्या व्यतिरीक्त इतर मार्गदर्शनपर सुचना उपलब्ध नाही असे जन माहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगाच्या निदर्शनास आणून दिले. म्हणून अनुसूचित जमातीच्या संदर्भातील मार्गदर्शनपर सुचनांचे परीपत्रक अपीलकर्त्यास उपलब्ध झाली असल्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1871-1872

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 237 नाग/2011**

श्री भिमराव शामराव केवटे
40, सन्मार्ग नगर, हुडकेश्वर रोड नागपूर
ता. जि. नागपूर – 440034 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहाय्यक महाव्यवस्थापक(भ.नि.नि.)
भविष्य निर्वाह निधी विभाग एम.एस.ई.बी. मुंबई एस्ट्रेला बॅटरीज विस्तार इमारत,
तळमजला, धारावी रोड, माटुंगा(पूर्व) मुंबई 400019
2) श्री अशोक मारवाडी
जन माहिती अधिकारी तथा लेखाधिकारी,
भविष्य निर्वाह निधी विभाग एम.एस.ई.बी. मुंबई एस्ट्रेला बॅटरीज विस्तार इमारत,
तळमजला, धारावी रोड, माटुंगा(पूर्व) मुंबई 400019 ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 6.6.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 10.2.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 20.4.2011 रोजी नोटीस काढून दि. 25.5.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. मात्र सदरच्या दिवशी सुनावणी न होवू शकल्यामुळे प्रस्तुत सुनावणी आज दि. 6.6.2011 रोजी घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता यांच्या वतीने ॲड. मंडलेकर यांनी अपीलकर्ता यांची बाजू मांडली. ॲड. मंडलेकर यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 29.10.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा लेखाधिकारी, भविष्य निर्वाह निधी विभाग विभाग मुंबई(एम.एस.ई.बी.) एस्ट्रेला बॅटरीज विस्तार इमारत, तळमजला, धारावी रोड, माटुंगा(पूर्व) मुंबई यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन अपीलकर्ता यांचे भविष्य निर्वाह निधी खाते क्र. एमएच/1251/1496 मध्ये दि. 4.9.2004 ला जमा झालेली राशी आणि त्यामध्ये जमा झालेले व्याज तसेच त्यांच्या पेंशन प्रस्तावाबाबत 1 ते 14 मुद्यांवर माहिती मागितलेली होती. जन माहिती अधिकारी यांनी त्यांना दि. 15. 11.2010 च्या पत्राने अपूर्ण माहिती दिली आणि मुद्या क्र. 2,4,6,8,9,12 ची माहिती आयुक्त भविष्य निर्वाह निधी यांचेकडून घ्यावी असे त्यांनी कळविले. मात्र माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 6(3) अन्वये सदरचा माहितीचा अर्ज आयुक्त भविष्य निर्वाह निधी यांचेकडे हस्तांतर केला नाही. वास्तविक पाहता जन माहिती अधिकारी यांनी सदरचा माहितीचा अर्ज आयुक्त भविष्य निर्वाह निधी कार्यालयाकडे हस्तांतरण करणे आवश्यक होते त्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी कार्यवाही केलेली नाही म्हणून जन माहिती अधिकारी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 6(3) चे उल्लंघन केलेले आहे. म्हणून त्यांचे विरुध्द कार्यवाही व्हावी असे त्यांनी सांगितले. तसेच पेंशन प्रस्ताव मंजुरीसाठी 6 वर्षाचा कालावधी लागला. विलंबाबद्यलची कागदपत्रेही जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिली नाही असे ॲड. मंडलेकर यांनी सांगितले. तसेच प्रथम अपील सहाय्यक महाव्यवस्थापक(भ.नि.नि.) भविष्य निर्वाह निधी विभाग मुंबई(एम.एस.ई.बी.) एस्ट्रेला बॅटरीज विस्तार इमारत, तळमजला, धारावी रोड, माटुंगा(पूर्व) मुंबई यांचेकडे दाखल केल्यानंतर प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपीलाची

सुनावणी घेतली नाही आणि प्रथम अपीलाचा निर्णय देखील दिलेला नाही म्हणून प्रथम अपीलीय अधिकारी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (1) प्रमाणे त्यांचेवर सोपविलेली जबाबदारी त्यांनी पार पाडलेली नाही म्हणून त्यांचे विरुध्दही कार्यवाही करावी असे त्यांनी सुनावणीत सांगितले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी श्री अशोक मारवाडी हे उपस्थित होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहाय्यक महाव्यवस्थापक यांच्या वतीने श्री डी. डी. भोळे कनिष्ठ व्यवस्थापक हे उपस्थित होते.

4. जन माहिती अधिकारी यांनी आजच्या सुनावणीस आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 29.10.2010 चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. त्या अर्जाला अनुसरुन अपीलकर्त्यास दि. 15.11.2010 च्या पत्राने त्यांच्या कार्यालयाशी संबंधीत असलेली माहिती उपलब्ध करुन दिली. तथापी अपीलकर्त्याने विचारलेली काही मुद्यांची माहिती आयुक्त भविष्य निर्वाह निधी या कार्यालयाशी संबंधीत असल्याचे अपीलकर्त्यास कळविले.

5. वास्तविक पाहता जन माहिती अधिकारी यांनी सदरचा माहितीचा अर्ज माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 6 प्रमाणे अपीलकर्त्यास माहिती देण्यासाठी आयुक्त भविष्य निर्वाह निधी कार्यालयाकडे कलम 6 प्रमाणे 5 दिवसाच्या आत हस्तांतर करणे आवश्यक होते मात्र जन माहिती अधिकारी यांनी त्याप्रमाणे अर्जाचे हस्तांतर केलेले नाही तसेच त्यांच्या कार्यालयाकडे उपलब्ध असलेल्या माहितीच्या अर्जात अपीलकर्त्याचा पेंशन प्रस्ताव मंजुर होण्यासाठी विलंब लागला आहे. परंतू विलंबाबतचे कागदपत्र अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिलेले नाही असे अपीलकर्त्याच्या वकीलांनी सुनावणीत नमुद केले.

6. प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या वतीने उपस्थित असलेले श्री भोळे यांनी आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचे प्रथम अपील सहाय्यक महाव्यवस्थापक(भ.नि.नि.) एम.एस.ई.बी. मुंबई यांच्याकडे प्राप्त झाले होते. मात्र प्रथम अपीलाची सुनावणी घेवून निर्णय दिला नाही. तथापी अपीलकर्त्यास दि. 6.1.2010 च्या पत्राने आवश्यक माहिती उपलब्ध करुन देण्याचे नमुद केले.

7. अपीलकर्ता यांचे वकील ॲड. मंडलेकर तसेच जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्याचा दि. 29.10.2010 चा माहितीचा अर्ज वर नमुद केल्याप्रमाणे आयुक्त भविष्य निर्वाह निधी यांचेकडे कलम 6 (3) प्रमाणे हस्तांतर केलेला नाही. त्यामुळे अपीलकर्त्यास भविष्य निर्वाह निधी संदर्भात कोणतीही माहिती उपलब्ध झालेली दिसत नाही. सदरच्या अर्जाचे हस्तांतर कार्यालयातील कामकाजाच्या व्यापामुळे आणि कर्मचा–याची पदे रिक्त असल्यामुळे झालेले नाही असे जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीत नमुद केले. मात्र जन माहिती अधिकारी यांनी केलेला खुलासा हा मान्य करण्यासारखा नाही. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 3 दिवसाच्या आंत जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता याचा माहितीचा अर्ज आयुक्त भविष्य निर्वाह निधी यांचेकडे हस्तांतर करुन अपीलकर्ता यांना कळवावे. तसेच जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्याचा माहितीचा अर्ज आयुक्त भविष्य निर्वाह निधी यांचेकडे कलम 6 (3) प्रमाणे हस्तांतर केलेला नाही. त्यामुळे अपीलकर्त्यास त्यांच्या भविष्य निर्वाह निधी संदर्भात कोणतीही माहिती उपलब्ध झालेली नाही. म्हणून या विलंबास जन माहिती

अधिकारी हे जबाबदार दिसून येतात. म्हणून त्यांचे विरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 20 (1) प्रमाणे रु. 2000/— ची शास्तीची कार्यवाही लादण्यात येत आहे. सदरच्या शास्तीची वसुली ही त्यांचे दरमहाचे वेतनातून वसुल करुन लेखाशिर्ष ''0070—इतर प्रशासनिक सेवा, 60, इतर सेवा, 800, इतर जमा रकमा, (18) माहितीचा अधिकार (0070—016'1)'' मध्ये जमा करावी.

2) त्याचप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना पेंशन मंजुरी बाबत झालेल्या विलंबा संदर्भात झालेल्या पत्रव्यवहाराच्या प्रती विनामुल्य अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन द्याव्या.

3) तत्कालीन प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहाय्यक महाव्यवस्थापक यांनी प्रथम अपीलाची सुनावणी घेवून कोणताही निर्णय दिलेला नाही त्यामुळे त्यांना याबाबत सक्त ताकीद देण्यात येत असून भविष्यात याबाबतची पुनरावृत्ती करु नये अशी समज त्यांना देण्यात येत आहे.

4) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

( पी. डब्ल्यु. पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**नागपूर**
Ageyord6.1874-1876

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 316 नाग/2011**

श्री प्रशांत रमेशराव धिरडे
18, व्यवहारे ले–आऊट गोपाल नगर नागपूर
ता. जि. नागपूर –440022 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपसचिव
नगर विकास विभाग
मंत्रालय मुंबई 32
2) श्री प्रदीप गोहील
जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, (नवि 9)
नगर विकास विभाग
मंत्रालय मुंबई 32 ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 7.6.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 22.2.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 7.5.2011 रोजी नोटीस काढून दि. 7.6.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हे स्वतः हजर होते. त्यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 18.9.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, (नवि 9) नगर विकास विभाग मंत्रालय मुंबई यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन 27 फेब्रुवारी 2001 रोजी प्रसिध्द केलेली अधिसुचना क्र. टीपीएस–2401/855/सीआर 76/युडी9 या अधिसुचनेची संपूर्ण नस्तीची कार्यालयीन टिपणी तसेच इतर कागदपत्रासहीत माहिती मागितलेली होती. तथापी जन माहिती अधिकारी यांनी दि. 15.10.2010 रोजी असे कळविले की विषयांकीत नस्तीचा या कार्यालयाच्या अभिलेखात शोध घेण्यात येत आहे सदर नस्ती प्राप्त झाल्यानंतर लगेच छाया प्रत आपणास उपलब्ध करुन देण्यात येईल असे जन माहिती अधिकारी यांनी त्यांना कळविले. मात्र त्यानंतर त्यांना माहिती मिळाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील उपसचिव नगर विकास विभाग मंत्रालय मुंबई यांचेकडे दाखल केले. सदर प्रथम अपीलाची सुनावणी घेण्यात आली आणि प्रथम अपीलाचा निर्णय दि. 7.1.2011 रोजी देण्यात आला आणि त्यामध्ये असे नमुद केले की जन माहिती अधिकारी यांनी कार्यासनाच्या अभिलेखात शोध घेवून अपीलकर्त्यास 15 दिवसात माहिती उपलब्ध करुन द्यावी असा प्रथम अपीलाचा निर्णय देण्यात आला मात्र त्यानंतरही त्यांना माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, (नवि 9) नगर विकास विभाग मंत्रालय मुंबई श्री प्रदीप गोहील हे उपस्थित होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपसचिव यांच्या वतीने त्यांनाच प्राधिकृत करण्यात आले आहे.

4. जन माहिती अधिकारी यांनी आजच्या सुनावणीस आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 18.9.2010 चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे दि. 23.9.2010 रोजी प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने मागितलेल्या माहितीच्या नस्तीचा शोध घेण्यात आला परंतू सदरची नस्ती



प्राप्त झाली नाही म्हणून अपीलकर्त्यास दि. 15.10.2010 रोजी असे कळविले की विषयांकीत नस्तीचा या कार्यालयाच्या अभिलेखात शोध घेण्यात येत आहे सदर नस्ती प्राप्त झाल्यानंतर लगेच छाया प्रत

आपणास उपलब्ध करुन देण्यात येईल. त्यानंतर अपीलकर्त्याने प्रथम अपील उपसचिव यांचेकडे दाखल केले. प्रथम अपीलाच्या निर्णयात देखील 15 दिवसात माहितीचा शोध घेवून माहिती उपलब्ध करुन देण्याचे आदेश दिलेले होते. त्याला अनुसरुन पुन्हा माहितीचा शोध घेण्यात आला परंतू नस्ती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन देता आली नाही असे जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीत नमुद केले.

5. अपीलकर्ता तसेच जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की अपीलकर्त्याने मागितलेल्या माहितीची नस्ती ही अभिलेख कक्षात उपलब्ध नाही. म्हणून अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन देता आली नाही असे दिसून येते. तथापी सदरची माहिती ही नागपूर महानगर पालिकेला महाराष्ट्र रीजनल ॲन्ड टाऊन प्लॅनिंग ॲक्ट 1966 अंतर्गत देण्यात येणा–या अधिकारा बाबतची महत्वाची नस्ती आहे असे अपीलकर्त्याने सुनावणीत नमुद केले. म्हणून सदरच्या महत्वाच्या नस्तीतील माहिती त्यांना प्राप्त होणे आवश्यक आहे असेही नमुद केले. म्हणून जन माहिती अधिकारी यांनी पुन्हा एकदा सदरच्या नस्तीचा त्यांच्या अभिलेख कक्षात 30 दिवसाच्या आत कसून शोध घेवून अपीलकर्त्यास विनामुल्य माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल. तथापी सदरची नस्ती उपलब्ध न झाल्यास त्याबाबत संबंधिता विरुध्द जबाबदारी निश्चित करणे योग्य होईल म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 30 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या अभिलेख कक्षात पुन्हा या नस्तीचा कसून शोध घ्यावा आणि नस्ती उपलब्ध झाल्यास अपीलकर्त्यास विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी. तथापी नस्ती उपलब्ध न झाल्यास त्याबाबत संबंधिता विरुध्द जबाबदारी निश्चित करावी आणि त्याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती अपीलकर्त्यास व आयोगाकडे सादर करावी.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1868-1869

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 315 नाग/2011**

श्री प्रशांत रमेशराव धिरडे
18, व्यवहारे ले–आऊट गोपाल नगर नागपूर
ता. जि. नागपूर –440022 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपसचिव
नगर विकास विभाग
मंत्रालय मुंबई 32
2) श्री प्रदीप गोहील
जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, (नवि 9)
नगर विकास विभाग
मंत्रालय मुंबई 32 ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 7.6.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 22.2.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 7.5.2011 रोजी नोटीस काढून दि. 7.6.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हे स्वतः हजर होते. त्यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 20.10.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, (नवि 9) नगर विकास विभाग मंत्रालय मुंबई यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन नागपूर शहराच्या विकास योजने संदर्भात दि. 7.1.2010 ते दि. 20.10.2010 या कालावधीतील फेरबदल करण्याबाबत प्राप्त सर्व अर्ज आणि त्यावरील शासन निर्णय त्याच्या सर्व संचिका, नामंजुरीचे पत्रे, प्रलंबीत पत्रे याबाबत माहिती मागितलेली होती. तथापी जन माहिती अधिकारी यांनी दि. 9.11.2010 रोजी असे कळविले की नागपूर मंजुर विकास योजने संदर्भात कलम 37(1) व कलम 37(1अे) अन्वये आवेदन व त्यावरील कार्यवाही बाबतची संपूर्ण कागदपत्रे आपण अपेक्षिली आहेत. आपण मागितलेली माहिती ही अतिशय विस्तृत स्वरुपाची आहे. त्यामुळे अशी माहिती पुरविता येणे शक्य होणार नाही. तथापि आपणास एखाद्या विशिष्ट प्रकरणाची माहिती आवश्यक असल्यास त्याबाबतचा सविस्तर तपशिल पुरविल्यास सदर माहिती आपणास पुरविण्यात येईल असे





जन माहिती अधिकारी यांनी त्यांना कळविल्यामुळे त्यांनी प्रथम अपील उपसचिव नगर विकास विभाग मंत्रालय मुंबई यांचेकडे दाखल केले. सदर प्रथम अपीलाची सुनावणी दि.

7.1.2011 रोजी घेण्यात आली आणि प्रथम अपीलाचा निर्णय दि. 7.1.2011 रोजी देण्यात आला आणि त्यामध्ये असे नमुद केले की नागपूर विकास योजना मंजुरी नंतर आजपर्यंतच्या कालावधीत मंजुर झालेल्या फेरबदलाची यादी संचालक नगर रचना महाराष्ट्र राज्य पुणे यांच्या कार्यालयाकडे उपलब्ध असल्यास प्राप्त होवू शकेल म्हणून त्यांचेकडे संपर्क साधण्याबाबत नमुद करुन प्रथम अपील निकाली काढले. तथापि यांना अपेक्षित माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले. जन माहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांनी त्यांच्या कार्यालयाकडे माहिती उपलब्ध असूनही देण्यास टाळाटाळ केली आहे म्हणून त्यांचेविरुध्द माहितीच्या अधिकारा अन्वये कार्यवाही करावी असे त्यांनी सुनावणीत सांगितले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, (नवि 9) नगर विकास विभाग मंत्रालय मुंबई श्री प्रदीप गोहील हे उपस्थित होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपसचिव यांच्या वतीने त्यांनाच प्राधिकृत करण्यात आले आहे.

4. जन माहिती अधिकारी यांनी आजच्या सुनावणीस आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 20.10.2010 चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे दि. 20.10. 2010 रोजी प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने नागपूर शहराच्या विकास योजने संदर्भात दि. 7.1.2010 ते दि. 20.10.2010 या कालावधीतील फेरबदल करण्याबाबत प्राप्त सर्व अर्ज आणि त्यावरील शासन निर्णय त्याच्या सर्व संचिका, नामंजुरीचे पत्रे, प्रलंबीत पत्रे याबाबत विस्तृत स्वरुपाची माहिती मागितलेली होती. तथापि सदरची माहिती व्यापक व विस्तृत स्वरुपात असल्यामुळे अपीलकर्त्यास दि. 9.11.2010 रोजी असे कळविले की नागपूर शहराच्या विकास योजने संदर्भात कलम 37(1) व कलम 37(1अे) अन्वये आवेदन व त्यावरील कार्यवाही बाबतची संपूर्ण कागदपत्रे आपण अपेक्षिली आहेत. आपण मागितलेली माहिती ही अतिशय विस्तृत स्वरुपाची आहे. त्यामुळे अशी माहिती पुरविता येणे शक्य होणार नाही. तथापि आपणास एखाद्या विशिष्ट प्रकरणाची माहिती आवश्यक असल्यास त्याबाबतचा सविस्तर तपशिल पुरविल्यास सदर माहिती आपणास पुरविण्यात येईल असे अपीलकर्त्यास कळविण्यात आले असे जन माहिती अधिकारी यांनी सांगितले. त्यानंतर अपीलकर्त्याने प्रथम अपील उपसचिव यांचेकडे दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी घेण्यात आली आणि प्रथम अपीलाचा निर्णय दि. 7.1.2011 रोजी देण्यात आला आणि त्यामध्ये असे नमुद केले की नागपूर विकास योजना मंजुरी नंतर आजपर्यंतच्या कालावधीत मंजुर झालेल्या फेरबदलाची यादी अपीलकर्त्याने संचालक नगर रचना महाराष्ट्र राज्य पुणे यांचे कडून प्राप्त करुन घेण्याबाबत अपीलकर्त्यास सुचित करुन प्रथम अपील निकाली काढले असेही जन माहिती अधिकारी यांनी सांगितले.





5. अपीलकर्ता तसेच जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की महाराष्ट्र रीजनल ॲन्ड टाऊन प्लॅनिंग ॲक्ट 1966 कलम

37(1) व कलम 37(1अे) याबाबतचे संपूर्ण अधिकार हे शासनाचे असल्यामुळे याबाबतची संपूर्ण माहिती शासन स्तरावरुन त्यांना प्राप्त होणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमुद केले. सदरचे अधिकार हे शासनाचे आहेत हे जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे मान्य केले. तथापि अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही सुमारे 10 वर्षाची आहे आणि सदरची माहिती नागपूर शहराच्या विकास आराखडयाशी संबंधीत असल्यामुळे अपीलकर्त्यास जनहिताच्या दृष्टीकोनातून उपलब्ध करुन देणे आवश्यक दिसून येते. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 60 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास त्यांच्याकडील दि. 20.10.2010 च्या माहिती अर्जातील माहिती विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी. केलेल्या कार्यवाहीची माहिती अपीलकर्त्यास व आयोगाकडे सादर करावी.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

( पी. डब्ल्यु. पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**नागपूर**
Ageyord6.1871-1873

जा.क्र.––––––––– दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 323 नाग/2011**

श्री दिलीप गजानन खेडीकर

नयापुरा राम मंदिर जवळ, प्रेमनगर वार्ड क्र.34 नागपूर
ता. जि. नागपूर –2 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री जयस्वाल
प्रथम अपीलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता
विद्युत विभाग नागपूर महानगर पालिका नागपूर
सिव्हील लाईन नागपूर
2) श्री हुमणे
जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त
सतरंजीपुरा झोन क्र.7 नागपूर महानगर पालिका
सतरंजीपुरा नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 8.6.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 23.2.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 9.5.2011 रोजी नोटीस काढून दि. 8.6.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हे स्वतः हजर होते. त्यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 1.10.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त
सतरंजीपुरा झोन क्र.7 नागपूर महानगर पालिका नागपूर यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन त्यानी दि. 26.8.2010 च्या तक्रारी नुसार म.न.पा. वार्ड क्र.34 प्रमनगरच्या दक्षिणेस लावलेल्या विद्युत पोल विषयी झालेल्या खर्चाबाबत व मरक्युरी लाईट वर होणा–या खर्चाबाबत माहिती मागितलेली होती. तथापी सदरचा माहितीचा अर्ज त्यांनी जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (विद्युत) महानगर पालिका नागपूर यांचेकडे करावयास पाहिजे होता. ही बाब प्रथम अपीलीय अधिकारी यांनी त्यांच्या निदर्शनास आणून दिली. त्यानंतर सदरचा माहितीचा अर्ज जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (विद्युत) महानगर पालिका नागपूर यांचेकडे प्रथम अपीलाच्या सुनावणीच्या वेळी देण्यात आला आणि त्यांना जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (विद्युत) महानगर पालिका नागपूर दि. 20.10.2010 च्या पत्राने माहिती उपलब्ध करुन दिली. तथापि विद्युत पोल वर झालेल्या खर्चाबाबत आणि त्याच्या लाईट बीलाची माहिती त्यांना मिळाली नाही असे त्यांनी सुनावणीत सांगितले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता विद्युत विभाग नागपूर महानगर पालिका नागपूर हे उपस्थित होते. त्यांनी आजच्या सुनावणीस आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा माहितीचा अर्ज जन माहिती अधिकारी यांचेकडे प्रथम अपीलाच्या सुनावणीच्या वेळी देण्यात आला आणि अपीलकर्त्याने मागितलेली माहिती अपीलकर्त्यास दि. 20.10.2010 च्या पत्राने उपलब्ध करुन दिली. सदरची माहिती अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याचे अपीलकर्त्याने सुनावणीत





मान्य केले. मात्र महानगर पालिका नागपूर वार्ड क्र.34 प्रेमनगर येथे लावलेल्या विद्युत पोल वर झालेल्या खर्चाबाबत आणि त्याच्या लाईटवर होणारा खर्च या विषयी त्यांना माहिती मिळालेली नाही असे त्यांनी नमुद केले. त्यावर जन माहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांनी असे

सांगितले की सदर विद्युत पोल हा नागपूर महानगर पालिकेने लावलेला नाही व त्यावर नागपूर महानगर पालिकेचा खर्च देखील झालेला नाही अशी माहिती अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिलेली आहे असे त्यांनी सांगितले.

4. अपीलकर्ता तसेच जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की जन माहिती अधिकारी यांचेकडून अपीलकर्त्यास आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यात येत आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1870-1871

जा.क्र.––––––––– दि..................
मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 322 नाग/2011

श्री दिलीप गजाननराव खेडीकर

नयापुरा राम मंदिर जवळ, प्रेमनगर वार्ड क्र.34 नागपूर
ता. जि. नागपूर –2 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री हुमणे शिक्षणाधिकारी (प्राथ.)
प्रथम अपीलीय अधिकारी
शिक्षण विभाग नागपूर महानगर पालिका नागपूर
सिव्हील लाईन नागपूर
2) श्री अब्दुल रहेमान शाळा निरीक्षक
जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी
नागपूर महानगर पालिका
सिव्हील लाईन नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 8.6.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 23.2.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 9.5.2011 रोजी नोटीस काढून दि. 8.6.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हे स्वतः हजर होते. त्यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 24.11.2010 रोजी जन माहिती अधिकारी शिक्षण विभाग नागपूर महानगर पालिका नागपूर यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन महानगर पालिका शाळेतील मुलांना शासना तर्फे शालेय पोषण आहार अंतर्गत मोफत खिचडी वाटप करण्याचे काम महिला बचत गटांना दिलेले आहे त्याबाबत 1 ते 13 मुद्यांवर माहिती मागितलेली होती. तथापी त्यांना जन माहिती अधिकारी यांचेकडून दि. 14.12.2010 ला माहिती पाठविली आणि त्यामध्ये असे नमुद केले की मुद्या क्र. 1,2,3,4 दस्तऐवजाच्या माहिती बाबतच्या सत्यप्रती एकुण 4201 आहेत. त्या झेरॉक्स प्रतीचे शुल्क प्रती पेज रु. 2/– प्रमाणे रु. 8402/– होते. सदरचे शुल्क शिक्षण विभाग कार्यालयात भरणा करावे म्हणजे झेरॉक्स प्रती पुरविण्यात येईल असे जन माहिती अधिकारी यांनी त्यांना कळविले. त्यानंतर अपीलकर्त्याने दि. 24.12.2010 च्या पत्राने असे कळविले की खिचडी वाटप करीता एकंदीरत किती बचत गटांची निवड केली त्या गटाच्या माहितीचे शुल्क व इतर शुल्क कळवावे असे त्यांनी जन माहिती अधिकारी यांना कळविले.



त्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी दि. 5.1.2010 च्या पत्राने महिला बचत गटांची निवड यादीच्या सत्यप्रतीच्या एकुण रु.70/– शुल्क भरण्याबाबत कळविले. त्याप्रमाणे त्यांनी रु.70/– भरणा केले आणि अपीलकर्त्यास महिला बचत गटांची निवड यादीच्या

प्रती उपलब्ध करुन दिल्या. परंतू बाकी मुद्यांची माहिती त्यांना मिळाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील शिक्षणाधिकारी (प्राथ.) नागपूर महानगर पालिका नागपूर यांचेकडे दाखल केले. मात्र प्रथम अपीलाचा निर्णयही देण्यात आला नाही. म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा शाळा निरीक्षक श्री अब्दुल रहेमान महानगर पालिका नागपूर हे उपस्थित होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथ.) महानगर पालिका नागपूर श्री हुमणे हे उपस्थित होते.

4. जन माहिती अधिकारी श्री अब्दुल रहेमान शाळा निरीक्षक यांनी आजच्या सुनावणीस आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 24.11.2010 चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने शालेय पोषण आहार संबंधी वर नमुद केल्याप्रमाणे 1 ते 13 मुद्यांवर माहिती मागितलेली होती. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती काढण्यात आली आणि अपीलकर्त्यास दि. 14.12.2010 च्या पत्राने माहिती उपलब्ध करुन दिली. आणि मुद्या क्र. 1,2,3 बाबत असे कळविले की या मुद्याच्या एकुण झेरॉक्स प्रतीची फी रु. 8402/- भरणा करावी असे अपीलकर्त्यास कळविले. तथापि अपीलकर्त्याने दि. 24.12.2010 च्या पत्राने खिचडी वाटप करण्यासाठी निवड केलेल्या बचत गटांची यादी मागितली आणि त्याच्या शुल्का विषयी माहिती मागितली म्हणून अपीलकर्त्यास दि. 5.1.2011 च्या पत्राने महिला बचत गटांच्या निवड यादीचे शुल्क रु.70/- भरण्याबाबत कळविले. त्याप्रमाणे त्यांनी रु.70/- भरणा केले. आणि अपीलकर्त्यास दि. 10.1.2011 च्या पत्राने महिला बचत गटांची यादी उपलब्ध करुन दिली. सदरची माहिती अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याचे अपीलकर्त्याने सुनावणीत मान्य केले. त्याप्रमाणे महिला बचत गट निविदाच्या प्रती व त्याच्या अर्जाच्या प्रती त्यांना मिळाल्या नाही असे त्यांनी नमुद केले. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की अपीलकर्त्यास सर्व एकुण माहितीचे शुल्क रु. 8402/- भरण्याबाबत दि. 14.12.2010 च्या पत्राने यापूर्वीच कळविले. अपीलकर्त्याने त्याचे शुल्क भरल्यास माहिती उपलब्ध करुन देता येईल. तथापि अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की त्यांना ज्या माहितीची आवश्यकता आहे त्याच माहितीचे शुल्क ते भरण्यास तयार आहे असे त्यांनी आयोगापुढे नमुद केले. म्हणून अपीलकर्त्याने जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयात जावून दस्तऐवजांचे निरीक्षण करुन घेवून त्यापैकी पाहिजे असलेल्या दस्तऐवजांचे शुल्क भरुन माहिती उपलब्ध करुन घेणे योग्य होईल. तसेच जन माहिती अधिकारी यांनी खिचडी वाटपावर किती खर्च झालेला आहे आणि खिचडी वाटपा करीता शासनाकडून एकूण किती निधी मिळालेला आहे याची माहिती अपीलकर्त्यास उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.



## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

2) अपीलकर्ता यांनी जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयात कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी उपस्थित राहून त्यांना पाहिजे असलेल्या दस्तऐवजांचे निरीक्षण करुन घ्यावे आणि निरीक्षणा नंतर त्यांना पाहिजे असलेल्या दस्तऐवजांचे शुल्क भरुन माहिती प्राप्त करुन घ्यावी. जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांनी शुल्क भरल्यानंतर त्वरीत उपलब्ध करुन द्यावी.

3) जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना खिचडी वाटपावर एकुण झालेल्या खर्चाची माहिती आणि खिचडी वाटप करण्याकरीता शासनाकडून एकंदर मिळालेला निधी याची माहिती विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.

4) प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील दाखल झाल्यानंतर त्याची सुनावणी घेतली नाही प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला नाही म्हणून त्यांना याबाबत सक्त ताकीद देण्यात येत असून भविष्यात त्यांनी याबाबतची पुनरावृत्ती करु नये अशी समज त्यांना देण्यात येत आहे.

5) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

( पी. डब्ल्यु. पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**नागपूर**
Ageyord6.1874-1876

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 325 नाग/2011

श्री दिलीप गजाननराव खेडीकर

श्री दिलीप गजाननराव खेडीकर
नयापुरा राम मंदिर जवळ, प्रेमनगर वार्ड क्र.34 नागपूर
ता. जि. नागपूर –2 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री के. ए. जाधव
प्रथम अपीलीय अधिकारी तथा पोलीस उपायुक्त
झोन क्र. 3 केळीबाग रोड, पोलीस स्टेशन कोतवाली
महाल नागपूर
2) डॉ. सुर्यभान इंगळे
जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त
लकडगंज विभाग
पोलीस स्टेशन लकडगंज नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 8.6.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 23.2.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 9.5.2011 रोजी नोटीस काढून दि. 8.6.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हे स्वतः हजर होते. त्यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 16.8.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त लकडगंज विभाग यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन पोलीस स्टेशन कळमना यांनी वरीष्ठ अधिका–याकडून आलेल्या तक्रारीनुसार महादेव सुर्यभान ढेपे अध्यक्ष सुवर्णा गृहनिर्माण सहकारी संस्था मर्या. रा. इंदिरा माता नगर यांनी मा. पोलीस आयुक्त यांच्या कार्यालयात दिलीप खेडीकर विरुध्द दिलेल्या रिपोर्टवर केलेली चौकशी व कार्यवाही याबाबत माहिती मागितलेली होती. तथापी त्यांना अपेक्षित माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील पोलीस उपायुक्त झोन क्र. 3 पोलीस स्टेशन कोतवाली महाल नागपूर यांचेकडे दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी झाली मात्र प्रथम अपीलाच्या निर्णयानंतरही त्यांना अपेक्षित माहिती उपलब्ध





झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त लकडगंज विभाग डॉ. सुर्यभान इंगळे हे उपस्थित होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा पोलीस उपायुक्त झोन क्र. 3 पोलीस स्टेशन कोतवाली महाल नागपूर श्री के. ए. जाधव हे उपस्थित होते.

4. जन माहिती अधिकारी यांनी आजच्या सुनावणीस आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 16.8.2010 चा माहितीचा अर्ज पोस्टाद्वारे त्यांच्या कार्यालयाकडे दि. 18.8.2010 रोजी प्राप्त झाला. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही पोलीस स्टेशन कळमना यांचेशी संबंधीत असल्यामुळे तो अर्ज पुढील कार्यवाहीकरीता संबंधित पोलीस स्टेशनकडे पाठविण्यात आला होता. त्यावर पोलीस निरीक्षक पोलीस स्टेशन कळमना यांनी त्यांचेकडील दि. 7.9.2010 च्या पत्राने असे कळविले की अर्जदाराने मागणी केलेल्या माहितीच्या अर्जासंबंधीची माहिती विस्तृत स्वरुपाची असून अर्ज चौकशी अपूर्ण असल्याने माहिती पुरविण्यास विलंब होत आहे. म्हणून जन माहिती अधिकारी यांनी दि. 8.9.2010 च्या पत्राने असे कळविले की आपण मागणी केलेल्या माहितीच्या अर्जातील माहिती ही विस्तृत स्वरुपाची असून मागितलेल्या माहितीच्या संबंधाने अर्जाची चौकशी अपूर्ण असल्याने व सदर प्रकरणी विधी अधिकारी यांचे मत प्राप्त होणे बाकी असल्याने माहिती पुरविण्यास विलंब होत आहे. तथापि पोलीस स्टेशन कळमना कडून अर्जा संबंधी माहिती प्राप्त होताच आणास पुरविण्यात येईल असे अपीलकर्त्यास जन माहिती अधिकारी यांनी कळविलेले आहे.

5. त्यानंतर पोलीस स्टेशन कळमना यांचेकडून दि. 11.10.2010 रोजी जन माहिती अधिकारी यांचेकडे माहिती प्राप्त झाली. सदरच्या माहितीचे शुल्क भरण्याबाबत अपीलकर्त्यास कळविले. त्यानंतर अपीलकर्त्याने दि. 19.10.2010 रोजी माहितीचे शुल्क भरले आणि पोलीस स्टेशन कळमना कडून प्राप्त झालेली माहिती अपीलकर्त्यास पुरविण्यात आली.

6. त्यानंतर अपीलकर्त्याने प्रथम अपील पोलीस उपायुक्त झोन क्र. 3 पोलीस स्टेशन कोतवाली महाल नागपूर यांचेकडे दाखल केले. पोलीस उपायुक्त श्री जाधव यांनी आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचे प्रथम अपील दाखल झाल्यानंतर दि. 8.3.2010 रोजी अपीलकर्त्यास माहिती घेवून जाण्याबाबत पत्र दिले परंतू ते हजर झाले नाही. पुन्हा अर्जदारास दि. 2.4.2010 रोजी माहिती घेवून जाण्याबाबत पत्र दिले परंतू ते हजर झाले नाही. तथापि जन माहिती अधिकारी यांचेकडून अपीलकर्त्यास दि. 31.12. 2010 च्या पत्राने आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिली असल्याचे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुनावणीत नमुद केले. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगाच्या असेही निदर्शनास आणून दिले की अपीलकर्ता व गैरअर्जदाराचा वाद जमिनीबाबत असून





सदर प्रकरण हे मा. कोर्ट क्र. 7 येथे केस क्र. 300945 येथे न्यायप्रविष्ट असल्याने अपीलकर्त्या विरुध्द आलेल्या अर्जाची कोणतीही चौकशी करता आली नाही असे

अपीलकर्त्यास दि. 31.12.2010 च्या पत्राने कळविलेले आहे. सदरची माहिती अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याचे अपीलकर्त्याने सुनावणीत मान्य केले. आणि माहिती बाबत समाधान व्यक्त केले. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

( पी. डब्ल्यु. पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**नागपूर**
Ageyord6.1878-1880

जा.क्र.————————— दि..................
मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 337 नाग/2011**

श्री सुरेश शालिकराम दुरुगकर
श्रीनगर चंद्रशेखर वार्ड, बब्बा भवनच्याजवळ गोंदिया
ता. जि. गोंदिया ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री वालस्कर
प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी,
गोंदिया
ता. जि. गोंदिया
2) जन माहिती अधिकारी
उपविभागीय अधिकारी कार्यालय गोंदिया
ता. जि. गोंदिया ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 9.6.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 24.2.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 10.5.2011 रोजी नोटीस काढून दि. 9.6.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हे स्वतः हजर होते. त्यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 22.11.2010 रोजी जन माहिती अधिकारी उपविभागीय अधिकारी कार्यालय गोंदिया यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन सन 2001 पासून अकृषीक प्रस्ताव मंजूर झालेल्या प्रकरणा बाबतची माहिती, ना हरकत प्रमाणपत्र त्याच्या आदेशाची छायांकित प्रत तसेच आदिवासी व गैरआदिवासी यांचे जमिनीवर अकृषीक करण्यासाठी किती प्रस्ताव मंजुर करण्यात आले त्याबाबतची माहिती व एल. एस. ढेकवार बाबतची माहिती आणि इतर माहिती बाबत एकुण 1 ते 10 मुद्यांवर माहिती मागितलेली होती. तथापी त्यांना जन माहिती अधिकारी यांचेकडून विहित मुदतीत माहिती प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील उपविभागीय अधिकारी, गोंदिया यांचेकडे दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी झाली आणि प्रथम अपीलाचा निर्णय दि. 24.1.2011 रोजी निर्गमित करण्यात येवून त्यामध्ये अपीलकर्त्यास मुद्या क्र. 2 ते 10 ची माहिती जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन द्यावी आणि अपीलकर्त्यास ज्या माहितीचे निरीक्षण करावयाचे आहे त्या संदर्भात दि. 25.1.2011 रोजी निरीक्षणासाठी परवानगी देण्यात आली. त्यानुसार अपीलकर्ता हे उपविभागीय अधिकारी यांचे

कार्यालयात माहिती घेण्यासाठी उपस्थित झाले मात्र त्यांना कोणतीही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री नागपूरे आणि विद्यमान जन माहिती अधिकारी श्री राहांगडाले हे उपस्थित होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी श्री वालस्कर हे उपस्थित होते.

4. तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री नागपूरे यांनी आजच्या सुनावणीस आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 22.11.2010 चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही कार्यालयातील आस्थापना शाखेशी संबंधीत असल्यामुळे त्यांनी आस्थापना शाखेचे कनिष्ठ लिपीक एल. एस. ढेकवार यांना दि. 29.11.2010 रोजी पत्र देवून त्यांचेकडून माहिती मागितली आणि त्या पत्राची प्रत अपीलकर्त्यास पाठवून श्री एल. एस. ढेकवार यांचेकडून माहिती प्राप्त होताच आपणास पुरविण्यात येईल असे अपीलकर्त्यास कळविले होते. त्यानंतर श्री एल. एस. ढेकवार यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे दि. 9.12.2010 च्या पत्राने माहिती उपलब्ध करुन दिली आणि त्यामध्ये असे नमुद केले की या कार्यालयात 2001 पासून एकुण 511 प्रकरणे मंजुर झालेली असून त्यांच्या झेरॉक्सची एकुण पाने 10220 होतील म्हणून सदर झेरॉक्स करीता अर्जदारानी रक्कम खजिना दाखल केल्या नंतर तात्काळ काढून देण्यात येईल. याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दि. 16.12. 2010 च्या पत्राने असे कळविले की सदरच्या माहितीचे शुल्क रु. 20500/– चालानद्वारे भरणा करावे. सदरचे पत्र जन माहिती अधिकारी यांनी यु.पी.सी.द्वारे पोस्टाने पाठविल्याचे आयोगास सांगितले. मात्र अपीलकर्त्यास सदरचे पत्र प्राप्त झाले नाही असे त्यांनी सुनावणीत सांगितले. म्हणून याबाबत जन माहिती अधिकारी यांनी आयोगा पुढे यु.पी.सी. द्वारे सदरचे पत्र पाठविल्याचे पोस्टाच्या शिक्क्याची प्रत दाखविली मात्र कार्यालर्यातून जावक रजिस्टर मधून निश्चित स्वरुपात कोणत्या तारखेला सदरचे पत्र निर्गमित झाले आहे त्याचे जावक रजिस्टर किंवा त्या संबंधीचा पुरावा दाखविला नाही.

5. त्यानंतर अपीलकर्त्याने उपविभागीय अधिकारी, गोंदिया यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी झाली आणि प्रथम अपीलाचा निर्णय दि. 24.1. 2011 रोजी देण्यात आला. प्रथम अपीलाच्या निर्णयात असे नमुद केले की अपीलकर्त्यास मुद्या क्र. 2 ते 10 ची माहिती उपलब्ध करुन द्यावी आणि माहितीचे निरीक्षण कराण्यास दि. 25.1.2011 रोजी परवानगी देण्यात येत आहे असे देखील त्यामध्ये नमुद केले. त्यानंतर अपीलकर्ता दि. 25.1.2011 रोजी उपविभागीय अधिकारी यांच्या कार्यालयात उपस्थित झाले. त्या दिवशी त्यांना लाभार्थ्यांची यादी उपलब्ध झाली. मात्र लाभार्थ्यांच्या प्रकरणामध्ये जी कागदपत्रे आहेत त्याच्या झेरॉक्स प्रती त्यांना उपलब्ध झाल्या नाहीत. त्यावर उपविभागीय अधिकारी यांनी आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याने मागितलेल्या झेरॉक्सच्या प्रती हया त्यांच्या कार्यालयातच काढून उपलब्ध करुन देता

येईल. कार्यालयाच्या बाहेर शासकीय रेकॉर्ड झेरॉक्स साठी पाठविणे संयुक्तीक होणार नाही असे त्यांनी आयोगाच्या निदर्शनास आणून दिले. त्यावर अपीलकर्त्याने आयोगा पुढे असे सांगितले की जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात त्यांना झेरॉक्सच्या प्रती काढून माहिती उपलब्ध करुन दिल्यास त्या माहितीचे शुल्क भरण्याची तयारी त्यांनी आयोगापुढे दर्शविली. अपीलकर्त्याने मागितलेल्या माहितीमध्ये आदिवासीची जमीन बिगर आदिवासीनी घेवून अकृषीक झाल्याबाबत त्यांचे म्हणणे आहे. सदरचा विषय हा व्यापक जनहिताशी संबंधित असल्याचे दिसून येते म्हणून प्रस्तूत प्रकरणी अपिलार्थीकडून माहितीचे शुल्क रु. 20500/- भरणा करुन घेवून ती माहिती उपलब्ध करुन देणे न्यायोचित होईल. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्त्याने माहितीच्या शुल्काची वर नमुद रक्कम भरणा केल्यानंतर 15 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना त्यांनी मागितलेल्या माहितीच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन द्याव्यात.

2) सदरची माहिती अपीलकर्त्यास माहितीच्या शुल्काची रक्कम भरणा केल्यानंतर 15 दिवसाचे मुदतीत उपलब्ध होईल याची जबाबदारी उपविभागीय अधिकारी, गोंदिया यांचेकडे सोपविण्यात येत आहे. वरील कार्यवाही त्यांच्या नियंत्रणाखाली करण्यात यावी.

3) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1882-1884

जा.क्र.———————— दि..................
मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 300 नाग/2011**

श्री कल्याण कैलाशनाथ कासट
गिताई नगर गोपुरी रोड वर्धा
ता. जि. वर्धा –442001 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी
जिल्हा व सत्र न्यायालय वर्धा
ता. जि. वर्धा
2) श्री कृ. म. बाकडे
जन माहिती अधिकारी तथा प्रबंधक
जिल्हा व सत्र न्यायालय वर्धा
ता. जि. वर्धा ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 9.6.2011 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 21.2.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 5.5.2011 रोजी नोटीस काढून दि. 9.6.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हे स्वतः हजर होते. त्यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 20.8.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा प्रबंधक जिल्हा व सत्र न्यायालय वर्धा यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन त्यांच्या कार्यालयातील माजी कर्मचारी श्री एस. एम. कुरझडकर, श्री एस. एम. पिंपरवार या दोन कर्मचा–याच्या विभागीय चौकशीच्या संदर्भात 1 ते 6 मुद्यांवर माहिती मागितलेली होती. त्यांना जन माहिती अधिकारी यांनी दि. 27.9.2010 च्या पत्राने माहिती उपलब्ध करुन दिली. त्यामध्ये मुद्या क्र. 1,2 आणि 6 ची माहिती दिली. मात्र मुद्या क्र. 3,4,5 ची माहिती गोपनिय स्वरुपाची असल्यामुळे देता येणार नाही असे त्यांनी कळविले. म्हणून त्यांनी प्रथम अपील जिल्हा व सत्र न्यायालय वर्धा यांचेकडे दाखल केले. तथापि त्यांचे प्रथम अपील खारीज झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा प्रबंधक जिल्हा व सत्र न्यायालय वर्धा श्री कृ. म. बाकडे हे उपस्थित होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या वतीने श्री दे. दे. चवरे हे उपस्थित होते.

4. जन माहिती अधिकारी तथा प्रबंधक यांनी आजच्या सुनावणीस आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 20.8.2010 चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे दि. 29.8.2010 ला प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने त्यांच्या कार्यालयातील माजी कर्मचारी श्री एस. एम. कुरझडकर सहायक अधिक्षक, श्री एस. एम. पिंपरवार कनिष्ठ लिपीक या दोन कर्मचा–याच्या विभागीय चौकशीच्या संदर्भात 1 ते 6 मुद्यांवर माहिती मागितलेली होती. अपीलकर्त्याने मागितलेल्या माहितीपैकी मुद्या क्र. 1,2 आणि 6 ची माहिती अपीलकर्त्यास देण्यात आली मात्र मुद्या क्र. 3,4,5 ची माहिती गोपनिय स्वरुपाची असल्यामुळे देता येणार नाही असे अपीलकर्त्यास दि. 27.9.2010 च्या पत्राने कळविले.

5. तसेच जन माहिती अधिकारी यांनी आणखी आयोगा पुढे असे सांगितले की माहितीच्या अधिकाराखाली मा. उच्च न्यायालय मुंबई यांचेकडून माहिती अधिकाराच्या अंमलबजावणी संबंधात Bombay High Court Right to Information (Revised) Rule 2009 हे तयार केले असून हे नियम डिस्ट्रिक्ट कोर्ट आणि तालुका कोर्ट यांना लागू करण्यात आले आहे. त्या नियमानुसार माहितीच्या अधिकाराखाली माहिती उपलब्ध करुन द्यावयाची आहे. त्याचप्रमाणे Bombay High Court Right to Information (Revised) Rule 2009 मधील Rule क्र. 13 खाली माहिती प्रकट करण्याबाबत अपवाद नमुद केलेले आहे. आणि त्यामध्ये प्रशासकीय चौकशी किंवा अर्धन्यायीक चौकशी (Administratively or Positive decision) च्या संदर्भात घेतलेल्या निर्णयाची माहिती फक्त त्या निर्णयाने बाधीत झालेल्या व्यक्तींना देण्याची तरतुद आहे. इतर त्रयस्थ व्यक्तीला ती माहिती देता येत नाही. सदरची माहिती माजी कर्मचारी श्री एस. एम. कुरझडकर, श्री एस. एम. पिंपरवार यांच्या बाबत आहे. त्याच्याशी अपीलकर्त्याचा संबंध दिसून येत नाही. म्हणून मा. उच्च न्यायालय मुंबई यांनी तयार केलेल्या नियमानुसार ही माहिती अपीलकर्त्यास उपलब्ध करुन देता येणार नाही.

6. जन माहिती अधिकारी यांच्या वतीने हजर असलेले श्री चवरे यांनी आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचे प्रथम अपील जिल्हा व सत्र न्यायालय वर्धा यांचेकडे दाखल झाले होते. आणि प्रथम अपीलाचा निर्णय दि. 20.12.2010 रोजी निर्गमित करण्यात आला. त्यामध्ये प्रथम अपीलीय अधिकारी यांनी असे नमुद केले आहे की विभागीय चौकशीच्या संदर्भातील मा. उच्च न्यायालयाच्या नियमाला अनुसरुन बाधीत व्यक्तीशिवाय इतरांना माहिती उपलब्ध करुन देता येत नाही. म्हणून प्रथम अपील फेटाळल्याचे त्यांनी सुनावणीत नमुद केले.

7. अपीलकर्ता तसेच जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की मा. उच्च न्यायालय मुंबई यांचेकडून माहिती अधिकार अधिनियम 2005 च्या अंमलबजावणी संदर्भात स्वतंत्रपणे नियम तयार केलेले आहेत. त्यामुळे माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी केलेली कार्यवाही ही त्या नियमानुसार असल्यामुळे योग्य आहे. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

( पी. डब्ल्यु. पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**नागपूर**
Ageyord6.1884-1886

जा.क्र.—————————— दि..................
मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 355 नाग/2011**

श्री शंकर आबाजी खापरे
नगर परिषद कॉलनी, चौधरी वार्ड हिंगणघाट
ता. हिंगणघाट जि. वर्धा ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक
सहकारी संस्था वर्धा
ता. जि. वर्धा
2) श्री आर. के. निगडे
जन माहिती अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,
वर्धा जिल्हा देखरेख सहकारी संस्था वर्धा
ता. जि. वर्धा ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 15.6.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 23.2.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 11.5.2011 रोजी नोटीस काढून दि. 15.6.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत. अपीलकर्ता

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हे स्वतः हजर होते. त्यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 28.8.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, वर्धा जिल्हा देखरेख सहकारी संस्था वर्धा यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन त्यांनी दि. 15.7.2010 ला दिलेल्या अर्जाच्या संदर्भात माहिती मागितलेली होती. त्यामध्ये प्रामुख्याने त्यांच्यापेक्षा सेवेमध्ये कनिष्ठ असलेल्या श्री धोटे व आत्राम यांचे मुळ बेसिक त्यांच्यापेक्षा जास्त कसे आहे याबाबत माहिती मागितलेली होती. तसेच त्यांच मुळ बेसिक रु.1225/- दर्शविलेला आहे आणि त्यांना सेवेत कनिष्ठ असलेले श्री धोटे व आत्राम यांचे मुळ बेसिक रु.1670/- दर्शविलेला आहे. तफावती बाबत त्यांनी माहिती मागितलेली होती. तथापी त्यांना विहित मुदतीत माहिती प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था वर्धा यांचेकडे दाखल केले. त्यानंतर त्यांना दि. 22.12.2010 च्या पत्राने माहिती उपलब्ध करुन

देण्यात आली. मात्र त्या माहितीने त्यांचे समाधान झाले नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा यांच्या वतीने ॲड. अनंत साळवे हे उपस्थित होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक यांच्या तर्फे कु. एस. पी. गुधाने हया उपस्थित होत्या.

4. ॲड. अनंत साळवे यांनी आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 28.8.2010 चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे दि. 31.8.2010 रोजी प्राप्त झाला होता. मात्र मा. उच्च न्यायालय खंडपीठ नागपूर यांच्याकडील याचिका क्र. 5666/2007 मधील निर्णया नुसार सहकारी संस्थांना माहितीचा अधिकार कायदा लागू होत नाही असे अपीलकर्त्यास दि. 30.10.2010 च्या पत्राने जन माहिती अधिकारी यांनी कळविले. त्यानंतर अपीलकर्त्याने प्रथम अपील जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था वर्धा यांचेकडे दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दि. 13.12.2010 रोजी देण्यात आला. आणि त्यामध्ये अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन देण्याचे आदेश दिले. म्हणून प्रथम अपीलाच्या निर्णयाला अनुसरुन जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दि. 22.12. 2010 च्या पत्राने आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिली असे ॲड. अनंत साळवे यांनी आयोगा पुढे सांगितले. जन माहिती अधिकारी यांचेकडून दि. 22.12.2010 च्या पत्राने पाठविलेली माहिती अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याचे त्यांनी आयोगापुढे सुनावणीत मान्य केले. मात्र अपीलकर्त्याने आयोगाच्या असे निदर्शनास आणून दिले की त्यांच्याकडील दि. 28.8.2010 च्या माहितीच्या अर्जात त्यांचे दि. 15.7.2009 च्या पत्रात त्यांच्यापेक्षा सेवेमध्ये कनिष्ठ असलेल्या श्री धोटे व आत्राम यांचे मुळ बेसिक त्यांच्यापेक्षा जास्त कसे आहे याबाबतची माहिती त्यांना अद्यापही मिळालेली नाही. ती माहिती त्यांना मिळणे आवश्यक असल्याचे त्यांनी आयोगा पुढे सांगितले.

6. अपीलकर्ता तसेच जन माहिती अधिकारी यांच्या वतीने उपस्थित असलेले ॲड. अनंत साळवे यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की अपीलकर्त्याच्या दि. 28.8.2010 च्या माहिती अर्जाला अनुसरुन व प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या निर्णयाला अनुसरुन जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दि. 22.12.2010 च्या पत्राने आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. मात्र अपीलकर्त्यास दि. 15.7.2009 च्या पत्रात नमुद केल्याप्रमाणे त्यांच्यापेक्षा सेवेमध्ये कनिष्ठ असलेल्या श्री धोटे व आत्राम यांचे मुळ बेसिक त्यांच्यापेक्षा जास्त कसे आहे याबाबतची माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास उपलब्ध करुन देणे न्यायोचित व संयुक्तिक होईल. तसेच त्यांच्या दि. 7.1.2011 च्या माहिती अर्जातील माहिती क्र. 1 ते 4 मुद्यांची देखील माहिती त्यांना उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 15 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना दि. 15.7.2009 च्या अर्जात नमुद केल्याप्रमाणे श्री धोटे व आत्राम त्यांच्यापेक्षा सेवेमध्ये कनिष्ठ असूनही त्यांचे मुळ बेसिक त्यांच्यापेक्षा जास्त कसे आहे याबाबतची माहिती विनामुल्य व्यक्तीशः किंवा रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन द्यावी. तसेच त्यांच्या दि. 7.11.2011 च्या माहितीच्या अधिकारा खाली दिलेल्या अर्जाची क्र. 1 ते 4 मुद्यांची देखील माहिती विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1888-1890

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 352 नाग/2011**

श्री देवराव गंगाराम डेकाटे
मु. पो. सिर्सी
ता. उमरेड जि. नागपूर –441214 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्रीमती वसुधा नाईक
प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपसंचालक
अनुसूचित जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती नागपूर
गिरीपेठ नागपूर
2) श्री गायकवाड
जन माहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी,
अनुसूचित जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती नागपूर
गिरीपेठ नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 15.6.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 22.2.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 11.5.2011 रोजी नोटीस काढून दि. 15.6.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 26.10.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी, अनुसूचित जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती नागपूर यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन श्री प्रदिप डांगे व चंद्रकांत डांगे व सचिन शंकरराव डेकाटे व पंकज वसंत डेकाटे या चार व्यक्तींच्या जाती वैधता प्रमाणपत्र संदर्भात माहिती मागितलेली होती. तथापी त्यांना जन माहिती अधिकारी यांचेकडून दि. 23.11.2010 च्या पत्राने माहिती प्राप्त झाली. परंतू सदरच्या माहिती मध्ये असे नमुद केले की सचिन शंकरराव डेकाटे व पंकज वसंत डेकाटे यांच्या संबंधी नस्तीचा शोध घेतला असता अशा नावाची नस्ती नसल्याचे दिसून येते असे जन माहिती अधिकारी यांनी त्यांना कळविले. म्हणून त्यांनी प्रथम अपील उपसंचालक यांचेकडे दाखल केले. मात्र उपसंचालक यांचेकडून दि. 24.12.2010 च्या पत्राने असे कळविले की जन माहिती अधिकारी यांनी दि. 23.11.2010 द्वारे आपणास निर्णय कळविलेला आहे तसेच त्यानुंसार उपलब्ध कागदपत्रांचे माहितीचे शुल्क रु. 101/– भरण्याबाबत कळविले. त्याला अनुसरुन त्यांनी माहितीच्या शुल्काचा भरणा केला. त्यानंतर त्यांना काही माहिती उपलब्ध झाली. मात्र श्री डेकाटे यांच्या बाबतीत कोणतीही माहिती प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी श्री गायकवाड हे उपस्थित होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपसंचालक श्रीमती वसुधा नाईक हया उपस्थित होत्या.

4. जन माहिती अधिकारी श्री गायकवाड यांनी आजच्या सुनावणीस आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 26.10.2010 चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे दि. 29.10.2010 रोजी प्राप्त झाला. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही त्रयस्थ पक्षाशी संबंधीत असल्यामुळे दि. 9.11.2010 च्या पत्राने त्रयस्थ पक्ष म्हणून श्री चंद्रकांत डांगे यांना माहिती देण्याबाबत त्यांची संमती विचारली तथापि चंद्रकांत डांगे यांनी दि. 20.11.2010 च्या पत्राने अपीलकर्त्यास त्यांची वैयक्तीक माहिती उपलब्ध करुन देवू नये असे कळविले. त्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दि. 23.11.2010 च्या पत्राने माहिती उपलब्ध करुन देवून असे कळविले की श्री प्रदिप डांगे व चंद्रकांत डांगे यांच्या नस्तीतील त्यांचे वैयक्तीक कागदपत्र ही त्रयस्थ पक्ष असल्यामुळे कलम 11 (1) प्रमाणे ती माहिती देता येत नाही. तथापी त्यांच्या नस्तीमधील इतर कागदपत्रांची संख्या 28 एवढी आहे त्याची फी प्रती पेज रु. 2/— प्रमाणे रु. 56/— आणि नोंदणीकृत टपालाचा खर्च रु. 45/— असे एकुण रु. 101/— माहितीचे शुल्क भरण्याबाबत अपीलकर्त्यास कळविले. आणि त्याच पत्रामध्ये अपीलकर्त्यास असेही कळविले की श्री सचिन शंकरराव डेकाटे व पंकज वसंत डेकाटे यांच्या संबंधी नस्तीचा शोध घेतला असता सदर नस्ती त्यांच्या कार्यालयात उपलब्ध नाही म्हणून त्याची माहिती देता येत नाही. त्यानंतर अपीलकर्त्याने प्रथम अपील उपसंचालक यांचेकडे दाखल केले. आणि उपसंचालक यांनी देखील दि. 24.12.2010 च्या पत्राने अपीलकर्त्यास जन माहिती अधिकारी यांनी दि. 23.11.2010 च्या पत्राने माहिती उपलब्ध करुन दिल्याचे नमुद करुन उपलब्ध असलेल्या कागदपत्राचे शुल्क रु. 101/— भरण्याबाबत अपीलकर्त्यास कळविले असे उपसंचालक श्रीमती वसुधा नाईक यांनी आयोगासमोर सांगितले. त्यानंतर अपीलकर्त्याने माहितीचे शुल्क जन माहिती अधिकारी यांचेकडे भरणा केले आणि दि. 3.3.2010 च्या पत्राने अपीलकर्त्यास उपलब्ध कागदपत्राच्या प्रती पाठविण्यात आल्या.

5. तसेच जन माहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपसंचालक यांनी आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याने सचिन शंकरराव डेकाटे व पंकज वसंत डेकाटे यांच्या जाती वैधता प्रमाणपत्र संदर्भातील नस्तीतील कागदपत्रांची माहिती देखील मागितली होती. तथापि त्यांच्या कार्यालयात सदरच्या नस्तीचा शोध घेण्यात आला मात्र सदरच्या नस्त्या हया अद्याप उपलब्ध झाल्या नाही कारण अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही 1996 मधील असल्याचे दिसून येते म्हणजे सदरची माहिती सुमारे 15 वर्षा पुर्वीची आहे. त्यामुळे त्यांच्या कार्यालयात वर्षवार जुन्या नस्त्याचे गठ्ठे लावण्याची कार्यवाही सुरु आहे. त्या जुन्या गठ्ठयांमध्ये श्री डेकाटे यांच्या नस्त्या उपलब्ध झाल्यास सदरची माहिती अपीलकर्त्यास उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगासमोर मान्य केले. अपीलकर्त्यानेही आयोगासमोर श्री डेकाटे यांच्या नस्तीतील माहिती त्यांना मिळणे आवश्यक असल्याचे आग्रही प्रतिपादन केले.

6. अपीलकर्ता तसेच जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की अपीलकर्त्यास जन माहिती अधिकारी यांनी दि. 23.11.2010 च्या पत्राने त्यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती माहितीचे शुल्क भरुन घेवून अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिलेली दिसते मात्र श्री सचिन शंकरराव डेकाटे व पंकज वसंत डेकाटे यांच्या नस्त्या उपलब्ध झाल्या नसल्यामुळे ती माहिती उपलब्ध झालेली दिसून येत नाही. म्हणून श्री सचिन शंकरराव डेकाटे व पंकज वसंत डेकाटे यांच्या नस्तीचा कसून शोध घेवून ती माहिती उपलब्ध झाल्यास अपीलकर्त्यास विनामुल्य उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 15 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी यांनी श्री सचिन शंकरराव डेकाटे व पंकज वसंत डेकाटे यांच्या जाती वैधता प्रमाणपत्र संदर्भातील नस्तीचा कसून शोध घ्यावा आणि सदरच्या नस्त्या उपलब्ध झाल्यास अपीलकर्त्यास त्यातील माहिती विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी. तथापि नस्त्या न उपलब्ध झाल्यास तसे स्पष्टपणे अपीलकर्त्यास विनामुल्य व्यक्तीशः किंवा रजिस्टर पोस्टाने कळवावे.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1892-1894

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 353 नाग/2011**

श्री विजय उमराव डोंगरे उर्फ डोंगरवार
वार्ड क्र. 3, (पंचशील झेंडा चौक) मु. पो.
कटंगीकला ता. जि. गोंदिया ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा खंड विकास अधिकारी
पंचायत समिती गोंदिया
ता. जि. गोंदिया
2) श्री संजय बनकर
जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी,
पंचायत समिती गोंदिया
ता. जि. गोंदिया ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 15.6.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 25.2.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 11.5.2011 रोजी नोटीस काढून दि. 15.6.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 24.9.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, पंचायत समिती गोंदिया यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन दि. 6.1.2010 च्या भ्रष्टाचारा संबंधातील तक्रार अर्जावर खंड विकास अधिकारी पंचायत समिती गोंदिया यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद गोंदिया यांचेकडे अहवाल पाठविलेला आहे. त्या चौकशी अहवालात खंड विकास अधिकारी यांनी निष्कर्ष, अभिप्राय नोंदविलेला आहे त्याची माहिती त्यांनी मागितलेली होती. तथापी त्यांना जन माहिती अधिकारी यांचेकडून माहिती प्राप्त झाली परंतू ती माहिती अपूर्ण असल्यामुळे त्यांनी प्रथम अपील खंड विकास अधिकारी पंचायत समिती गोंदिया यांचेकडे दाखल केले. मात्र त्यांचे प्रथम अपील खारीज केल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, पंचायत समिती गोंदिया श्री बनकर हे उपस्थित होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या वतीने त्यांनाच प्राधिकृत करण्यात आले होते.

4. जन माहिती अधिकारी श्री संजय बनकर यांनी आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 24.9.2010 चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती काढण्यात आली आणि अपीलकर्त्यास दि. 14. 10.2010 च्या पत्राने असे कळविले की ग्रामपंचायत कटंगीकला येथील तक्रार अर्जात संबंधीत ग्रामपंचायतचे रेकॉर्डची तपासणी करुन व चौकशी करुन अहवाल दि. 30.9. 2010 रोजी पुढील कार्यवाहीसाठी उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पं) जिल्हा परिषद गोंदिया यांना पाठविलेले आहे. त्यामध्ये खंड विकास अधिकारी पंचायत समिती गोंदिया यांचे अभिप्राय आणि निष्कर्ष नोंदविलेले आहे असे जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले. तसेच सदरचा चौकशी अहवाल उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पं) जिल्हा परिषद गोंदिया यांचेकडे पाठविल्या नंतर त्यांच्याकडून झालेल्या कार्यवाहीची माहिती अद्याप अप्राप्त आहे ती प्राप्त होताच आपणास कळविण्यात येईल अशी माहिती देखील अपीलकर्त्यास दि. 14.10.2010 च्या पत्राने उपलब्ध करुन दिल्याचे जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीत नमुद केले. त्यानंतर अपीलकर्त्याने प्रथम अपील खंड विकास अधिकारी पंचायत समिती गोंदिया यांचेकडे दाखल केले. मात्र जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन दिली असल्यामुळे अपील खारीज करण्यात आले असे जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीत नमुद केले.

5. अपीलकर्ता तसेच जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास खंड विकास अधिकारी पंचायत समिती गोंदिया यांच्या चौकशी अहवालाची प्रत अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिलेली असून त्यामध्ये खंड विकास अधिकारी पंचायत समिती गोंदिया यांचे अभिप्राय आणि निष्कर्ष नमुद केलेले आहे. तथापि अपीलकर्ता यांचे याबाबत असे म्हणणे आहे की खंड विकास अधिकारी पंचायत समिती गोंदिया यांनी केलेली चौकशी व त्यावर दिलेले अभिप्राय किंवा निष्कर्ष हे ग्रामपंचायतचे रेकॉर्डला अनुसरुन दिलेले नाही म्हणून सदरचा चौकशी अहवाल हा योग्य नाही. तथापि चौकशी अहवालाच्या गुणवत्तेबाबतची बाब आयोगाच्या कार्यकक्षेत येत नाही. अपीलकर्त्यास खंड विकास अधिकारी पंचायत समिती गोंदिया यांच्या चौकशी अहवालाची व अभिप्रायाची प्रत उपलब्ध झाली असल्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

( पी. डब्ल्यु. पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**नागपूर**
Ageyord6.1896-1898

जा.क्र.————————— दि..................
मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 354 नाग/2011**

श्री विजय उमराव डोंगरे उर्फ डोंगरवार
वार्ड क्र. 3, (पंचशील झेंडा चौक) मु. पो.
कटंगीकला ता. जि. गोंदिया ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री बी. टी. बोरकर
प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी, (पंचायत विभाग)
जिल्हा परिषद गोंदिया
ता. जि. गोंदिया
2) श्री डी. एम. श्रीवास्तव
जन माहिती अधिकारी तथा अधिक्षक(पंचायत विभाग)
जिल्हा परिषद गोंदिया
ता. जि. गोंदिया ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 15.6.2011 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 25.2.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 11.5.2011 रोजी नोटीस काढून दि. 15.6.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 29.10.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा अधिक्षक(पंचायत विभाग) जिल्हा परिषद गोंदिया यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन खंड विकास अधिकारी गोंदिया यांनी भ्रष्टाचाराची चौकशी करुन दि. 30.9.2010 अन्वये भ्रष्टाचाराचे अभिप्राय व निष्कर्ष नमुद करुन अहवाल पाठविला त्या अहवालावर केलेल्या कार्यवाहीची माहिती मागितलेली होती. तथापी त्यांना जन माहिती अधिकारी यांचेकडून माहिती प्राप्त झाली. मात्र सदरच्या माहितीने त्यांचे समाधान झाले नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील उपमुख्य कार्यकारी अधिकारी, (पंचायत विभाग) जिल्हा परिषद गोंदिया यांचेकडे दाखल केले. मात्र प्रथम अपीलाच्या निर्णया नंतरही त्यांना अपेक्षित माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा अधिक्षक(पंचायत विभाग) जिल्हा परिषद गोंदिया श्री डी. एम. श्रीवास्तव हे उपस्थित होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी, (पंचायत विभाग) जिल्हा परिषद गोंदिया श्री बी. टी. बोरकर हे उपस्थित होते.

4. जन माहिती अधिकारी श्री श्रीवास्तव यांनी आजच्या सुनावणीस आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 29.10.2010 चा माहितीचा अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती काढण्यात आली. आणि अपीलकर्त्याने माहितीच्या अर्जात व्यक्तीशः माहिती घेणार असे नमुद केल्यामुळे अपीलकर्त्यास दि. 4.11.2010 रोजी पत्र लिहून माहिती घेण्यासाठी त्यांना कार्यालयात बोलाविले. त्यानुसार अपीलकर्ता त्यांच्या कार्यालयात दि. 15.11.2010 रोजी हजर झाले आणि त्यादिवशी त्यांना माहिती उपलब्ध करुन दिली. दि. 15.11.2010 रोजी अपीलकर्त्यास पत्र क्र. 2980, 2981, 2982 दि. 20.10.2010 चे पत्र इत्यादीची माहिती त्यांना मिळाली असे अपीलकर्त्याने सुनावणीत मान्य केले. मात्र सदरची माहिती अपुर्ण असल्यामुळे त्यांनी प्रथम अपील उपमुख्य कार्यकारी अधिकारी, (पंचायत विभाग) जिल्हा परिषद गोंदिया यांचेकडे दाखल केले. मात्र प्रथम अपीलाची सुनावणी घेतली नाही असे अपीलकर्ता यांनी नमूद केले. प्रथम अपीलीय अधिकारी श्री बोरकर यांनी आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचे प्रथम अपील यांचेकडे दाखल झाले होते. त्या प्रथम अपीलाची सुनावणी प्रथमतः दि. 30.12.2010 रोजी ठेवण्यात आली होती. परंतू त्या दिवशी सुनावणी होवू शकली नाही परंतू नंतर ती सुनावणी दि. 17.1.2011 रोजी ठेवण्यात आली होती. मात्र त्या दिवशी अपीलकर्ता त्यांच्या कार्यालयात हजर झाले होते. मात्र प्रत्यक्ष सुनावणीच्या वेळी ते हजर राहीले नाही. नंतर जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे एकून घेवून त्यांनी दि. 17.1.2011 रोजी प्रथम अपीलाचा निर्णय दिला आणि त्या निर्णयात असे नमुद केले की जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास मागितलेली माहिती पुरविण्याबाबत कसूर केलेला दिसून येत नाही. तथापि अपीलकर्त्याने मागितलेल्या माहितीच्या संदर्भात आणखी काही माहिती उपलब्ध झाल्यास ती अपीलकर्त्यास पुरविण्यात यावी. प्रथम अपीलाच्या या निर्णया नंतरही जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दि. 28.1.2011 च्या पत्राने चौकशी अहवालावर नमुद केलेल्या अंतीम कार्यवाहीची माहिती पोस्टाने पाठविल्याचे नमुद केले. मात्र सदरचे पोस्टाने पाठविलेले पत्र अपीलकर्त्यास मिळाले नाही असे त्यांनी सुनावणीत आयोगापुढे सांगितले. म्हणून आयोगा समोर अपीलकर्त्यास जन माहिती अधिकारी यांनी पुन्हा दि. 28.1.2011 च्या पत्राने पोस्टाने पाठविलेल्या माहितीची जादा प्रत उपलब्ध करुन दिली. सदरची माहिती अपीलकर्त्याने आयोगा समोर स्वीकृत केली.

6. अपीलकर्ता तसेच जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की अपीलकर्त्यास जन माहिती अधिकारी यांचेकडून आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिली तसेच चौकशी अहवालावर केलेल्या अंतीम कार्यवाहीची माहिती दि. 28.1.2011 च्या पत्राने उपलब्ध करुन दिल्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1895-1897

जा.क्र.————————— दि..................
मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक नाग/2011**

श्री तेजराव शामरावजी डाखळे
मु. वानाडोंगरी वार्ड नं. 2 पो. हिंगणा
ता. हिंगणा जि. नागपूर –441110 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री पोटे

प्रथम अपीलीय अधिकारी तथा तहसिलदार
तहसिल कार्यालय हिंगणा
ता. हिंगणा जि. नागपूर
2) जन माहिती अधिकारी
तहसिल कार्यालय हिंगणा
ता. हिंगणा जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 17.6.2011 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 3.3.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 16.5.2011 रोजी नोटीस काढून दि. 17.6.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हे स्वतः हजर होते. त्यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 19.1.2011 रोजी जन माहिती अधिकारी तहसिल कार्यालय हिंगणा यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन श्री शामराव गोविंदराव डाखळे मु. वानाडोंगरी यांनी आपल्या कार्यालयात मौजा वानाडोंगरी प. ह. नं. 46 भूमापन क्र. 25 भो.वर्ग 5 आराजी 0.74 आर या जमीन संदर्भात दुरुस्ती प्रकरण सादर केले त्याचा प्रकरण क्र. आरटीजे 64/2000–2001 असून त्या प्रकरणात आपल्या कार्यालया अंतर्गत सदर विषयावर कोणती कार्यवाही करण्यात आली याची माहिती त्यांनी मागितलेली होती. तथापि त्यांना जन माहिती अधिकारी यांचेकडून कोणतीही अपेक्षित माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील तहसिलदार हिंगणा यांचेकडे दाखल केले. तथापि त्यांचे प्रथम अपील फेटाळल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार हिंगणा श्री पोटे हे उपस्थित होते. त्यांनी आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 19.1.2011 चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. त्याला अनुसरुन अपीलकर्त्यास दि. 28.1.2011 च्या पत्राने असे कळविले की आपण दिलेल्या अर्जामध्ये प्रकरण क्रमांक नमुद नसल्यामुळे मागितलेल्या माहितीचा बोध होत नाही म्हणून अर्ज खारीज करण्यात येत आहे असे जन माहिती अधिकारी यांनी त्यांना कळविले. त्यानंतर अपीलकर्त्याने प्रथम अपील तहसिलदार हिंगणा यांचेकडे दाखल केले. त्यानंतर तहसिलदार हिंगणा यांनी दि. 11.2.2011 च्या पत्राने अपीलकर्त्यास असे कळविले की आपण मागणी केलेली माहिती खालीलप्रमाणे आहे. मौजा वानाडोंगरी सर्व्हे नं. 25 आराजी 0.74 आर या जमीनीचे अर्जातील नमुद प्रकरणा बाबत प्रकरण क्रमांक नमुद नसल्यामुळे कागदपत्र पुरविणे शक्य नाही असे तहसिलदार हिंगणा यांनी अपीलकर्त्यास कळविले.





4. तथापि सुनावणीच्या वेळी अपीलकर्त्याने आयोगाच्या असेही निदर्शनास आणून दिले की सन 2000–2001 मध्ये प्रस्तूत प्रकरणाच्या संदर्भात सुनावणीची नोटीस तहसिलदार हिंगणा कार्यालयातून निर्गमीत करण्यात आली त्याची प्रत त्यांनी आयोगासमोर सादर केली. सदरच्या सुनावणीच्या नोटीसची प्रत तहसिलदार हिंगणा यांचेकडे सादर करण्यात आलेली आहे. त्यावरुन असे दिसून येते की प्रस्तूत प्रकरण हे तहसिलदार हिंगणा कार्यालयाशी संबंधीत असल्यामुळे त्यांच्या कार्यालया मार्फत या प्रकरणावर कार्यवाहीच्या संदर्भात प्रक्रिया झालेली दिसून येते. म्हणून प्रस्तूत प्रकरणात तहसिलदार हिंगणा यांनी या प्रकरणाचा शोध घेण्यासाठी त्यांच्या स्तरावर एक पथक तयार करावे

आणि या प्रकरणाचा शोध घेवून माहिती उपलब्ध झाल्यास अपीलकर्त्यास विनामुल्य माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल. तथापि माहिती उपलब्ध न झाल्यास तसे स्पष्टपणे अपीलकर्त्यास कळविणे योग्य होईल. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 15 दिवसाचे आंत तहसिलदार हिंगणा यांनी प्रस्तूत प्रकरणाचा शोध घेण्यासाठी त्यांच्या स्तरावर एक पथक तयार करावे आणि 15 दिवसात प्रकरणाचा शोध घेवून अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन द्यावी. तथापि प्रकरणाचा शोध घेतल्या नंतरही माहिती उपलब्ध न झाल्यास तसे स्पष्टपणे अपीलकर्त्यास कळवावे.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1889-1890

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 374 नाग/2011

श्री अजय अरुणरावजी पलांदुरकर
नवी शुक्रवारी फवारा चौक, राम कुलर जवळ
गाडीखाना वार्ड नं. 78, नागपूर
ता. जि. नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री विजय हुमणे
प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
शिक्षण विभाग महानगर पालिका नागपूर
ता. जि. नागपूर

2) श्री डोंगरवार प्रभारी सहाय्यक
जन माहिती अधिकारी
शिक्षण विभाग महानगर पालिका नागपूर
ता. जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 17.6.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 1.3.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 16.5.2011 रोजी नोटीस काढून दि. 17.6.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 12.10.2010 रोजी जन माहिती अधिकारी शिक्षण विभाग महानगर पालिका नागपूर यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन 1) ठाकरे आणि कल्चर ॲकेडमीक व प्रदीप फिल्म ॲकेडमीक या दोन संस्थांना पुढील दोन वर्षांकरीता लीज देण्यात आली का त्याची माहिती त्यांनी मागितलेली होती. 2) या दोन्ही ॲकेडमीकनी एका वर्षांत किती फंड म.न. पा. च्या तिजोरीत जमा केला आहे त्याची माहिती 3) या दोन्ही ॲकेडमीनी म.न.पा. च्या किती विद्यार्थ्यांना मोफत शिक्षण दिले आहे त्यांची नावे देण्यात यावी. वरील प्रमाणे





3 मुद्यांची माहिती मागितलेली होती. मात्र जन माहिती अधिकारी यांचेकडून त्यांना 30 दिवसात कोणतीही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील शिक्षणाधिकारी शिक्षण विभाग महानगर पालिका नागपूर यांचेकडे दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी दि. 28.1.2011 रोजी घेण्यात आली आणि प्रथम अपीलाचा निर्णय देण्यात आला आणि त्यामध्ये असे नमुद केले की जन माहिती अधिकारी यांनी 10

दिवसाच्या आत अपीलकर्त्यास विनामुल्य माहिती पुरवावी. त्याला अनुसरुन अपीलकर्त्यास दि. 3.2.2011 च्या पत्राने माहिती उपलब्ध करुन दिली तथापि दिलेली माहिती ही अपूर्ण असल्याचे दिसून आले म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी शिक्षण विभाग महानगर पालिका नागपूर श्री डोंगरवार हे उपस्थित होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक) शिक्षण विभाग महानगर पालिका नागपूर श्री विजय हुमणे हे उपस्थित होते.

4. जन माहिती अधिकारी श्री डोंगरवार यांनी आजच्या सुनावणीस आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 12.10.2010 चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. त्यावेळी जन माहिती अधिकारी हे दुसरे होते. त्यांनी नुकताच जन माहिती अधिकारी या पदाचा पदभार घेतलेला असल्याचे सुनावणीत नमुद केले. तथापि त्यांच्या कार्यालयात उपलब्ध असलेल्या माहितीवरुन त्यांनी आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याने मागितलेल्या माहितीच्या संदर्भातील मुळ नस्ती गहाळ झाल्यामुळे अपीलकर्त्यास तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी सदरची बाब प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या निदर्शनास आणून दिल्यानंतर प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी यांनी एफ.आय.आर दाखल केल्यानंतर संबंधीत कर्मचारी यांना पत्र दिल्यामुळे काही दिवसातच उक्त नस्ती अचानकपणे सहाय्यक अधिक्षक यांच्या टेबलावर उपलब्ध झाली त्यामुळे विहित कालावधीमध्ये माहिती पुरविणे शक्य झाले नाही. दरम्यानच्या काळात अपीलकर्त्याने प्रथम अपील शिक्षणाधिकारी यांचेकडे दाखल केले होते. प्रथम अपीलाची सुनावणी दि. 28.1.2011 रोजी घेण्यात आली आणि प्रथम अपीलाचा निर्णय देण्यात आला आणि त्यामध्ये असे नमुद केले की जन माहिती अधिकारी यांनी 10 दिवसाच्या आत अपीलकर्त्यास विनामुल्य माहिती उपलब्ध करुन द्यावी असा प्रथम अपीलीय अधिकारी यांनी निर्णय दिला असे श्री विजय हुमणे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुनावणीत नमुद केले.

5. प्रथम अपीलाच्या निर्णया निर्णयानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दि. 3.2.2011 च्या पत्राने माहिती उपलब्ध करुन दिली. सदरची माहिती अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याचे त्यांनी सुनावणीत मान्य केले. मात्र सदरची माहिती विलंबाने प्राप्त झाली असून दिलेली माहिती ही अपुर्ण आहे असे त्यांनी आयोगापुढे सांगितले.





6. जन माहिती अधिकारी यांनी दि. 3.2.2011 च्या पत्राने अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिलेल्या माहितीचे अवलोकन केले असता जन माहिती अधिकारी यांनी मद्दा क्र. 1 बाबत ठाकरे आणि कल्चर ॲकेडमी व प्रदीप फिल्म ॲकेडमी या दोन संस्थांना पुढील दोन वर्षांकरीता लीज देण्याबाबत माहिती उपलब्ध नाही असे कळविलेले दिसते. तथापि या दोन्ही ॲकेडमीना लीज दिली आहे किंवा नाही याची स्पष्टपणे माहिती अपीलकर्त्यास

देणे संयुक्तीक होईल. तसेच मुद्या क्र. 2 बाबत ठाकरे आणि कल्चर ॲकेडमीने म.न.पा. च्या तिजोरीत रक्कम जमा केल्याची माहिती देण्यात आली मात्र प्रदीप फिल्म ॲकेडमीची माहिती नस्तीत उपलब्ध नाही असे कळविलेले आहे. तथापि प्रदीप फिल्म ॲकेडमीने फंडाची रक्कम जमा करण्याबाबतची खात्री कॅश बुक वरुन करुन घेवून माहिती पुरविणे संयुक्तीक होईल. तसेच मद्या क्र. 2 बाबत दोन्ही संस्थेनी म.न.पा. च्या किती विद्यार्थ्यांना मोफत शिक्षण दिले आहे याची माहिती उपलब्ध नाही असे कळविलेले आहे. तथापि या बाबतही म.न.पा. च्या विद्यार्थ्यांना मोफत शिक्षण दिले असल्यास त्याची खात्री करुन माहिती द्यावी अथवाा मोफत शिक्षण दिले नसल्यास तसे स्पष्टपणे अपीलकर्त्यास कळविणे संयुक्तीक होईल. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 8 दिवसाचे आंत विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना वर नमुद केल्याप्रमाणे तीन मुद्यांवर विनामुल्य माहिती व्यक्तीशः किंवा रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन द्यावी.

2) तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सहा. शिक्षणाधिकारी यांनी अपीलकर्त्याच्या दि. 12.10.2010 चा माहितीच्या अर्जाला अनुसरुन 30 दिवसाच्या मुदतीत कोणतीही माहिती उपलब्ध करुन दिली नाही किंवा माहितीच्या अर्जाला उत्तर दिलेले नाही त्यानंतर प्रथम अपीलाच्याा निर्णयानंतर अपीलकर्त्यास दि. 3. 2.2011 च्या पत्राने माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. म्हणून सदरची माहिती अपीलकर्त्यास विलंबाने उपलब्ध करुन दिल्याचे दिसून येते आणि त्या विलंबास तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सहा. शिक्षणाधिकारी हे जबाबदार दिसून येतात. म्हणून त्यांचे विरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 20 (1) प्रमाणे त्यांचेवर रु. 10000/– ची शास्ती कां लावण्यात येवू नये याबद्यलचा खुलासा त्यांनी हा निर्णय मिळाल्यापासून 15 दिवसाचे आंत आयोगापुढे सादर करावा अन्यथा शास्तीची कार्यवाही कायम करण्यात येईल.





3) विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी सदरच्या निर्णयाची एक प्रत तत्कालीन जन माहिती अधिकारी_यांचेकडे खुलाशासाठी पाठवावी.

4) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

( पी. डब्ल्यु. पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

नागपूर
Ageyord6.1902-1905

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 375 नाग/2011**

कु. मनिषा हिरामण सोनवने
तिवारी कॉलनी गुरुनानक वार्ड गणेश नगर गोंदिया
ता. जि. गोंदिया – 441601 ..... अपिलकर्ता

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा जिल्हा कृषी अधिक्षक

गोंदिया
ता. जि. गोंदिय
2) श्री एच. एस. शेवाळे
जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषी अधिकारी,
सडक अर्जुनी
ता. सडक अर्जुनी जि. गोंदिया ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 17.6.2011 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 1.3.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 16.5.2011 रोजी नोटीस काढून दि. 17.6.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 27.12.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषी अधिकारी, सडक अर्जुनी ता. सडक अर्जुनी जि. गोंदिया यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन श्री राजेश शुध्दोधन राणे शिपाई यांच्या बाबत जात वैधता प्रमणपत्राची प्रत, नॉन क्रिमीलेअरच्या प्रमणपत्राची प्रत, त्यांनी घेतलेल्या किरकोळ रजा, अर्जित रजा इत्यादीची माहिती त्यांच्या नियुक्ती आदेशाची प्रत आणि गट–ड च्या कर्मचा–याचे दि. 4.5.2010 ते दि. 16.12.2010पर्यंतच्या हजेरीपटाच्या सत्यप्रती इत्यादीची माहिती त्यांनी मागितलेली होती. तथापि त्यांना माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील जिल्हा कृषी अधिक्षक गोंदिया यांचेकडे दाखल केले. मात्र प्रथम अपील दाखल केल्यानंतरही त्यांना अपेक्षित माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषी अधिकारी, सडक अर्जुनी श्री एच. एस. शेवाळे हे उपस्थित होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी गोंदिया यांच्या वतीने श्री कावळे हे उपस्थित होते.

4. आजच्या सुनावणीस तालुका कृषी अधिकारी, श्री शेवाळे यांनी आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 27.12.2010 चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे दि. 28.12.2010 रोजी प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने माहिती अर्जा सोबत जोडलेल्या दारीद्रय रेषेखालील प्रमाणपत्रातील अपीलकर्त्याचे नाव आणि माहिती अर्जातील अपीलकर्त्याचे नाव यांच्या मध्ये फरक असल्यामुळे त्यांच्या कार्यालर्यातील तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी दि. 30.12.2010 च्या पत्राने अपीलकर्त्यास असे कळविले की अर्जाची पडताळणी केली असता अर्जामध्ये तसेच सोबत जोडलेल्या




शिधा पत्रीकेत कु. मनिषा हिरामण सोनवाने असे नाव आहे परंतू त्यासोबत जोडलेल्या दारीद्रय रेषेखालील प्रमाणपत्रामध्ये मनिषा हरिमान सोनेवाने असे नाव आहे. म्हणून या दोन्ही नावामध्ये फरक असल्यामुळे दारीद्रय रेषेखालील पुरावा ग्राहय धरता येत नाही म्हणून मागितलेल्या माहितीची फी भरण्याबाबत कळविले. तथापि अपीलकर्त्याने याबाबत जन माहिती अधिकारी यांचेकडे कोणताही खुलासा केला नाही अगर माहितीचे शुल्क भरले नाही म्हणून माहिती उपलब्ध करुन देता आली नाही असे तालुका कृषी अधिकारी, श्री शेवाळे यांनी आयोगा पुढे सांगितले. तसेच सुनावणीच्या वेळी अपीलकर्ता यांनी आयोगाच्या असे निदर्शनास आणून दिले की तालुका कृषी अधिकारी यांना

विभागीय कृषी सह संचालक नागपूर यांचेकडून दि. 22.3.2010 च्या पत्राने दारीद्रय रेषेखालील दाखल्याची खात्री करुन घेवून अपीलकर्त्यास विनामुल्य माहिती उपलब्ध करुन देण्याबाबत कळविले आहे.

5. अपीलकर्ता तसेच तालुका कृषी अधिकारी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की अपीलकर्त्याने माहिती अर्जात मागितलेली माहिती व त्यासोबत जोडलेल्या दारीद्रय रेषेखालील प्रमाणपत्रात या दोघांच्या नावामध्ये फरक आहे म्हणून अपीलकर्त्याने दारीद्रय रेषेखालील प्रमाणपत्रात दुरुस्त होण्यासाठी प्रस्ताव संबंधीत खात्याकडे सादर केलेला असल्याचे त्यांनी नमूद केले. म्हणून अपीलकर्ता यांच्या दारीद्रय रेषेखालील प्रमाणपत्राताच्या संदर्भात विभागीय कृषी सह संचालक नागपूर यांनी दिलेल्या सुचना लक्षात घेवून अपीलकर्त्यास विनामुल्य माहिती उपलब्ध करुन देण्याचे तालुका कृषी अधिकारी यांनी आयोगासमोर मान्य केले आणि त्यांनी आयोगासमोर अपीलकर्त्यास विनामुल्य माहिती उपलब्ध करुन दिली. सदरची माहिती अपीलकर्त्याने स्वीकृत करुन समाधान व्यक्त केले म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1907-1908

जा.क्र.————————— दि..................
मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 387 नाग/2011**

श्री दिलीप शामराव कापकर
मु. चंदनखेडा
ता. भद्रावती जि. चंद्रपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी

जिल्हाधिकारी कार्यालय चंद्रपूर
ता. जि. चंद्रपूर
2) श्री डी. जी. नान्हे
जन माहिती अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी
जिल्हाधिकारी कार्यालय चंद्रपूर
ता. जि. चंद्रपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 18.6.2011 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 1.3.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 24.5.2011 रोजी नोटीस काढून दि. 18.6.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता गैरहजर आहेत. मात्र उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हे गैरहजर असल्यामुळे त्यांचे प्रस्तूत प्रकरणी कोणतेही म्हणणे एकून घेता आलेले नाही. मात्र आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा विशेष भूअर्जन अधिकारी औष्णिक विद्युत केंद्र क्र. 3 चंद्रपूर श्री आर. सी. ठाकरे हे उपस्थित आहेत. तसेच श्री डी. जी. नान्हे विशेष भूअर्जन अधिकारी औष्णिक विद्युत केंद्र क्र. 2 चंद्रपूर हे उपस्थित आहेत.

3. जन माहिती अधिकारी श्री ठाकरे यांनी आयोगापुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 22.11.2010 चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे दि. 25.11.2010 रोजी प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने माहितीच्या अर्जात मागितलेली माहिती ही मौजा पाचगाव (मुसलमान) ता. भद्रावती जि. चंद्रपूर हे गाव थर्मल पावर स्टेशन चंद्रपूर येथील इरई धरणा करीता संपूर्ण गावाचे पुनर्वसन झाले आहे व ते गाव शेतीसह व घरासह धरणात गेलेले आहे तरी या गावातील श्री लहानू शंकर धानोकरक व साईबाबा धानोकरक यांचे मकान घर क्र. 39 संपादीत केलेले आहे. त्यावेळेला भूसंपादन कायदा सेक्शन 4,9,12 अन्वये अवार्ड झालेले आहे त्या अवार्ड ची प्रत त्यांनी मागितलेली होती. अपीलकर्त्याने सादर केलेल्या माहितीच्या अर्जा सोबत नमुना 4 ची जी झेरॉक्स प्रत दिलेली आहे ती अस्पष्ट असल्यामुळे अपीलकर्त्याने मागितलेल्या माहितीचा कोणताही बोध झाला नाही. म्हणून जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दि. 22.12.2010 रोजी पत्र पाठवून त्यांना असे कळविले की आपण अर्जात नमुद केल्याप्रमाणे मौजा पाचगाव (मुसलमान) येथील भू.प्र.क्र. 7/65/79–80 भूसंपादन प्रकरण कोणत्या शाखेचे आहे तसेच आपण सदर अर्जासोबत कलम 4 (1) ची नोटीस जोडलेली आहे. सदर नोटीस कोणत्या शाखेतील आहे हे स्पष्ट होत नाही म्हणून आपण स्पष्ट झेरॉक्स प्रत सादर करावी म्हणजे आपणास मागणी केलेली माहिती पुरविणे सोयीस्कर होईल असे अपीलकर्त्यास कळविण्यात आले होते. मात्र अपीलकर्त्याने स्पष्ट झेरॉक्स प्रत दिली नाही

2



किंवा त्यांच्या कार्यालयात ते स्वतः येवून त्यांना त्याबाबत कोणताही खुलासा केला नाही. मात्र अपीलकर्त्याने प्रथम अपील दाखल केले. प्रस्तूत प्रकरणात प्रथम अपीलीय अधिकारी
हे अतिरिक्त जिल्हाधिकारी आहेत. मात्र अपीलकर्त्याने जिल्हाधिकारी चंद्रपूर यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. त्यामुळे अतिरिक्त जिल्हाधिकारी यांचेकडे प्रथम अपील दाखल झालेले दिसत नाही. तथापि अपीलकर्त्याने मागितलेल्या माहितीचा शोध जन माहिती अधिकारी क्र. 3 आणि जन माहिती अधिकारी क्र. 2 यांनी त्यांच्या कार्यालयात अभिलेखागारात शोध घेतला. तथापि अपीलकर्त्याने सादर केलेल्या माहिती अर्जातील माहिती ही सन 1980 च्या कालावधीतील दिसून येते. त्यामुळे

अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही सुमारे 30 वर्षापेक्षा जास्त कालावधीची असल्याने अभिलेख कक्षात त्या माहिती बाबत शोध घवून देखील ती माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्त्यास जन माहिती अधिकारी क्र. 2 व 3 यांनी दि. 10.6.2011 व दि. 16.6.2011 च्या पत्राने कळविलेले आहे. सदरचे पत्र जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास पोस्टाने पाठविल्याबाबतचा पुरावा दोन्ही जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर दाखविला त्यावरुन असे दिसून येते की अपीलकर्त्यास जन माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध नाही असे कळविलेले आहे.

4. जन माहिती अधिकारी क्र. 2 आणि जन माहिती अधिकारी क्र. 3 यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही सन 1980 च्या कालावधीतील आहे. म्हणजे सुमारे 30 वर्षापेक्षा जास्त कालावधीची माहिती असल्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या अभिलेखात या माहितीचा शोध घवूनही माहिती उपलब्ध झालेली दिसत नाही म्हणून जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दि. 10.6.2011 व दि. 16.6.2011 च्या पत्राने कळविलेले आहे. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1907-1908

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 386 नाग/2011**

श्री डॉ. विष्णू राजाराम वैरागडे
08, न.प.कॉम्लेक्स, देसाईगंज
ता. देसाईगंज जि. गडचिरोली ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी

अनुसूचित जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती नागपूर
ता. जि. नागपूर
2) श्री गायकवाड
जन माहिती अधिकारी
अनुसूचित जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती नागपूर
ता. जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 18.6.2011 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 25.2.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 24.5.2011 रोजी नोटीस काढून दि. 18.6.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 11.12.2010 रोजी जन माहिती अधिकारी अनुसूचित जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती नागपूर यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन कु. माधुरी मुरारी मडावी यांना प्रदान केलेल्या जात वैधता प्रमाणपत्राबाबत खालीलप्रमाणे 4 मुद्यांवर माहिती मागितलेली होती.
1) जात पडताळणी विभागातील प्रकरण क्र. व्ही–736/33/06 या प्रकरणात लावलेल्या जाती संबंधी संपुर्ण दस्तऐवजाची प्रत देण्यात यावी.
2) पी–1 ची छायांकीत प्रत देण्यात यावी.
3) बुरड, करंडी ही जात सद्या कोणत्या संवर्गात मोडते याबाबतच्य शासन परीपत्रकाची छायांकीत प्रत
4) जात पडताळणी विभागाला खोटे दस्तऐवज सादर करण्याबाबत करण्यात येणा–या कार्यवाही बाबतची माहिती मागितलेली होती.
तथापि त्यांना जन माहिती अधिकारी यांचेकडून मुद्या क्र. 3 व 4 ची माहिती प्राप्त झाली. मात्र मुद्या क्र. 1 व 2 ची माहिती ही त्रयस्थ पक्षाशी संबंधीत असल्याने देता येत नाही असे जन माहिती अधिकारी यांनी कळविले. म्हणून त्यांनी प्रथम अपील दाखल केले. मात्र प्रथम अपील त्यांचे फेटाळल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी अनुसूचित जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती नागपूर श्री गायकवाड हे उपस्थित होते. त्यांनी आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 11.12.2010 चा माहितीचा अर्ज दि. 23.12.2010 रोजी प्राप्त झाला





होता. तथापि अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही जन माहिती अधिकारी अनुसूचित जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती गडचिरोली या कार्यालयाशी संबंधीत असल्यामुळे सदरचा अर्ज दि. 31.12.2010 रोजी पाठविण्यात आला आणि त्याची प्रत अपीलकर्त्यास देवून असे कळविले की सदरची माहिती प्राप्त करण्यासाठी गडचिरोली या कार्यालयाशी संपर्क साधावा. अपीलकर्त्याचा माहितीचा अर्ज जन माहिती अधिकारी गडचिरोली यांचेकडे प्राप्त झालेवर त्यांनी दि. 15.1.2011 च्या पत्राने अपीलकर्त्यास मुद्या क्र. 3 व 4 ची माहिती उपलब्ध करुन दिली आणि त्या पत्रात पुन्हा अपीलकर्त्यास असे

कळविले की मुद्या क्र. 1 व 2 ची माहिती ही त्रयस्थ पक्षाशी संबंधीत असल्याने त्याची माहिती आपणाला द्यावी किंवा कसे यासंबंधी त्रयस्थ पक्षाला विचारणा करणे आवश्यक आहे असे अपीलकर्त्यास जन माहिती अधिकारी यांनी कळविले. आणि त्यानंतर दि. 24.1.2011 च्या पत्राने अपीलकर्त्याने मागितलेली माहिती मुद्या क्र. 1 व 2 ची माहिती ही त्रयस्थ पक्षाशी संबंधीत असल्याने त्रयस्थ पक्ष म्हणून कु. माधुरी मुरारी मडावी यांना अपीलकर्त्यास मुद्या क्र. 1 व 2 ची माहिती द्यावी किंवा कसे यासंबंधी विचारणा केली. जन माहिती अधिकारी यांच्या दि. 24.1.2011 च्या पत्राला अनुसरुन कु. माधुरी मुरारी मडावी यांनी दि. 29.1.2011 च्या पत्राने असे कळविले की अपीलकर्ता विष्णू राजाराम वैरागडे हा गुंड प्रवृत्तीचा व लोकांना ब्लॅकमेल करणारा तसेच खोटे धंदा करणारा माणूस आहे. तो स्वतः बोगस पॅथॉलॉजीस्ट असून शासनाच्या नियमानुसार तो पॅथॉलॉजी चालविण्यास पात्र नसतांना सुध्दा तो बोगस पॅथॉलॉजी चालवितो तसेच त्याच्या विरुध्द लोकांच्या अनेक तक्रारी असल्यामुळे व पोलीस स्टेशन देसाईगंज यांच्या पत्रामुळे मी मुख्याधिकारी न. प. देसाईगंज तथा शहर आरोग्य अधिकारी या नात्याने त्याच्या मुळ कागदपत्रांची तपासणीसाठी गेले असतांना त्याने मला व माझ्या सहकारी कर्मचा–यांना मारहाण केली व पोलीसात याबाबत तक्रार केली. म्हणून या गुंड प्रवृत्तीच्या व समाजविघातक कृत्य करणा–या इसमास माझ्या संदर्भातील कुठलीही माहिती देण्यात येवू नये. कदाचीत या व्यक्तीमुळे भविष्यात मला मानसीक त्रास होवून माझे असलेल्या सामाजिक स्थानाला धक्का पोहोचण्याचा संभव आहे असे कु. माधुरी मुरारी मडावी यांनी जन माहिती अधिकारी यांना दि. 29.1.2011 च्या पत्राने कळविले. म्हणून जन माहिती अधिकारी यांनी देखील अपीलकर्त्यास दि. 29.1.2011 च्या पत्राने असे कळविले की आपल्या माहिती अर्जातील आपण मागितलेली मुद्या क्र. 1 व 2 ची माहिती कु. माधुरी मुरारी मडावी या त्रयस्थ पक्षाशी संबंधीत असल्याने त्यांनी आपणास माहिती पुरवू नये असे कळविलेले असल्यामुळे तसेच आपण मागितलेली माहिती ही कोणत्याही प्रकारे लोकहितार्थ नाही तसेच प्रथमदर्शनी सदरची माहिती आपण स्वहिताकरीता मागत असल्याचे दिसते. म्हणून माहिती पुरविल्यास त्रयस्थ पक्षाला नुकसान पोहोचण्याची शक्यता आहे म्हणून कु. माधुरी मुरारी मडावी यांनी कळविल्या नुसार उदभवणारे धोके लक्षात घेवून आपणास मुद्या क्र. 1 व 2 ची माहिती पुरविता येणार नाही असे जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दि. 29.1.2011 च्या पत्राने कळविल्याचे जन माहिती अधिकारी श्री गायकवाड यांनी आयोगापुढे सांगितले. त्यानंतर अपीलकर्त्याने प्रथम अपील सह आयुक्त तथा उपाध्यक्ष अनुसूचित जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती गडचिरोली यांचेकडे दाखल केले. मात्र प्रथम अपील देखील त्यांचे वरील करणास्तव फेटाळले असे श्री गायकवाड यांनी सुनावणीत नमुद केले.

4. अपीलकर्ता तसेच जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की अपीलकर्त्याच्या दि. 11.12.2010 च्या माहिती अर्जाला अनुसरुन जन माहिती अधिकारी यांनी दि. 15.1.2011 च्या पत्राने मुद्या क्र. 3 व 4 ची आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे आणि मुद्या क्र. 1 व 2 ची माहिती ही त्रयस्थ पक्षाशी संबंधीत असल्याने आणि त्रयस्थ पक्षाने वर नमुद केल्याप्रमाणे माहिती देण्यास विरोध केला असल्यामुळे अपीलकर्त्यास मुद्या क्र. 1 व 2 ची माहिती जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध न करुन देण्याबाबत अपीलकर्त्यास कळविलेले आहे ते योग्य दिसून येते. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

3



## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

( पी. डब्ल्यु. पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

नागपूर
Ageyord6.1910-1912

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 392 नाग/2011**

श्री डॉ. भास्कर रामराव काटे
71 विद्या विहार, प्रतापनगर, नागपूर
ता. जि. नागपूर –440022 ..... **अपिलकर्ता**

विरुध्द

1) श्री जी. एन. बडदरे सहसंचालक
प्रथम अपीलीय अधिकारी
संचालक, वैद्यकीय शिक्षण कार्यालय
कार्यालय 4 था माळा, शासकीय दंत महाविद्यालय,
सेंट जॉर्ज हॉस्पीटल परिसर, सीएसटी जवळ
फोर्ट, मुंबई 1.
2) श्री वाय. एम. सोनवणे प्रशासकीय अधिकारी
जन माहिती अधिकारी
संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन
कार्यालय 4 था माळा, शासकीय दंत महाविद्यालय,
सेंट जॉर्ज हॉस्पीटल परिसर, सीएसटी जवळ
फोर्ट, मुंबई 1. ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 20.6.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 1.3.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 24.5.2011 रोजी नोटीस काढून दि. 20.6.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता गैरहजर आहेत. मात्र उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हे गैरहजर असल्यामुळे त्यांचे प्रस्तूत प्रकरणी कोणतेही म्हणणे एकून घेता आलेले नाही. मात्र आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन मुंबई श्री वाय. एम. सोनवणे हे उपस्थित आहेत. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहसंचालक यांच्या वतीने श्री जी. एन. बडदरे हे उपस्थित आहेत.

3. जन माहिती अधिकारी श्री वाय. एम. सोनवणे यांनी आयोगापुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 5.10.2010 चा माहितीचा अर्ज त्यांच्या संचालनालयाकडे

2



दि. 15.10.2010 रोजी पोस्टाने प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने माहितीच्या अर्जात खालीलप्रमाणे दोन मुद्यांवर माहिती मागितलेली होती.

1) सुधारीत वेतन निश्चिती आदेश डॉ. भास्कर रामराव काटे यांचा दि. 1.1.1986 रोजी रु. 5600/- ऐवजी रु. 6300/- धरुन शासन पत्र क्र. एमईडी 2705/प्र.क्र.

/154/05 वैसेवा–1 दि. 30 ऑगष्ट 2010 ची चुक दुरुस्त करुन सुधारीत आदेश काढणे.
2) शासनाचे दुसरे आदेश पत्र ममाअ/3609/प्र.क्र.126/09/वैसेवा–1 दि. 18 सप्टेंबर आपणास तात्काळ कार्यवाहीसाठी हायकोर्ट पेंशन अदालत निकालाप्रमाणे रु. 10530 व 12 टक्के चक्रवाढ व्याज रक्कम डीसीआरजी देण्यासाठी आदेश देवूनही अजून पूर्तता केली नाही. वरील प्रमाणे दोन मुद्यांवर माहिती मागितलेली होती असे जन माहिती अधिकारी यांनी सांगितले. अपीलकर्त्याने मागितलेल्या माहितीच्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी आयोगाच्या असे निदर्शनास आणून दिले की अपीलकर्त्यास सुधारीत वेतन निश्चिती करुन पाहिजे आहे. त्या सुधारीत वेतन निश्चितीस शासनाच्या वित्त विभागाची मान्यतेची आवश्यकता असल्याने अपीलकर्त्याच्या मागणीप्रमाणे अपीलकर्त्याचा सुधारीत वेतन निश्चितीचा प्रस्ताव दि. 3.7.2010 रोजी पाठविलेला आहे. तथापि त्याबाबत शासनाकडे पाठपुरावा सुरु आहे. म्हणून अपीलकर्त्यास दि. 4.11.2010 च्या पत्राने माहितीच्या अधिकारा खालील अर्जाप्रमाणे असे कळविण्यात आले की आपण सुचविल्या नुसार आपल्या संचालक पदावरील वेतन निश्चितीबाबत शासनास प्रस्ताव सादर केलेला असून प्रस्तूत प्रकरणी वित्त विभागाची मान्यता आवश्यक आहे. सबब वेतन निश्चितीस शासनाची व वित्त विभागाची मान्यता प्राप्त झाल्यानंतर वेतन निश्चितीचे आदेश निर्गमीत करण्यात येतील व त्यानुसार इतर बाबी संदर्भात कार्यवाही करण्यात येईल असे स्पष्टपणे अपीलकर्त्यास जन माहिती अधिकारी यांनी दि. 4.11.2010 च्या पत्राने कळविल्याचे श्री सोनवणे यांनी आयोगापुढे असे सांगितले.

4. त्यानंतर अपीलकत्याने प्रथम अपील सहसंचालक यांचेकडे दाखल केले. सहसंचालक यांनी अपीलकर्त्यास प्रथम अपीलाच्या सुनावणीसाठी दि. 25.11.2010 आणि दि. 16.12.2010 च्या पत्राने हजर राहण्यास कळविले. मात्र अपीलकर्ता प्रथम अपीलाच्या सुनावणीस हजर झाले नाही म्हणून प्रथम अपीलाचा निर्णय देणे शक्य झाले नाही असे प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या वतीने हजर असलेले मुख्यप्रशासकीय अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले.

5. वास्तविक पाहता प्रथम अपील दाखल झाल्यानंतर प्रथम अपीलीय अधिकारी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (1) प्रमाणे 30 दिवसाच्या मुदतीत प्रथम अपीलाचा निर्णय देणे आवश्यक होते म्हणून भविष्यात सहसंचालक यांनी त्यांच्याकडे प्रथम अपील दाखल झाल्यानंतर मुदतीच्या आत प्रथम अपीलाची कार्यवाही करावी अशी त्यांना समज देण्यात येत आहे.

6. तथापि जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास त्यांच्या माहितीच्या अर्जाला अनुसरुन दि. 4.11.2010 च्या पत्राने आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिली असल्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे. 3



## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

( पी. डब्ल्यु. पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**नागपूर**
Ageyord6.1914-1916

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 391 नाग/2011**

डॉ. ज्योत्सना मेश्राम (त्रयस्थ पक्ष)
प्रोफेसर, रसायनशास्त्र विभाग
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री विलास रामटेके
प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपकुलसचिव(विषश विभाग)
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ नागपूर
2) जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक कुलसचिव(आस्थापना)
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ नागपूर
2) श्री सुनिलकुमार गयाप्रसाद मिश्रा
सेंट्रल इंडिया इन्स्टीटयुट ऑफ मास कम्युनिकेशन
व्ही.आय.पी.रोड धरमपेठ नगपूर – 10 ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 20.6.2011 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 3.3.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 24.5.2011 रोजी नोटीस काढून दि. 20.6.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी प्रस्तूत प्रकरणी प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपकुलसचिव(विषश विभाग) राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ नागपूर यांच्याकडील दि. 10.2.2010 च्या प्रथम अपीलाच्या निर्णयाच्या निर्णया विरुध्द सदरचे द्वितीय अपील राज्य माहिती आयोगाकडे दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी माहिती अधिकारा खालील अर्जदार श्री मिश्रा यांना त्यांची माहिती उपलब्ध करुन देण्याचे आदेश दिले. तथापि त्रयस्थ पक्ष म्हणून त्यांची माहिती श्री मिश्रा यांना देण्यात येवू नये असे त्यांनी आयोगापुढे सांगितले.

3. त्याचप्रमाणे अपीलकर्ता डॉ. ज्योत्सना मेश्राम यांनी आयोगापुढे असेही सांगितले की प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपकुलसचिव यांनी दि. 10.2.2010 रोजी दिलेला प्रथम अपीलाचा निर्णय त्यांना प्राप्त झाला. मात्र त्या निर्णया वरती कोणताही जावक क्रमांक व दिनांक नमुद नाही तसेच श्री मिश्रा हे गुन्हेगारी प्रवृत्तीचे असल्यामुळे त्यांना जाती वैधता प्रमाणपत्र पुरविल्यास त्यांच्या हिता विरुध्द दुरुपयोग करण्याची दाट शक्यता असल्यामुळे त्यांना त्यांचे दस्तऐवज पुरवू नये म्हणून प्रथम अपीलाचा निर्णय रद्यबातल ठरवावा असे त्यांनी राज्य माहिती आयोगा समोर नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक कुलसचिव श्री मनिष झोडापे यांच्या वतीने श्री अशोक साळवे हे उपस्थित होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपकुलसचिव श्री विलास रामटेके हे उपस्थित होते.

4. जन माहिती अधिकारी यांच्या वतीने उपस्थित असलेले श्री अशोक साळवे यांनी आयोगापुढे असे सांगितले की अर्जदार श्री मिश्रा यांचा दि. 1.11.2010 चा माहितीचा अर्ज विद्यापीठात प्राप्त





झाला होता. त्यानंतर अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही त्रयस्थ पक्षाशी संबंधीत असल्यामुळे त्रयस्थ पक्ष म्हणून डॉ. ज्योत्सना मेश्राम यांना श्री मिश्रा यांना माहिती द्यावी अगर कसे याबाबत दि. 8.12.2010 च्या पत्राने कळविले. डॉ. ज्योत्सना मेश्राम यांनी दि. 14.12.2010 च्या पत्राने माहिती देण्यात येवू नये असे कळविले म्हणून जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दि. 10.1.2011 च्या पत्राने असे कळविले की त्रयस्थ पक्ष या नात्याने डॉ. (श्रीमती ज्योत्सना मेश्राम) यांना त्यांचे

दस्तऐवज आपणास देण्याविषयी विचारणा केली असता त्यांनी कोणतेही दस्तऐवज देण्यात येवू नये असे त्यांनी कळविल्यामुळे त्यांचे कोणतेही दस्तऐवज आपणास देता येणार नाही असे अर्जदार श्री मिश्रा यांना जन माहिती अधिकारी यांनी दि. 10.1.2011 च्या पत्राने असे कळविले असे जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले.

5. त्यानंतर अपीलकर्त्याने प्रथम अपील उपकुलसचिव यांचेकडे दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी घेण्यात आली प्रथम अपीलाचा निर्णय दि. 10.2.2011 रोजी देण्यात येवून त्यामध्ये असे नमुद केले की जन माहिती अधिकारी यांनी माहितीच्या अधिकारात श्री सुनिल मिश्रा यांनी मागितलेली माहिती गोपनिय स्वरुपाची नसल्यामुळे एक आठवडयाच्या आत मा. कुलसचिव प्रशासकीय प्रमुख असल्यामुळे त्यांची परवानगी घेवून माहिती देण्यात यावी असे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी निर्णयात नमुद केले.

6. म्हणून प्रथम अपीलाच्या निर्णया नुसार जन माहिती अधिकारी यांनी कुलसचिव यांचेकडे माहिती देण्याबाबत परवानगी मागितली. तथापि दरम्यानच्या काळात त्रयस्थ पक्ष डॉ. श्रीमती ज्योत्सना मेश्राम यांनी आयोगापुढे द्वितीय अपील दाखल केले असे श्री अशोक साळवे यांनी आयोगापुढे सांगितले.

7. आजच्या सुनावणीस अर्जदार श्री मिश्रा हे आयोगा पुढे उपस्थित होते. त्यांनी आयोगापुढे असे सांगितले की प्रथम अपीलाच्या निर्णयाप्रमाणे त्यांना आवश्यक ती माहिती उपलब्ध होणे जरुरीचे आहे. त्याचप्रमाणे त्यांच्यावर कोणत्याही प्रकारचे गुन्हे देखील दाखल झालेले नाही त्याबाबत अपीलकर्ता डॉ. ज्योत्सना मेश्राम यांनी कोणतेही अधिकृत पुरावे आयोगापुढे दाखल केले नाही म्हणून त्यांचे म्हणणे ग्राहय धरु नये असे श्री मिश्रा यांनी आयोगापुढे सांगितले.

8. अपीलकर्ता तसेच जन माहिती अधिकारी यांच्या वतीने उपस्थित असलेले श्री अशोक साळवे आणि प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपकुलसचिव आणि श्री मिश्रा यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की श्री सुनिल मिश्रा यांनी त्यांच्याकडील दि. 1.11.2010 च्याा माहितीच्या अर्जात मागितलेली माहिती ही कोणत्याही प्रकारची गोपनिय स्वरुपाची दिसून येत नाही. डॉ. ज्योत्सना मेश्राम हया विद्यापीठाच्या रसायनशास्त्र विभागात प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत. त्यांच्या नेमणूकी विषयी मागितलेल्या माहितीच्या संदर्भात कोणतीही गोपनियता दिसून येत नाही. तसेच डॉ. ज्योत्सना मेश्राम यांची नियुक्ती ही गुणवत्तेच्या निकषावर पारदर्शकतेने झालेली आहे हे दिसणेसाठी देखील त्यांची माहिती अपीलकर्त्यास व्यापक जनहिताच्या दृष्टीकोनातून देणे योग्य व संयुक्तिक होईल. म्हणून प्रथम अपीलीय अधिकारी यांचा दि. 10.2.2011 चा निर्णय कायम करण्यात येत आहे.

## आ दे श

1) प्रथम अपीलीय अधिकारी यांचा दि. 10.2.2011 चा निर्णय कायम करण्यात येत असून अपीलकर्ता डॉ. ज्योत्सना मेश्राम यांचे अपील फेटाळण्यात येत आहे.
2) जन माहिती अधिकारी यांनी प्रथम अपीलाच्या निर्णया नुसार श्री सुनिल मिश्रा यांना हा आदेश मिळाल्यापासून 7 दिवसाचे आंत आवश्यक ती माहिती विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.





3) जन माहिती अधिकारी श्री मनिष झोडापे यांचेकडे श्री सुनिल मिश्रा यांचा दि. 1.11.2010 चा माहितीचा अर्ज दि. 3.11.2010 रोजी प्राप्त झाला. त्या अर्जावर 30 दिवसाच्या मुदतीत जन माहिती अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारचे उत्तर श्री मिश्रा यांना दिलेले नाही म्हणून श्री मिश्रा यांना माहिती उपलब्ध होण्यास झालेल्या विलंबाबद्यल ते जबाबदार दिसून येतात म्हणून त्यांचे विरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 20 (2) प्रमाणे

शिस्तभंगाच्या कार्यवाहीची कां शिफारस करु नये याचा लेखी खुलासा हा आदेश मिळाल्यापासून 15 दिवसाचे आंत आयोगाकडे सादर करावा.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1913-1915

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 393 नाग/2011

श्री विनोद माहेश्वरी
125 इंदिरा नगर तुमसर

ता. तुमसर जि. भंडारा – 441912 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपसचिव
महसूल व वन विभाग (ई–6)
मंत्रालय मुंबई 32.
2) श्री शिवाजी गोरे व श्री समिर सावंत(ज–8)
जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी,
महसूल व वन विभाग (ज–1)
मंत्रालय मुंबई 32. ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 20.6.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 1.3.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 24.5.2011 रोजी नोटीस काढून दि. 20.6.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता गैरहजर आहेत. मात्र उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हे गैरहजर असल्यामुळे त्यांचे प्रस्तूत प्रकरणी कोणतेही म्हणणे एकून घेता आलेले नाही.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, महसूल व वन विभाग मंत्रालय मुंबई श्री शिवाजी गोरे (ज–1) व श्री समिर सावंत(ज–8) हे उपस्थित होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपसचिव यांच्या वतीने जन माहिती अधिकारी यांनीच त्यांचा लेखी खुलासा आयोगाकडे सादर केलेला आहे.

4. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 1.11.2010 चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यासनाकडे प्राप्त झालेला नाही. तथापि मंत्रालयातील महसूल व वन विभागात एकुण सुमारे 56 जन माहिती अधिकारी कार्यरत





आहेत. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही त्यांच्या कार्यासनाशी संबंधीत आहे. तथापि अपीलकर्त्याचा माहितीचा अर्ज त्यांचेकडे प्राप्त झाला नाही. मात्र अपीलकर्त्याने प्रथम अपील उपसचिव महसूल व वन विभाग यांचेकडे दि. 15.12.2010 रोजी दाखल केले.

त्या प्रथम अपीलाची सुनावणी घेण्यात आली आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुनावणीअंती असा निर्णय दिला की अर्जदाराने जी माहिती अभिलेखाच्या स्वरुपात मागितलेली आहे ती माहिती उपलब्ध करुन द्यावी. त्यानुसार अपीलकर्ता यांना त्यांची मागणी क्र. 1 अन्वये सद्यस्थितीत लागू असलेले भुमीधारी व भुमीस्वामी संबंधातील सर्व परीपत्रकाच्या प्रती, जमीन प्रदान व भोगवटदार वर्ग 2 चे वर्ग 1 मध्ये रुपांतरण करणे, वापरात बदल याबाबतच्या सद्यस्थितीत लागू असलेल्या दि. 8.9.1983 च्या व दि. 23.3. 1992 च्या आदेशाच्या प्रती दि. 4.2.2011 च्या पत्राने उपलब्ध करुन दिलेल्या आहेत.

5. तसेच मागणी क्र. 2 अन्वये अपीलकर्त्याने विभागातील विविध कार्यासना कडून निर्गमीत केलेले आदेश महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर अपलोड करण्याची कार्यवाही त्या त्या कार्यासना कडून करण्यात येते. म्हणून सदरची माहिती शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध आहे असे जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले. तसेच अपीलकर्त्याचे मागणी क्र.3 नुसार अपीलकर्त्याने महाराष्ट्र जमीन महसूल पुस्तीका खंड 1 ते 5 ची मागणी केलेली आहे याबाबत महसूल विभागातील 5 कार्यासना कडून विभागीय आयुक्त नाशिक यांना जमीन महसूल संहिता खंड 1 ते 5 अद्यावत करुन पुनश्च छपाई करण्याचे आदेश दिलेले आहेत. म्हणून महाराष्ट्र जमीन महसूल पुस्तीका खंड 1 ते 5 छपाईचे काम पूर्ण झाल्यावर अपीलकर्त्यास उपलब्ध करुन देता येईल असे जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले.

6. जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे खुलासे विचारात घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की अपीलकर्त्याचा दि. 1.11.2010 चा माहितीचा अर्ज जन माहिती अधिकारी यांचेकडे प्राप्त झालेला दिसून येत नाही. मात्र अपीलकर्त्याने प्रथम अपील उपसचिव यांचेकडे दाखल केल्यानंतर प्रथम अपीलाच्या निर्णयाला अनुसरुन जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दि. 4.2.2011 च्या पत्राने त्यांचेकडे उपलब्ध असलेल्या दि. 8.9.1983 च्या व दि. 23.3.1992 च्या आदेशाच्या प्रती अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिलेल्या आहेत. मात्र महाराष्ट्र जमीन महसूल पुस्तीका खंड 1 ते 5 छपाई अद्याप पूर्ण झालेले नाही म्हणून त्याची प्रत उपलब्ध करुन देता आली नाही तथापी त्यांच्या विभागातील विविध कार्यासना कडून निर्गमीत करण्यात आलेल्या आदेशाच्या प्रती शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध आहेत याची माहिती अपीलकर्त्यास उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.



3

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय

मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना त्यांच्या विभागाच्या विविध कार्यासना कडून निर्गमीत करण्यात आलेले आदेश ज्या वेबसाईटवर अपलोड केलेले आहे त्या वेबसाईटची माहिती अपीलकर्त्यास उपलब्ध करुन द्यावी. तसेच महाराष्ट्र जमीन महसूल पुस्तीका खंड 1 ते 5 छपाईचे काम अद्याप पूर्ण झालेले नाही ते पूर्ण झाल्यानंतर त्याची माहिती उपलब्ध करुन देता येईल असे स्पष्टपणे अपीलकर्त्यास जन माहिती अधिकारी यांनी कळवावे.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1917-1919

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 400 नाग/2011**

श्री तापेश्वर पुंडलीकराव वैद्य
मु. पो. धानला
ता. मौदा जि. नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री सोमेश्वर नैताम
प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी(प्राथमिक विभाग)
जिल्हा परिषद नागपूर
ता. जि. नागपूर
2) श्री ए. बी. बाराहाते उपशिक्षणाधिकारी
जन माहिती अधिकारी
प्राथमिक शिक्षण विभाग जिल्हा परिषद नागपूर
ता. जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 21.6.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 7.3.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 30.5.2011 रोजी नोटीस काढून दि. 21.6.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता गैरहजर आहेत. मात्र उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हे गैरहजर असल्यामुळे त्यांचे प्रस्तूत प्रकरणी कोणतेही म्हणणे एकून घेता आलेले नाही. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी प्राथमिक शिक्षण विभाग जिल्हा परिषद नागपूर श्री ए. बी. बाराहाते हे उपस्थित होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी(प्राथमिक विभाग) जिल्हा परिषद नागपूर श्री सोमेश्वर नैताम हे उपस्थित होते.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी श्री ए. बी. बाराहाते यांनी आयोगापुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 13.9.2010 चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे दि. 14.9.2010 रोजी प्राप्त झाला. अपीलकर्त्याने सदरच्या माहितीच्या अर्जात सर्व शिक्षा अभियान अंतर्गत नगर परिषद कार्य क्षेत्रात मंजूर केलेल्या शाळा खोल्या किती तसेच शाळा निहाय, वर्ग निहाय पटसंख्या, सद्या अस्तित्वातील खाल्यांची संख्या, शाळा डिसमेंटल मंजूर असल्यास त्याच्या प्रती नगर परिषदेने जिल्हा परिषदेला शाळा खोल्या मागणी बाबत दिलेल्या पत्राच्या सत्यप्रती तसेच नगर परिषद कामठी, सावनेर, उमरेड, नरखेड, काटोल या सर्व नगर परिषदेला दिलेल्या शाळा खोल्या शाळा निहाय माहिती द्यावी अशी त्यांनी माहिती मागितलेली होती. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही संकलीत करण्यात आली आणि संकलीत करुन अपीलकर्त्यास दि. 6.10.2010 रोजी पत्र पाठवून माहितीचे शुल्क रु. 57/— नोंदणीकृत डाकेच्या खर्चासह भरण्याबाबत कळविले. तथापि अपीलकर्त्याने माहितीच्या शुल्कचा भरणा केला नाही म्हणून अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन देता आली नाही.





4. प्रथम अपीलीय अधिकारी श्री नैताम यांनी आयोगापुढे असे सांगितले की अपीलकर्त्याने प्रथम अपील त्यांच्याकडे दि. 29.12.2010 रोजी दाखल केले. सदरच्या प्रथम अपीलाची सुनावणी प्रथमतः दि. 6.1.2011, दि. 17.1.2011 व दि. 28.1.2011 रोजी ठेवण्यात आली. मात्र अपीलकर्ता सदरच्या प्रथम अपीलाची सुनावणीस गैरहजर राहिले म्हणून त्यांनी दि. 31.1.2010 रोजी प्रथम अपीलाचा निर्णय देवून अपीलकर्त्यास जन माहिती अधिकारी यांच्याकडून एक आठवडयाच्या आंत प्रत्यक्ष पोच

पावती देवून माहिती घेवून जावी असे अपीलकर्त्यास कळविले. व त्याची प्रत जन माहिती अधिकारी याना दिली. तथापि त्यानंतरही अपीलकर्ता जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाकडे माहिती घेण्यासाठी आले नाही. मात्र अपीलकर्त्याने जन माहिती अधिकारी यांना दि. 7.2.2011 च्या पत्राने असे कळविले की त्यांना माहिती पोस्टद्वारे पाठविण्यात यावी. त्याला अनुसरुन जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दि. 1.3.2011 च्या पत्राने आवश्यक ती माहिती अपीलकर्त्यास विनामुल्य रजिस्टर पोस्टद्वारे पाठविल्याचे जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले. त्याबाबतचा रजिस्टर पोस्टाचा पुरावा जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे दाखविला.

5. जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास प्रथम अपीलाच्या निर्णयानुसार आवश्यक ती माहिती विनामुल्य रजिस्टर पोस्टाने दि. 1.3.2011 च्या पत्राने उपलब्ध करुन दिलेली आहे. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1921-1922

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 284 नाग/2011**

श्री सुरेश शालिकराम दुरुगकर
श्रीनगर बब्बाभवनजवळ, चंद्रशेखरवार्ड, गोंदिया
ता. जि. गोंदिया ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपसंचालक
अनुसूचित जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती नागपूर
गिरीपेठ नागपूर
2) श्री आर. आर. गायकवाड
जन माहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी
अनुसूचित जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती नागपूर
गिरीपेठ नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 21.6.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 15.2.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 4.5.2011 रोजी नोटीस काढून दि. 2.6.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. मात्र सदरच्या दिवशी सुनावणी न होवू शकल्यामुळे प्रस्तुत सुनावणी आज दि. 21.6.2009 रोजी घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हे स्वतः हजर होते. त्यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 27.12.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी अनुसूचित जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती नागपूर यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन ठाकूर जमातीच्या जाती वैधता प्रमाणपत्रा बाबत 1 ते 5 मुद्यांवर माहिती मागितलेली होती. तथापि त्यांना जन माहिती अधिकारी यांचेकडून दि. 1.1.2011 च्या पत्राने असे कळविले की सदरची माहिती माहिती अधिकार कायदा कलम 7 (2) प्रमाणे मोठया स्वरुपात असल्यामुळे मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देता येत नाही असे कळविले. आणि मुद्या क्र. 4 च्या संदर्भात समितीचे कामकाज ॲक्टच्या नियमानुसार चालते त्या संदर्भात 34 कागदपत्रे असून त्याचे शुल्क भरुन मुद्या क्र. 4 ची माहिती उपलब्ध करुन देता येईल असे त्यांना जन माहिती अधिकारी यांनी कळविले. मात्र अपीलकर्त्यास मुख्यतः ठाकूर जमातीच्या उमेदवारांबाबत वैधता प्रमाणपत्र देण्याची माहिती पाहिजे होती मात्र ती न मिळाल्यामुळे त्यांनी प्रथम अपील दाखल केले. मात्र प्रथम अपीलाची सुनावणी झाली नाही आणि निर्णय देखील त्यांना मिळाला नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी श्री आर. आर. गायकवाड हे उपस्थित होते. त्यांनी आजच्या सुनावणीस आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 27.12.2010 चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. परंतू अपीलकर्त्याने मागितलेल्या माहितीचे स्वरुप हे मोठे असल्यामुळे अपीलकर्त्यास दि. 1.1.2011 च्या पत्राने असे कळविले की आपण मागितलेल्या माहितीच्या संदर्भात या प्राधिकरणाची सामग्री प्रमाणा बाहेर वळवावी लागणार आहे म्हणून कलम 7 (2) प्रमाणे माहिती देता येत नाही असे कळविले. सदरचे पत्र अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याचे त्यांनी सुनावणीत मान्य केले. मात्र अपीलकर्त्याने आयोगा



पुढे असे सांगितले की व्यापक जनहितासाठी त्यांना सदरच्या माहितीची आवश्यकता आहे. म्हणून जन माहिती अधिकारी यांच्या म्हणण्या नुसार जरी त्यांना ठाकूर जमातीच्या उमेदवाराना समितीने जे जात वैधता प्रमाणपत्र दिलेले आहे त्याची त्यांना यादी उपलब्ध झाल्यास त्यांना मिळालेल्या माहितीचे व्यापक जनहितासाठी उपयोग होवू शकेल असे त्यांनी आयोगा पुढे सांगितले.

4. तसेच प्रस्तूत प्रकरणात अपीलकर्ता यांनी प्रथम अपील दाखल केल्याचे आयोगा पुढे सांगितले. मात्र अपीलकर्त्याचे प्रथम अपील कार्यालयात प्राप्त झाले नाही असे जन माहिती अधिकारी यांनी आयोगाच्या निदर्शनास आणून दिले. अपीलकर्त्याने प्रथम अपीलाचा अर्ज हा कुरीअरने पाठविल्याचे सांगितले. तथापि कुरीअरने देखील सदरचा अर्ज प्राप्त झाला नाही असे जन माहिती अधिकारी यांनी सांगितले. त्यामुळे प्रथम अपीलाचा निर्णय देता आला नाही.

5. अपीलकर्ता तसेच जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की जन माहिती अधिकारी यांनी आयोगा समोर मान्य केल्या प्रमाणे अपीलकर्ता यांना ठाकूर जमातीच्या उमेदवाराना वैधता प्रमाणपत्र दिल्याची यादी विनामुल्य उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना त्यांच्या कार्यालयात उपलब्ध असलेल्या रेकॉर्डवरुन ठाकूर जमातीच्या उमेदवाराना दिलेल्या वैधता प्रमाणपत्र देण्यात आल्याची यादी विनामुल्य हा आदेश मिळाल्यापासून 15 दिवसाचे आत उपलब्ध करुन द्यावी.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

( पी. डब्ल्यु. पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**नागपूर**
Ageyord6.1924-1925

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 407 नाग/2011

श्री फैजान अख्तर व. अब्दुल खालिक

हन्डी ओली, गुजर बाजार, कामठी
ता. कामठी जि. नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री सोमेश्वर नैताम
प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक विभाग)
जिल्हा परिषद नागपूर
ता. जि. नागपूर
2) श्री ए. बी. बाराहाते
जन माहिती अधिकारी
प्राथमिक शिक्षण विभाग जिल्हा परिषद नागपूर
ता. जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 22.6.2011 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 8.3.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 30.5.2011 रोजी नोटीस काढून दि. 22.6.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 13.12.2010 रोजी जन माहिती अधिकारी प्राथमिक शिक्षण विभाग जिल्हा परिषद नागपूर यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन राष्ट्रीय उर्दू उच्च प्राथमिक शाळा कामठी यांचा चौकशी अहवाल, शाळेला देण्यात आलेली नॉन सॅलरी ग्रॅन्ट आणि माजी मुख्याध्यापिका सुल्ताना शाहीन यांच्या स्वेच्छा निवृत्ती प्रकरणात आणि दिलेल्या पगाराबाबत माहिती मागितलेली होती. आणि अपीलकर्त्याने सन 1995 पासून आजपर्यंत या कालावधीची माहिती मागितलेली होती. तथापि त्यांना माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील शिक्षणाधिकारी यांचेकडे दाखल केले. परंतू प्रथम अपीलानंतरही त्यांना अपेक्षित माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

2



3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी प्राथमिक शिक्षण विभाग जिल्हा परिषद नागपूर श्री ए. बी. बाराहाते हे उपस्थित होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी

तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक विभाग) जिल्हा परिषद नागपूर श्री सोमेश्वर नैताम हे उपस्थित होते.

4. जन माहिती अधिकारी श्री बाराहाते यांनी आजच्या सुनावणीस आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 13.12.2010 चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही मुख्याध्यापक राष्ट्रीय उर्दू उच्च प्राथमिक शाळा कामठी यांचेशी संबंधीत असल्यामुळे त्यांना दि. 22.12.2010 रोजी माहितीचा अर्ज पाठविला आणि अपीलकर्त्यास दि. 22.12.2010 च्या पत्राने असे कळविले की आपण मागितलेल्या माहितीसाठी मुख्याध्यापक हे जन माहिती अधिकारी असल्यामुळे त्यांचेकडून माहिती प्राप्त करुन घ्यावी असे जन माहिती अधिकारी यांनी त्यांना कळविले.

5. त्यानंतर मुख्याध्यापक यांनी अपीलकर्त्याची माहिती तयार केली आणि त्यांनी ती माहिती शिक्षणाधिकारी (प्राथमिक विभाग) जिल्हा परिषद नागपूर यांचेकडे पाठविली. कारण मुख्याध्यापकाकडून अपीलकर्त्यास पाठविलेली माहिती ते स्वीकृत करीत नाही असे मुख्याध्यापक यांचे म्हणणे असल्यामुळे त्यांनी शिक्षणाधिकारी यांचेकडे सदरची माहिती पाठविली. त्यानंतर अपीलकर्त्याने प्रथम अपील शिक्षणाधिकारी यांचेकडे दाखल केले. प्रथम अपीलाच्या सुनावणीस अपीलकर्ता हे गैरहजर राहिले. त्यामुळे त्यांना माहिती उपलब्ध करुन देता आली नाही असे जन माहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले. मात्र आज आयोगा समोर सुनावणीच्या वेळी अपीलकर्त्यास शाळेच्या मुख्याध्यापकानी सादर केलेली माहिती उपलब्ध करुन दिली. सदरची माहिती अपीलकर्त्याने आयोगा समोर प्राप्त केली. मात्र अपीलकर्ता यांचे म्हणणे आहे की त्यांनी माहितीच्या अधिकारात शिक्षणाधिकारी यांनी या उर्दू शाळेला दिलेल्या भेटीचा अहवाल याची माहिती त्यांना शिक्षणाधिकारी यांचेकडून मिळणे आवश्यक आहे. तसेच शाळेच्या माजी मुख्याध्यापिका सुल्ताना शाहीन यांच्या स्वेच्छा निवृत्ती प्रकरणा बाबतची माहिती व त्यांना दिलेल्या स्वेच्छा निवृत्ती लाभाची माहिती शिक्षणाधिकारी यांचेकडून मिळणे आवश्यक आहे. कारण सदरची माहिती शिक्षणाधिकारी यांचेशी संबंधीत आहे असे अपीलकर्त्याने सुनावणीत नमुद केले.

6. अपीलकर्ता तसेच जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की अपीलकर्त्यास शाळेच्या संबंधी असलेली माहिती प्राप्त झालेली आहे. मात्र शिक्षणाधिकारी यांचेशी संबंधीत असलेली माहिती प्राप्त झाली नाही. म्हणून शिक्षणाधिकारी यांनी अपीलकर्त्यास त्यांच्या कार्यालयाशी संबंधीत असलेली माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.



3

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे. प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी यांनी राष्ट्रीय उर्दू उच्च प्राथमिक शाळा कामठी या शाळेला शिक्षणाधिकारी यांच्या मार्फत दिलेला भेट अहवाल किंवा चौकशी अहवाल अपीलकर्त्यास उपलब्ध करुन द्यावा. तथापि भेट अहवाल किंवा चौकशी अहवाल उपलब्ध नसल्यास तसे स्पष्टपणे अपीलकर्त्यास कळवावे.

2) शाळेच्या माजी मुख्याध्यापिका सुल्ताना शाहीन यांच्या स्वेच्छा निवृत्तीचे प्रकरण त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाले असल्यास त्याबाबतची वस्तुस्थिती अपीलकर्त्यास कळवावी. तसेच त्यांना दिलेल्या स्वेच्छा निवृत्ती लाभाची माहिती देखील उपलब्ध करुन द्यावी. वर नमुद केलेल्या दोन मुद्यांची माहिती प्रथम अपीलीय अधिकारी किंवा जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास 15 दिवसाचे आंत विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.

3) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1924-1926

जा.क्र.—————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 414 नाग/2011**

श्री प्रदीप फेन्दुजी राउत
वार्ड क्र. 3, रामधन चौक भिवापूर
ता. भिवापूर जि. नागपूर 441201 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री वाय. आर. बोरकर
प्रथम अपीलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी(पंचायत)
पंचायत समिती भिवापूर
ता. भिवापूर जि. नागपूर
2) श्री यु. जे. वसू
जन माहिती अधिकारी तथा ग्रामविस्तार अधिकारी,
ग्रामपंचायत भिवापूर
ता. भिवापूर जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 23.6.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 9.9.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 30.5.2011 रोजी नोटीस काढून दि. 23.6.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हे स्वतः हजर होते. त्यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 7.12.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा ग्रामविस्तार अधिकारी, ग्रामपंचायत भिवापूर यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन ग्रामपंचायत मधील सरकारी नळ कनेक्शन तसेच पाईप लाईन दुरुस्तीचे भंगार याबद्यल माहिती मागितलेली होती. त्यांना जन माहिती अधिकारी यांनी माहितीचे शुल्क भरण्याबाबत दि. 27.12.2010 रोजी कळविले त्यानुसार त्यांनी माहितीचे शुल्क रु. 2000/- ग्रामपंचायत कार्यालयात दि. 6.1.2011 रोजी भरणा केले. मात्र त्यानंतरही त्यांना मुदतीत माहिती मिळाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील विस्तार अधिकारी(पंचायत) पंचायत समिती भिवापूर यांचेकडे दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी दि. 14.2.2011 ला घेण्यात आली आणि त्या सुनावणीच्या वेळी त्यांना जन माहिती अधिकारी यांचेकडून माहिती प्राप्त झाली परंतू विलंबाने माहिती प्राप्त झाली त्यामुळे त्यांना आता विनामुल्य माहिती देणे आवश्यक असल्याने त्यांनी भरलेले माहितीचे शुल्क रु. 2000/- त्यांना परत मिळावे असे त्यांनी आयोगापुढे सांगितले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा ग्रामविस्तार अधिकारी, ग्रामपंचायत भिवापूर श्री यु. जे. वसू हे उपस्थित होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी श्री वाय. आर. बोरकर हे उपस्थित होते.

4. जन माहिती अधिकारी तथा ग्रामविस्तार अधिकारी, ग्रामपंचायत भिवापूर श्री यु. जे. वसू यांनी आजच्या सुनावणीस आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 7.12.2010 चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने मागितलेल्या माहितीच्या संदर्भात माहितीचे शुल्क काढण्यात आले आणि अपीलकर्त्यास दि. 27.12.2010 च्या पत्राने माहितीचे शुल्क रु. 2000/– भरण्याबाबत कळविण्यात आले. अपीलकर्त्याने माहितीचे शुल्क रु. 2000/– दि. 6.1.2011 रोजी भरणा केले. आणि अपीलकर्त्यास झेरॉक्स काढून माहिती 7 दिवसाचे आत उपलब्ध करुन देण्यात येईल असे अपीलकर्त्यास दि. 7.1.2011 च्या पत्राने कळविले. तथापि अपीलकर्त्याने मागितलेल्या झेरॉक्स प्रती हया 7 दिवसात काढून तयार झाल्या नाही. त्यानंतर झेरॉक्सच्या प्रती तयार करण्यात आल्या आणि अपीलकर्त्यास दि. 31.1.2011 च्या पत्राने ती माहिती उपलब्ध करुन देण्यासाठी ग्रामपंचायतच्या शिपाया मार्फत पाठविली. त्या दरम्यानच्या काळात अपीलकर्त्याने प्रथम अपील विस्तार अधिकारी(पंचायत) पंचायत समिती भिवापूर यांचेकडे दाखल केले. अपीलकर्त्यास शिपाया मार्फत दि. 31.1.2011 च्या पत्राने पाठविलेली माहिती त्यांनी घेण्यास नकार दिला म्हणून अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन देता आली नाही. असे जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीत नमुद केले. त्यावर अपीलकर्त्याने आयोगा पुढे असे सांगितले की जन माहिती अधिकारी यांनी त्यांना फी भरणा केल्यानंतर त्यांनी कळविल्याप्रमाणे 7 दिवसाचे आत माहिती उपलब्ध करुन दिली नाही. म्हणून त्यांनी प्रथम अपील दाखल केले होते. प्रथम अपीलाच्या सुनावणीच्या वेळी अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन दिली ती अपीलकर्त्याने स्वीकारली. परंतू माहिती देण्यास विलंब झाल्यामुळे आता त्यांना माहिती विनामुल्य मिळणे जरुरीचे असून त्यांनी भरलेली फी त्यांना परत करणे आवश्यक आहे असे अपीलकर्त्याने सुनावणीत सांगितले.

5. आजच्या सुनावणीस प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुनावणीत असे सांगितले की अपीलकर्त्याचे प्रथम अपील दाखल झाले होते. प्रथम अपीलाची सुनावणी दि. 14.2.2011 ला घेण्यात आली आणि सुनावणीच्या दरम्यान जन माहिती अधिकारी यांनी आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिली आणि ती माहिती अपीलकर्त्याने स्वीकृत केली असे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सांगितले.

6. अपीलकर्ता तसेच जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की अपीलकर्त्याने दि. 7.12.2010 च्या माहिती अर्जाला अनुसरुन माहिती मागितलेली होती. त्याला अनुसरुन जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास माहितीचे शुल्क रु. 2000/– भरण्याबाबत कळविले त्यानुसार त्यांनी माहितीचे शुल्क रु. 2000/– ग्रामपंचायत कार्यालयात दि. 6.1.2011 रोजी भरणा केले. त्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी 7 दिवसाचे आत माहिती उपलब्ध करुन देण्यात येईल असे कळविले. तथापि जन माहिती अधिकारी

यांचेकडून त्या मुदतीत अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध झाली नाही. त्यानंतर दि. 14.2. 2011 रोजी प्रथम अपीलाच्या सुनावणीत अपीलकर्त्यास आवश्यक ती माहिती उपलब्ध झालेली दिसते. म्हणून अपीलकर्त्यास मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येत नाही. म्हणून माहिती विलंबाने उपलब्ध करुन दिली असल्यामुळे अपीलकर्त्यास माहितीचे शुल्क परत करणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 7 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना माहिती विलंबाने उपलब्ध करुन दिली असल्यामुळे माहितीचे शुल्क रु. 2000/- परत करावे आणि रक्कम परत केल्याबाबतची पोच प्राप्त करावी.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1928-1930

जा.क्र.--------- दि..................
मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 416 नाग/2011**

श्री अशोक माणीकराव भजन
रा. लिंगा(सावळी) पो. काटोल
ता. काटोल जि. नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) डॉ. उदय पाटील
प्रथम अपीलीय अधिकारी तथा जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी
नागपूर
ता. जि. नागपूर

2) डॉ. अर्जना प्र. कडू कृषी उपसंचालक
जन माहिती अधिकारी
जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी कार्यालय नागपूर
ता. जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 23.6.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 28.1.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 30.5.2011 रोजी नोटीस काढून दि. 23.6.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 11.10.2010 रोजी जन माहिती अधिकारी जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी कार्यालय नागपूर यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन सन 2008–2009, 2009–2010 या वर्षात केंद्र व राज्य सरकार तर्फे आपल्या मार्फत किंवा सरळ तालुका कृषी अधिकारी काटोल व कळमेश्वर यांना त्यांच्या अधिकार क्षेत्रात येणा–या सर्व विभागाकरीता किती निधी देण्यात आला व त्या निधीचा खर्च त्यांनी कुठे व कसा केला व त्याचा लाभ कोणकोणत्या शेतक–यांना मिळाला त्यांची नावे व पत्ता इत्यादी बाबत माहिती

मागितलेली होती. तथापि त्यांना जन माहिती अधिकारी यांचेकडून अपेक्षित माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील दाखल केले. मात्र प्रथम अपीला नंतरही त्यांना अपेक्षित माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा कृषी उपसंचालक डॉ. अर्जना प्र. कडू हया उपस्थित होत्या. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी नागपूर डॉ. उदय पाटील हे उपस्थित होते.

4. जन माहिती अधिकारी तथा कृषी उपसंचालक डॉ. अर्जना प्र. कडू यांनी आजच्या सुनावणीस आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 11.10.2010 चा माहितीचा अर्ज यांच्या कार्यालयाकडे दि. 18.10.2010 रोजी प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती सुस्पष्ट नसल्याने आणि अपीलकर्त्यास निश्चित स्वरुपात कोणती माहिती पाहिजे आहे याचा बोध झाला नाही म्हणून अपीलकर्त्यास दि. 18.10.2010 च्या पत्राने असे कळविले की आपण माहितीच्या अधिकारात मागितलेल्या माहितीच्या संदर्भात आपला अर्ज तपासला असता कोणती माहिती पाहिजे आहे याचा बोध होत नाही तसेच इतर तालुक्याशी संबंधीत असलेली माहिती पाहिजे असल्यास संबंधीत कार्यालयात स्वतंत्ररीत्या अर्ज सादर करावा म्हणजे यांचेकडून आपणास माहिती पुरविण्यात येईल असे जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास कळविले. त्यामुळे त्यांनी प्रथम अपील दाखल केले. मात्र प्रथम अपील विभागीय सह संचालक यांचेकडे दाखल केलेले होते. म्हणून जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास असे कळविले की जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी नागपूर कार्यालयात प्रथम अपीलीय अधिकारी नियुक्त आहेत त्यांचे नावाने अपील करावे असे त्यांना कळविले. तथापी त्यानंतर अपीलकर्त्याने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

5. याबाबत अपीलकर्त्याने आयोगापुढे असे सांगितले की त्यांना नागपूर जिल्हयासाठी केंद्र व राज्य सरकार यांच्या मार्फत कृषी विभागासाठी ज्या योजना आलेल्या आहेत त्या कोणकोणत्या योजना आहेत आणि त्यास किंती निधी नागपूर जिल्हयासाठी प्राप्त झालेला आहे त्याची माहिती त्यांना मिळणे आवश्यक आहे.

6. म्हणून आज आयोगा समक्ष जन माहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी आणि अपीलकर्ता यांचेशी झालेल्या चर्चे प्रमाणे अपीलकर्ता यांना नागपूर जिल्हयासाठी प्राप्त झालेल्या केंद्र व राज्य सरकारच्या कृषी विभागा मार्फत राबविण्यात येणा–या निधीची माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

3

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना संपूर्ण नागपूर जिल्हयासाठी कृषी विभागा मार्फत राबविण्यात येणा—या केंद्र व राज्य सरकारच्या योजनांसाठी माहिती प्राप्त झालेल्या निधीची माहिती विनामुल्य व्यक्तीशः किंवा रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन द्यावी.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1932-1934

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 423 नाग/2011**

श्री मच्छींद्र जंगलुजी आवळे
42 कानफाडे नगर, वर्धा रोड नागपूर
ता. जि. नागपूर –15 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री एस. पी. पासेबंद
प्रथम अपीलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता
नागपूर सुधार प्रन्यास, विभागीय कार्यालय अंबाझरी नागपूर
उत्तर अंबाझरी मार्ग नागपूर
2) श्री पी. डी. गांगुली
जन माहिती अधिकारी तथा विभागीय अधिकारी(पश्चिम)
नागपूर सुधार प्रन्यास, विभागीय कार्यालय अंबाझरी नागपूर
उत्तर अंबाझरी मार्ग नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 28.6.2011 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 10.3.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 30.5.2011 रोजी नोटीस काढून दि. 28.6.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 12.12.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा विभागीय अधिकारी(पश्चिम) नागपूर सुधार प्रन्यास, विभागीय कार्यालय अंबाझरी नागपूर यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन विभागीय कार्यालय अंबाझरी नागपूर यांचेकडून दि. 5.10.2007 व दि. 6.10.2007 मौजा अजनी ख. क्र. 72/2 मधील प्लॉट कं. 85 अ बाबत माहिती मागितलेली होती. तथापि त्यांना जन माहिती अधिकारी यांनी दि. 10.1.2011 च्या पत्राने असे कळविले की ख. क्र. 72/2 मौजा अजनी प्लॉट कं. 85 अ जागेवर कोणतीही कार्यवाही केलेली नाही. तथापि अपीलकर्ता यांच्या जवळ नागपूर सुधार प्रन्यासचा नकाशाची झेरॉक्स प्रत असून त्यामध्ये ख. क्र. 72/2 मौजा अजनी प्लॉट कं. 85 अ हा दर्शविलेला आहे असे अपीलकर्ता यांचे म्हणणे आहे. म्हणून जन माहिती अधिकारी यांनी दिलेली माहिती ही चुकीची असल्यामुळे त्यांनी प्रथम अपील कार्यकारी अभियंता यांचेकडे दाखल केल्याचे आयोगापुढे सुनावणीत नमुद केले. तथापि कार्यकारी अभियंता यांनी त्यांचे प्रथम अपील फेटाळले म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा विभागीय अधिकारी श्री पी. डी. गांगुली हे उपस्थित होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता श्री एस. पी. पासेबंद हे उपस्थित होते.

4. जन माहिती अधिकारी यांनी आजच्या सुनावणीस आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 12.12.2010 चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. त्याला अनुसरुन अपीलकर्त्यास असे कळविले की ख. क्र. 72/2 मौजा अजनीच्या मंजूर लेआऊट नकाशामध्ये भूखंड क्रमांक 85 अ हा दर्शविलेला नसल्यामुळे भूखंड क्रमांक 85 अ वर कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्भवत नाही असे अपीलकर्त्यास जन माहिती अधिकारी यांनी दि. 10.1.2011 च्या

पत्राने कळविलेले आहे. मात्र याबाबत अपीलकर्त्याचे असे म्हणणे आहे की त्यांचेकडे नागपूर सुधार प्रन्यास यांचेकडील नकाशाची प्रत असून त्यामध्ये भूखंड कं. 85 अ हा दर्शविलेला आहे. मात्र जन माहिती अधिकारी आणि कार्यकारी अभियंता यांनी आयोगाच्या असे निदर्शनास आणून दिले की नागपूर सुधार प्रन्यास यांचेकडून ख. क. 72/2 मौजा अजनीच्या सन 2001 मध्ये मंजूर झालेल्या लेआऊट मध्ये भूखंड कमांक 85 अ हा दर्शविलेला नाही. त्यामुळे नागपूर सुधार प्रन्यासच्या मंजूर लेआऊट मधील नकाशामध्ये आज रोजी 85 अ हा भूखंड अस्तित्वात नाही असे त्यांनी आयोगाच्या निदर्शनास आणून दिले.

5. अपीलकर्ता तसेच जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की नागपूर सुधार प्रन्यास यांचेकडून सन 2001 साली ख. क. 72/2 मौजा अजनीच्या मंजूर लेआऊट नकाशामध्ये भूखंड कमांक 85 अ हा दर्शविलेला नाही आणि या मंजूर नकाशाशिवाय नागपूर सुधार प्रन्यासने ख. क. 72/2 च्या इतर कोणत्याही नकशास मंजूरात दिलेली नाही असे स्पष्टपणे अपीलकर्त्यास विनामुल्य व्यक्तीशः किंवा रजिस्टर पोस्टाने कळवावे आणि त्या सोबत अपीलकर्त्यास ख. क. 72/2 च्या मंजूर लेआऊट नकाशाची झेरॉक्स प्रत विनामुल्य उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 15 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना नागपूर सुधार प्रन्यास यांचेकडून सन 2001 साली ख. क. 72/2 मौजा अजनीच्या मंजूर लेआऊट नकाशामध्ये भूखंड कमांक 85 अ हा दर्शविलेला नाही आणि या मंजूर नकाशाशिवाय नागपूर सुधार प्रन्यासने ख. क. 72/2 च्या इतर कोणत्याही नकशास मंजूरत दिलेली नाही असे स्पष्टपणे अपीलकर्त्यास विनामुल्य व्यक्तीशः किंवा रजिस्टर पोस्टाने कळवावे आणि त्या सोबत अपीलकर्त्यास ख. क. 72/2 च्या मंजूर लेआऊट नकाशाची झेरॉक्स प्रत विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1936-1937

जा.क.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 422 नाग/2011**

श्री सुरेश देविदास पाचभाई
भिवापूर वार्ड नं.5
ता. भिवापूर जि. नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री सुर्यवंशी
प्रथम अपीलीय अधिकारी तथा जिल्हा अधिक्षक
भूमी अभिलेख कार्यालय नागपूर
ता. जि. नागपूर
2) श्री एस. के. पाटील
जन माहिती अधिकारी तथा उपअधिक्षक
भूमी अभिलेख कार्यालय भिवापूर
ता. भिवापूर जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 28.6.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 10.3.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 30.5.2011 रोजी नोटीस काढून दि. 28.6.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 13.12.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा उपअधिक्षक भूमी अभिलेख कार्यालय भिवापूर ता. भिवापूर जि. नागपूर यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन प.ह.नं.78 येथील जुना सर्व्हे नं. 330/3 तुळजाबाई गोविंदा पाचभाई आणि जुना सर्व्हे क्र. 330/2 दौलत गोविंदा पाचभाई यांच्या शेतीला एकत्रिकरणात कोणकोणते गट पडले त्या गटाचा नकाशा व एकत्रिकरण पत्राची माहिती मागितलेली होती. त्यांना जन माहिती अधिकारी यांचेकडून 30 दिवसात कोणतीही माहिती प्राप्त झाली नाही. मात्र दि. 25.3. 2011 च्या पत्राने माहिती उपलब्ध झाली मात्र सदरची माहिती विलंबाने उपलब्ध झाली असल्यामुळे जन माहिती अधिकारी यांचे विरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम 2005 अन्वये कार्यवाही करावी अशी मागणी अपीलकर्ता यांनी आयोगापुढे केली

3. आजच्या सुनावणीस विद्यमान जन माहिती अधिकारी तथा उपअधिक्षक भूमी अभिलेख भिवापूर श्री एस. के. पाटील हे उपस्थित होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा जिल्हा अधिक्षक भूमी अभिलेख श्री सुर्यवंशी हे उपस्थित होते.

4. जन माहिती अधिकारी श्री पाटील यांनी आजच्या सुनावणीस आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 13.12.2010 चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे दि. 15.12.2010 रोजी प्राप्त झाला होता. तथापि त्यावेळी जन माहिती अधिकारी म्हणून श्री एम. टी. कावळे तत्कालीन उपअधिक्षक भूमी अभिलेख हे कार्यरत होते. त्यांच्याकडे या पदाचा अतिरिक्त कार्यभार होता म्हणून त्यांचेकडून अपीलकर्त्यास 30 दिवसाच्या मुदतीत माहिती उपलब्ध झालेली नाही. तथापि त्यानंतर अपीलकर्त्यास दि. 25.3.2011 च्या पत्राने आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. सदरची दि. 25.3.2011 च्या पत्राने पाठविलेली माहिती प्राप्त झाल्याचे जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीत

आयोगापुढे मान्य केले. मात्र माहिती उपलब्ध करुन देण्यास विलंब झाल्याबाबत जन माहिती अधिकारी यांचेवर कार्यवाही करावी असे त्यांनी आयोगापुढे नमुद केले.

6. अपीलकर्ता तसेच जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की अपीलकर्त्याचा दि. 13.12.2010 चा माहितीचा अर्ज जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयाकडे दि. 15.12.2010 रोजी प्राप्त झाला होता. म्हणून अपीलकर्त्यास 30 दिवसाच्या मुदतीत म्हणजे दि. 14.1.2010पर्यंत माहिती उपलब्ध होणे आवश्यक होते. तथापि अपीलकर्त्यास दि. 25.3.2011 च्या पत्राने आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. मात्र सदरची माहिती अपीलकर्त्यास 30 दिवसाच्या मुदती नंतर म्हणजे सुमारे 71 दिवस माहिती विलंबाने दिलेली दिसून येते. सदरच्या विलंबास तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री कावळे हे जबाबदार दिसून येतात. म्हणून त्यांचे विरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 20 (1) अन्वये रु.10000/— ची शास्ती कां लादण्यात येवू नये याचा खुलासा त्यांचेकडून प्राप्त करणे आवश्यक आहे. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.
2) तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री कावळे यांनी अपीलकर्ता यांना वर नमुद केल्याप्रमाणे 30 दिवसाच्या मुदतीत कोणतीही माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. म्हणून माहिती उपलब्ध होण्यास झालेल्या विलंबाबद्यल ते जबाबदार दिसून येतात. म्हणून त्यांचे विरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 20 (1) अन्वये रु.10000/— ची शास्ती कां लादण्यात येवू नये याचा खुलासा हा आदेश मिळाल्यापासून 15 दिवसाचे आंत आयोगापुढे सादर करावा. अन्यथा शास्तीची कार्यवाही कायम करण्यात येईल.
3) विद्यमान जन माहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांनी हया आदेशाची एक प्रत श्री कावळे यांचेकडे खुलासा सादर करण्यासाठी त्वरीत पाठवावी.
4) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1939-1940

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 421 नाग/2011**

श्री भिमराव भेमटु टेंभुर्णे
विदर्भ हाऊसिंग कॉलनी, हनुमान मंदिराच्या मागे
जि.प. चौक भंडारा
ता. जि. भंडारा ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपसंचालक
आरोग्य सेवा नागपूर मंडळ नागपूर
माताकचेरी श्रध्दानंदपेठ नागपूर
2) श्रीमती सुषमा बानीक मुख्य प्रशासकीय अधिकारी
जन माहिती अधिकारी
उपसंचालक
आरोग्य सेवा नागपूर मंडळ नागपूर
माताकचेरी श्रध्दानंदपेठ नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 28.6.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 10.3.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 30.5.2011 रोजी नोटीस काढून दि. 28.6.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 28.12.2010 रोजी जन माहिती अधिकारी उपसंचालक आरोग्य सेवा नागपूर मंडळ नागपूर यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन उपसंचालक आरोग्य सेवा नागपूर मंडळ नागपूर यांच्या कार्यालयामार्फत प्रतिनियुक्तीवर असलेल्या कर्मचा–या बाबतची माहिती त्यांनी मागितलेली होती. तसेच सौ. संध्या मसगवरे जनरल हॉस्पीटल भंडारा येथे सहाय्यक अधीक्षक पदावर होत्या. त्या सेवानिवृत्त झाल्यानंतर त्यांच्या रीक्त पदी मागासवर्गीय कर्मचा–याची नियुक्ती न करता खुल्या प्रवर्गात पदोननती देण्यात आली म्हणून बिंदू नामावलीची प्रत त्यांनी मागितलेली होती. त्यांना जन माहिती अधिकारी यांचेकडून माहिती प्राप्त झाली मात्र प्राप्त झालेली माहिती ही प्रमाणीत करुन दिलेली नाही तसेच श्रीमती घुले हया सहाय्यक अधीक्षक या पदावर प्रतिनियुक्तीवर आहे. तथापि त्याची माहिती त्यांना मिळाली नाही असे अपीलकर्ता यांनी सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी उपसंचालक कार्यालयातील श्रीमती सुषमा बानीक मुख्य प्रशासकीय अधिकारी हया उपस्थित होत्या. त्यांनी अपीलकर्त्यास दिलेली माहिती आयोगा समोर प्रमाणीत करुन दिली ती माहिती अपीलकर्त्याने आयोगा समोर स्वीकृत केली. तथापि श्रीमती घुले यांची प्रतिनियुक्ती उपसंचालक कार्यालयाकडून झालेली नाही असे जन माहिती अधिकारी यांनी आयोगा समोर नमुद केले. त्याचप्रमाणे प्रतिनियुक्ती बाबत त्यांच्या कार्यालयात कोणताही शासन निर्णय उपलब्ध नाही. तथापि कार्यालयीन व्यवस्थे अंतर्गत प्रतिनियुक्ती करण्यात येते असे जन माहिती अधिकारी यांनी आयोगा समोर सांगितले.

4. अपीलकर्ता तसेच जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की अपीलकर्त्याने मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी आयोगा समोर प्रमाणीत करुन दिली सदरची माहिती अपीलकर्त्याने आयोगा समोर स्वीकृत केली. तथापि श्रीमती घुले यांची प्रतिनियुक्ती उपसंचालक आरोग्य सेवा नागपूर मंडळ नागपूर यांचेकडून झालेली नाही असे स्पष्टपणे अपीलकर्त्यास कळविणे योग्य होईल. त्याचप्रमाणे प्रतिनियुक्ती बाबत जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयात कोणताही शासन निर्णय उपलब्ध नाही. मात्र कार्यालयीन व्यवस्थे अंतर्गत प्रतिनियुक्ती करण्यात येते असे स्पष्टपणे अपीलकर्त्यास कळविणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना असे कळवावे की प्रतिनियुक्ती बाबत यांच्या कार्यालयात कोणताही शासन निर्णय उपलब्ध नाही. मात्र कार्यालयीन व्यवस्थे अंतर्गत प्रतिनियुक्ती करण्यात येते असते.
2) तसेच श्रीमती घुले यांची प्रतिनियुक्ती उपसंचालक आरोग्य सेवा नागपूर मंडळ नागपूर यांचे कार्यालयाकडून झालेला नाही असे देखील अपीलकर्त्यास विनामुल्य स्पष्टपणे लेखी कळवावे.
3) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

( पी. डब्ल्यु. पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**नागपूर**
Ageyord6.1942-1943

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 427 नाग/2011

श्री मुकुंद जमनादास व्यास
हाऊसिंग बोर्ड कॉलनी क्वार्टर नं.बी/87
शांतीनगर कॉलनी नागपूर
ता. जि. नागपूर –02 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा पोलीस उपायुक्त(वाहतूक)
सिव्हील लाईन्स, नागपूर
ता. जि. नागपूर
2) श्री मोरे
जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त
वाहतूक शाखा, पश्चिम विभाग, सिव्हील लाईन्स, नागपूर
ता. जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 29.6.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 17.3.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 1.6.2011 रोजी नोटीस काढून दि. 29.6.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 22.11.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त वाहतूक शाखा, पश्चिम विभाग, नागपूर यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन ज्या कारणावरुन अवैध पार्कींग बंद करण्यात आलेले आहे त्या संदर्भात 1 ते 3 मुद्यांवर माहिती मागितलेली होती. त्यांना जन माहिती अधिकारी यांचेकडून दि. 13.12.2010 च्या पत्राने माहिती प्राप्त झाली. मात्र सदरची माहिती समाधानकारक नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील पोलीस उपायुक्त(वाहतूक) नागपूर यांचेकडे दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी घेण्यात आली. सुनावणीस अपीलकर्ता हे हजर होते. तथापि जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दि. 13.12.2010 च्या पत्राने माहिती उपलब्ध करुन दिली असल्यामुळे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अपीलकर्त्याचे अपील फेटाळले. म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त वाहतूक शाखा, नागपूर श्री मोरे हे उपस्थित होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा

पोलीस उपायुक्त नागपूर यांच्या वतीने श्री उंबरकर सहाय्यक पोलीस आयुक्त हे उपस्थित होते.

4. जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त श्री मोरे यांनी आजच्या सुनावणीस आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 22.11.2010 चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने माहिती अर्जात मागितलेली माहिती तयार करण्यात आली. आणि अपीलकर्त्यास माहिती अर्जाला अनुसरुन दि. 13.12.2010 च्या पत्राने 1 ते 3 मुद्यांची माहिती उपलब्ध करुन दिली. सदरची माहिती अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याचे त्यांनी सुनावणीत आयोगापुढे मान्य केले. मात्र मुद्यां क्र. 1 बाबत अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की श्री प्रवीण दीक्षित माजी पोलीस आयुक्त यांनी अवैध पार्कींग विरोधी पथक बंद करण्याचे लेखी आदेश दिले असल्यास त्याची प्रत त्यांना प्राप्त झाली नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगा पुढे असे सांगितले की अवैध पार्कींग बंद करण्याबाबत श्री प्रवीण दीक्षित यांचे कोणतेही लेखी आदेश त्यांचे कार्यालयाकडे उपलब्ध नाही. तसेच अपीलकर्त्याने आयोगाच्या निदर्शनास आणून दिले की अवैध पार्कींग पुन्हा सुरु करण्याबाबत श्री अंकुश धनविजय विद्यमान पोलीस आयुक्त यांनी लेखी आदेश दिले असल्यास त्या आदेशाची प्रत त्यांना पाहिजे आहे. मात्र याबाबतही जन माहिती अधिकारी यांनी आयोगाच्या निदर्शनास आणून दिले की विद्यमान पोलीस आयुक्त यांनी देखील अवैध पार्कींग सुरु करण्याबाबत कोणतेही लेखी आदेश दिले नाही. त्याप्रमाणे अपीलकर्त्याने आयोगा पुढे असा मुद्दा मांडली की अवैध पार्कींगच्या संदर्भात शासनास किती नफा व तोटा झालेला आहे याची माहिती त्यांना मिळालेली नाही. तथापि याबाबत जन माहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगाच्या निदर्शनास आणून दिले की अवैध पार्कींग विरोधी पथकाच्या संदर्भात राबविण्यात येणा–या योजनेमध्ये शासनास मिळणारा फायदा किंवा तोटा याची गणना होत नसते. तथापि अवैध पार्कींगच्या संदर्भात मोटार वाहन कायद्यातील तरतुदीनुसार दंडाची आकारणी करण्यात येत असते आणि त्या दंडाची आकारणी संदर्भात शासनाची पावती निर्गमीत करण्यात येते. त्याचप्रमाणे संबंधीत ठेकेदाराला वाहन उचलण्याचे नियमा नुसार फी अदा करण्यात येत असते आणि त्याची देखील पावती संबंधीताला अदा करण्यात येते असे जन माहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगापुढे सुनावणीत सांगितले.

5. अपीलकर्ता तसेच जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की अपीलकर्त्याच्या दि. 22.11.2010 च्या माहिती अर्जाला अनुसरुन जन माहिती अधिकारी यांनी दि. 13.12.2010 च्या पत्राने माहिती उपलब्ध करुन दिली आहे. तथापि श्री प्रवीण दीक्षित माजी पोलीस आयुक्त आणि श्री अंकुश धनविजय विद्यमान पोलीस आयुक्त यांचेकडून अवैध पार्कींग विरोधी पथक बंद करण्याबाबत अगर सुरु करण्याबाबत लेखी आदेश वाहतूक शाखेस प्राप्त झाले नाही असे स्पष्टपणे अपीलकर्त्यास विनामुल्य उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल. त्याचप्रमाणे अवैध पार्कींगच्या संदर्भात शासनाकडून वसूल करण्यात येणारी दंडाची रक्कम आणि ठेकेदारास अदा करण्यात येत असलेली फी याबाबतचे विवरण

देखील अपीलकर्त्यास उपलब्ध करुन देणे योग्य होईल. आणि सदरची माहितीर ही सन 2009–2010 या कालावधीतील उपलब्ध करुन देण्याची विनंती अपीलकर्त्याने आयोगाकडे केली. त्याला अनुसरुन अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास खालील प्रमाणे विनामुल्य माहिती उपलब्ध करुन द्यावी.
   1) श्री प्रवीण दीक्षित माजी पोलीस आयुक्त आणि श्री अंकुश धनविजय विद्यमान पोलीस आयुक्त यांचे अवैध पार्कींग विरोधी पथक बंद करण्याचे अथवा सुरु करण्याचे कोणत्याही प्रकारचे लेखी स्वरुपाचे आदेश वाहतूक शाखेकडे उपलब्ध नाही असे स्पष्टपणे अपीलकर्त्यास कळवावे.
   2) अवैध पार्कींगच्या संदर्भात वसूल करण्यात येणारा दंड ठेकेदाराला अदा करण्यात येणारी फी याबाबतचे विवरण वर नमुद केल्याप्रमाणे अपीलकर्त्यास विनामुल्य उपलब्ध करुन द्यावे.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1945-19457

जा.क्र.––––––––– दि..................
मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 428 नाग/2011**

श्री मुकुंद जमनादास व्यास
हाऊसिंग बोर्ड कॉलनी क्वार्टर नं.बी/87
शांतीनगर कॉलनी नागपूर
ता. जि. नागपूर –02 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री सुर्यवंशी
प्रथम अपीलीय अधिकारी तथा जिल्हा अधिक्षक
भूमी अभिलेख कार्यालय नागपूर
ता. जि. नागपूर
2) श्री प्रदीप जगताप
जन माहिती अधिकारी तथा नगर भूमापन अधिकारी क्र.1,
प्रशासकीय इमारत सिव्हील लाईन्स, नागपूर
ता. जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 29.6.2011 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 17.3.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 1.6.2011 रोजी नोटीस काढून दि. 29.6.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 21.10.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा नगर भूमापन अधिकारी क्र.1 नागपूर यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन नगर भूमापन क्र.1 कार्यालयामध्ये एकूण किंती मालमत्ता पत्रक आहेत तसेच यापैकी किती मालमत्ता पत्रक दिसून येत नाही यापैकी जे मालमत्ता पत्रक हरविले आहे त्यास कोण जबाबदार आहेत व त्यांच्यावर काय कार्यवाही केली याबाबतची माहिती त्यांनी मागितलेली होती. तथापि त्यांना जन माहिती अधिकारी यांनी दि. 19.11.2010 च्या पत्राने असे कळविले की आपण मागितलेल्या माहितीचा शोध घेण्याचे काम चालू असून काम पूर्ण होताच आपणास माहिती पुरविण्यात येईल आणि या कामी 15 दिवसाचा अवधाी लागेल असे जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास कळविले होते. तथापि त्यांना माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील जिल्हा अधिक्षक भूमी अभिलेख नागपूर यांचेकडे दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी घेण्यात आली आणि प्रथम अपीलाचा निर्णय दि. 24.1.2011रोजी निर्गमीत करण्यात आला आणि त्यामध्ये अपीलकर्त्यास 30 दिवसाच्या आत माहिती पुरविण्याचे आदेश देण्यात आले. तथापि त्यांना माहिती मिळाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा नगर भूमापन अधिकारी क्र.1 नागपूर श्री प्रदीप जगताप हे उपस्थित होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा जिल्हा अधिक्षक भूमी अभिलेख नागपूर श्री सुर्यवंशी हे उपस्थित होते.

4. जन माहिती अधिकारी श्री जगताप यांनी आजच्या सुनावणीस आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 21.10.2010 चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे दि. 22.10.2010 रोजी

प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने नगर भूमापन अधिकारी क्र.1 कार्यालयात एकूण सर्व किती मालमत्ता धारक पत्रक आहेत तसेच यापैकी किती मालमत्ता पत्रक दिसून येत नाही आणि त्यास कोण जबाबदार आहेत व त्यांच्यावर केलेल्या कार्यवाहीची माहिती त्यांनी मागितलेली होती. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती

ही त्यांच्या कार्यक्षेत्रातील सर्व मालमत्ता पत्रका विषयी असल्यामुळे अपीलकर्त्याने मागितलेली माहिती काढण्यास सुरुवात केली तथापी सदरच्या माहितीची व्याप्ती मोठी असल्यामुळे अपीलकर्त्यास दि. 19. 11.2010 च्या पत्राने जन माहिती अधिकारी यांनी असे कळविले की आपण मागितलेल्या माहितीचा शोध घेण्याचे काम चालू असून काम पूर्ण होताच आपणास माहिती पुरविण्याची दक्षता घेण्यात येत असून त्यासाठी 15 दिवसाचा कालावधी लागेल असे जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास कळविले होते. त्यानंतर अपीलकर्त्याने मागितलेली माहिती संपूर्णपणे संकलीत करण्यात आली आणि संकलीत माहिती अपीलकर्त्यास दि. 9.12.2010 च्या पत्राने दि. 10.12.2010 रोजी पोस्टाद्वारे पाठविण्यात आली. सदरची माहिती पोस्टाद्वारे अपीलकर्त्यास पाठविण्या बाबतचा पुरावा जन माहिती अधिकारी यांनी आयोगा समोर दाखविला. तथापी सदरची माहिती अपीलकर्त्यास पोस्टाद्वारे प्राप्त झाली नाही असे अपीलकर्त्याने आयोगा समोर सांगितले. म्हणून आज सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दि. 9.12.2010 च्या पत्राच्या माहिती बाबतची प्रत आयोगा समोर पुन्हा उपलब्ध करुन दिली. ती अपीलकर्त्याने आयोगा समोर स्वीकृत करुन समाधान व्यक्त केले.

6. अपीलकर्ता तसेच जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दि. 9.12.2010 च्या पत्राने आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिली असल्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1942-1943

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 437 नाग/2011**

श्री रामदास हुमाजी गावंडे
रा. कोलारी पो. साठगांव
ता. चिमूर जि. चंद्रपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री डी. डब्ल्यु. आखाडे
प्रथम अपीलीय अधिकारी तथा तहसिलदार
तहसिल कार्यालय चिमूर
ता. चिमूर जि. चंद्रपूर
2) जन माहिती अधिकारी तथा मंडळ अधिकारी,
शंकरपूर
ता. चिमूर जि. चंद्रपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 30.6.2011 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 7.3.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 1.6.2011 रोजी नोटीस काढून दि. 30.6.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 29.3.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा मंडळ अधिकारी, शंकरपूर ता. चिमूर जि. चंद्रपूर यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन मौजा कोलीरी येथील गट नं. 392 च्या संदर्भात 1 ते 8 मुद्यांवर माहिती मागितलेली होती. तथापि त्यांना विहित मुदतीत माहिती प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील तहसिलदार चिमूर यांचेकडे दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी झाली आणि प्रथम अपीलाचा निर्णय देण्यात आला आणि प्रथम अपीलाच्या निर्णयात असे नमुद केले की जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास 7 दिवसाचे आत आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन द्यावी. तथापि त्यांना अपेक्षेप्रमाणे माहिती मिळाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा मंडळ अधिकारी, शंकरपूर श्री काळे हे उपस्थित होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा तहसिलदार चिमूर श्री डी. डब्ल्यु. आखाडे हे उपस्थित होते.

4. जन माहिती अधिकारी श्री काळे यांनी आजच्या सुनावणीस आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 29.3.2010 चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झालेला दिसून येत नाही. त्यावेळी तत्कालीन जन माहिती अधिकारी म्हणून श्री आझाद हे कार्यरत होते. त्यानंतर श्री करकाडे हे कार्यरत होते. या दोन्हीच्या कालावधीत देखील सदरचा माहितीचा अर्ज प्राप्त झालेला दिसून येत नाही. मात्र अपीलकर्त्याने प्रथम अपील तहसिलदार चिमूर यांचेकडे दाखल केल्यानंतर प्रथम अपीलाची सुनावणी तहसिलदार चिमूर यांचेकडे घेण्यात आली आणि अपीलकर्त्यास 7 दिवसाचे आत माहिती देण्याचे आदेश प्रथम अपीलात देण्यात आले. त्याला अनुसरुन अपीलकर्त्यास त्याच

दिवशी दि. 31.1.2011 रोजी माहिती उपलब्ध करुन दिली. सदरची माहिती अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याचे त्यांनी मान्य केले. मात्र त्यावेळी त्यांना मुद्दा क्र.5 ची माहिती प्राप्त न झाल्यामुळे ती माहिती दि. 11.2.2011 रोजी अपीलकर्त्यास पाठविण्यात आली आणि सदरची मुद्दा क्र.5 ची माहिती देखील अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याचे सुनावणीत मान्य केले.

5. आजच्या सुनावणीस प्रथम अपीलीय अधिकारी तथा तहसिलदार चिमूर श्री डी. डब्ल्यु. आखाडे यांनी आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचे प्रथम अपील त्यांचेकडे दाखल झाल्यानंतर प्रथम अपीलाची सुनावणी दि. 31.1.2011 रोजी घेण्यात आली. आणि त्याच दिवशी अपीलाचा निर्णय देण्यात येवून 7 दिवसाचे आत जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन द्यावी असे निर्देश दिले. त्याला अनुसरुन जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दि. 31.1.2011 रोजी आणि दि. 11.2.2011 रोजी आवश्यक ती माहिती उपलब्ध झाली असल्यामुळे सदरचे अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

( पी. डब्ल्यु. पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**नागपूर**
Ageyord6.1945-1946

जा.क्र.————————— दि..................
मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 438 नाग/2011**

श्री रामदास हुमाजी गावंडे
रा. कोलारी पो. साठगांव
ता. चिमूर जि. चंद्रपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा जिल्हा पोलीस अधिक्षक
चंद्रपूर
ता. जि. चंद्रपूर
2) श्री भरते
जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी,
वरोरा
ता. वरोरा जि. चंद्रपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 30.6.2011 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 7.3.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 1.6.2011 रोजी नोटीस काढून दि. 30.6.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 7.7.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, वरोरा यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन दि. 24.6.2009 रोजी मौजा कोलारी 20.30 वाजता सादर केलेला रिपोर्ट गोपीचंद उर्फ गारबट यांनी दिलेल्या रिपोर्टची प्रत व रिपोर्टला जोडलेल्या कागदपत्राच्या प्रती याबाबत 1 ते 7 मुद्यांवर माहिती मागितलेली होती. त्यांना जन माहिती अधिकारी यांचेकडून माहितीचे शुल्क भरण्याचे पत्र प्राप्त झाले मात्र माहितीचे शुल्क किती प्रतींसाठी आहे याचा उल्लेख त्या पत्रात नव्हता म्हणून त्यांनी माहितीचे शुल्क भरणा केले नाही. त्यानंतर त्यांनी प्रथम अपील जिल्हा पोलीस अधिक्षक चंद्रपूर यांचेकडे दाखल केले. मात्र प्रथम अपीलाच्या निर्णया नंतरही त्यांना अपेक्षित माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, वरोरा श्री भर्ते हे उपस्थित होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा जिल्हा पोलीस अधिक्षक चंद्रपूर यांच्या तर्फे पोलीस उपनिरीक्षक श्री रामटेके हे उपस्थित होते.

4. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, वरोरा श्री भर्ते यांनी आजच्या सुनावणीस आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 7.7.2010 चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे दि. 13.7.2010 रोजी प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती पोलीस स्टेशन भिसी यांचेशी संबंधीत असल्यामुळे त्यांनी माहितीचा अर्ज दि. 14.7.2010 च्या पत्राने पोलीस स्टेशन भिसी यांचेकडे पाठवून अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन देण्याचे कळविले. व त्याची प्रत अपीलकर्त्यास देवून पोलीस स्टेशन भिसी यांचेकडून माहिती प्राप्त करुन घ्यावी असे त्यामध्ये नमुद

केले. त्यानंतर पोलीस स्टेशन भिसी यांनी अपीलकर्त्याने मागितलेल्या माहितीच्या संदर्भात दि. 4.8. 2010 च्या पत्राने माहितीचे शुल्क रु. 130/– भरण्याबाबत कळविले. तथापि अपीलकर्त्याने माहितीच्या शुल्काचा भरणा न करता जिल्हा पोलीस अधिक्षक चंद्रपूर यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी घेण्यात आली आणि त्या सुनावणीस अपीलकर्ता हे गैरहजर होते. मात्र प्रथम अपीलीय अधिकारी यांनी जन माहिती अधिकारी आणि पोलीस स्टेशन भिसीचे ठाणेदार यांचे म्हणणे ऐकून घेवून प्रथम अपीलाचा निर्णय दि. 14.12.2010 रोजी दिला. आणि त्यामध्ये असे नमुद केले की अपीलकर्ता यांच्या माहिती अर्जातील मुद्या क्र. 2 ते 6 बाबतच्या प्रती उपविभागीय अधिकारी, वरोरा यांच्या कार्यालयातून प्राप्त करुन घ्याव्या कारण पोलीस स्टेशन भिसी यांनी ही सर्व कागदपत्रे उपविभागीय अधिकारी, वरोरा यांचेकडे इस्तेगासा कलम 133 सी आर पी सी च्या कार्यवाहीसाठी पाठविण्यात आलेली आहे. त्यानुसार अपीलकर्त्यास उपविभागीय अधिकारी, वरोरा यांचेकडून दि. 29.12.2010 च्या पत्राने माहिती प्राप्त झालेली आहे मात्र त्यामध्ये अपीलकर्त्याच्या माहितीचा अर्जातील मुद्या क्र. 2 ते 6 ची माहिती नाही असे अपीलकर्त्याने आयोगा समोर सांगितले. म्हणून जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, वरोरा यांनी प्रथम अपीलातील निर्णयाप्रमाणे अपीलकर्ता यांच्या मुद्या क्र. 2 ते 6 बाबतच्या प्रती उपविभागीय अधिकारी, वरोरा यांच्या कार्यालयातून प्राप्त करुन घेवून अपीलकर्त्यास उपलब्ध करुन देणे योग्य व संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 15 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, वरोरा यांनी अपीलकर्त्यास मुद्या क्र. 2 ते 6 बाबतच्या प्रती उपविभागीय अधिकारी, वरोरा यांच्या कार्यालयातून प्राप्त करुन घेवून अपीलकर्त्यास उपलब्ध करुन द्याव्या.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1948-1949

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 439 नाग/2011**

सौ. शिला अशोक रामटेके
मु. पो. नवखळा
ता. नागभीड जि. चंद्रपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा अति. जिल्हाधिकारी
जिल्हाधिकारी कार्यालय चंद्रपूर
ता. जि. चंद्रपूर
2) श्री किशोर संकुरवार
जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी
ब्रम्हपुरी
ता. ब्रम्हपुरी जि. चंद्रपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 30.6.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 7.3.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 1.6.2011 रोजी नोटीस काढून दि. 30.6.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 22.11.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी ब्रम्हपुरी यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन त्यांच्या दि. 26.4.2010 च्या अपील अर्जावर केलेल्या कार्यवाहीची माहिती त्यांनी मागितलेली होती. तथापि त्यांना अपेक्षित माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील अति. जिल्हाधिकारी यांचेकडे दाखल केले. मात्र त्यानंतरही त्यांना अपेक्षित माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी ब्रम्हपुरी श्री किशोर संकुरवार हे उपस्थित होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या वतीने त्यांनाच प्राधिकृत करण्यात आलेले आहे.

4. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी ब्रम्हपुरी श्री किशोर संकुरवार यांनी आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 22.11.2010 चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने या माहितीच्या अर्जात त्यांच्या दि. 26.4.2010 च्या अपील अर्जावर केलेल्या कार्यवाहीची माहिती मागितलेली होती. त्याला अनुसरुन अपीलकर्त्याने मागितलेल्या माहितीचा शोध घेण्यात आला आणि त्यानंतर अपीलकर्त्यास दि. 13.12.2010 च्या पत्राने असे कळविले की आपल्या दि. 26.4.2010 च्या अपील अर्जावर केलेल्या कार्यवाहीची माहिती आपण मागितलेली आहे. परंतू आपला उक्त तारखेचा अपील अर्ज या कार्यालयास मिळालेला नसल्यामुळे आपण नेमकी कोणत्या माहितीसाठी अपील सादर केले याचा काही बोध होत नाही म्हणून आपण दि. 26.4.2010 च्या अपील अर्जाची एक प्रत या कार्यालयास

पाठवावी म्हणजे आपणास हवी असलेली माहिती पुरविणे या कार्यालयास सोयीचे होईल अशी माहिती दि. 13.12.2010 च्या पत्राने उपलब्ध करुन देण्यात आली होती. त्यानंतर अपीलकर्त्याने महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम 1966 चे कलम 247 अन्वये दि. 26.4.2010 च्या अपील अर्जाची प्रत जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात सादर केली. म्हणून याबाबत जन माहिती अधिकारी यांनी आयोगाच्या निदर्शनास आणून दिले की प्रस्तूत अपील हे महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम 1966 च्या तरतूदीला अनुसरुन सुनावणी घेवून याबाबत यथावकाश योग्य ते आदेश पारीत करण्यात येवून निकाली काढण्यात येईल आणि आदेश पारीत झाल्यानंतर अपीलकर्त्यास त्याची प्रत उपलब्ध करुन देता येईल असे जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले.

5. अपीलकर्ता तसेच जन माहिती अधिकारीयांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की अपीलकर्त्याने दि. 26.4.2010 रोजी महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम 1966 अन्वये अपील दाखल केलेले आहे. त्या अपीलाची नियमानुसार कार्यवाही करुन त्याबाबतचे योग्य ते आदेश निर्गमीत करण्याची कार्यवाही करण्यात यावून ते आदेश अपीलकर्त्यास उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी ब्रम्हपुरी यांनी अपीलकर्त्याच्या दि. 26.4.2010 च्या अपील अर्जावर नियमाप्रमाणे सुनावणीची कार्यवाही करुन योग्य ते आदेश परीत करावे आणि आदेश परीत केल्यानंतर त्याची प्रत अपीलकर्त्यास विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1951-1952

जा.क्र.————————— दि..................
मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 440 नाग/2011**

श्री सिध्दार्थ अभिमानजी खैरे
इंदिरा नगर वार्ड नं. 15 मुल रोड चंद्रपूर
ता. जि. चंद्रपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी
चंद्रपूर
ता. जि. चंद्रपूर
2) श्री सहारे
जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार
(संजय गांधी योजना नगर परिषद क्षेत्र) तहसिल कार्यालय चंद्रपूर
ता. जि. चंद्रपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 30.6.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 14.3.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 1.6.2011 रोजी नोटीस काढून दि. 30.6.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत पोस्टाने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 2.2.2011 रोजी जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार (संजय गांधी योजना नगर परिषद क्षेत्र) तहसिल कार्यालय चंद्रपूर यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन त्यांना आक्टोबर 2008 ते ऑगष्ट 2009 पर्यंत संजय गांधी भत्ता मंजूर होवून देखील रक्कम प्राप्त झाली नाही त्यासंबंधीची माहिती त्यांनी मागितलेली होती. तथापि त्यांना रक्कम मिळाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील उपविभागीय अधिकारी चंद्रपूर यांचेकडे दाखल केले. मात्र प्रथम अपील खारीज करण्यात आल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार संजय गांधी योजना तहसिल कार्यालय चंद्रपूर श्री सहारे हे उपस्थित होते. त्यांनी आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 2.2.2011 चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने या माहिती अर्जात त्यांना आक्टोबर 2008 पासून संजय गांधी भत्ता मंजूर होवून देखील रक्कम प्राप्त झाली नाही याबाबतची माहिती त्यांनी मागितलेली होती. त्याला अनुसरुन जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दि. 7.2.2011 च्या पत्राने आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिली आणि त्यामध्ये असे नमुद केले की आपले संजय गांधी निराधार अनुदान योजने अंतर्गतचे माहे डिसेंबर 2008 ते माहे मे 2009पर्यंतच अनुदान बॅक ऑफ इंडिया मेन शाखा चंद्रपूर येथे चुकिने पाठविण्यात आले होते. तथापि सदरची रक्कम बॅक ऑफ इंडिया जटपूरा शाखेवर आपले खाते क्र. 110002647 वर वर्ग करण्याबाबत या कार्यालयाचे दि. 4.11.2010 च्या पत्राने शाखा व्यवस्थापक बॅक ऑफ इंडिया मेन शाखा यांना कळविण्यात आलेले आहे. तसेच माहे जून 2010 ते नोव्हेंबर 2010पर्यंतचे वरील खाते क्र. बॅक ऑफ इंडिया जटपूरा शाखेत पाठविण्यात आलेले आहे.व आपण उचल सुध्दा केलेली आहे.

आणि माहे आक्टोबर 2008 ते नोव्हेंबर 2008 चे अनुदान वितरित करणे बाकी आहे. सध्या या कार्यालयात अनुदान उपलब्ध नसल्यामुळे प्राप्त होताच वितरित करण्यात येईल अशी माहिती अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिली असल्याचे जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीत नमुद केले. सदरची माहिती अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याचे त्यांनी सुनावणीत मान्य केले. मात्र अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की त्यांच्या पास बुक मध्ये याबाबतच्या नोंदी झालेल्या नाहीत. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की अपीलकर्त्याचे पास बुक अद्यावत पूर्णपणे भरलेले नाही म्हणून अपीलकर्त्याने बॅंकेच्या शाखेत जावून अद्यावत पास बुकच्या नोंदी भरुन घेणे योग्य होईल. तथापि अपीलकर्त्यास जन माहिती अधिकारी यांनी दि. 7.2.2011 च्या पत्राने माहिती उपलब्ध करुन दिली असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यात येत आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1952-1953

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**